मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

ज्ञानद्वेष्ट्या शत्रूचा नाश करण्याकरिता रुद्राला मी धनुष्य सज्ज करून देतें. लोकांच्या करिता मी युद्ध करतें. (त्यावेळी) मी द्यावापृथिवीला व्यापून टाकतें.

अहं सुवे पितरमस्य मूर्धन्
मम योनिरप्स्व अन्तः समुद्रे ।
ततो वि तिष्ठे भुवनानि विश्वा
उतामूं द्यां वर्ष्मणोपस्पृशामि ॥ ७.

मी याच्या शिरोभागी पालक निर्माण करतें. माझें उत्पत्तिस्थान समुद्राच्या जलप्रवाहांत आहे. तेथून उठून मी सर्व भुवनांत पसरतें. व या द्युलोकाला आपल्या शरीराने स्पर्श करतें.

अहमेव वात इव प्र वामि
आरभमाणा भुवनानि विश्वा ।
परो दिवा पर एना पृथिव्या
एतावती महिना सं बभूव ॥ ८.

या सर्व भुवनांना निर्माण करीत मी वायूप्रमाणे संचार करतें. द्युलोक आणि पृथ्वी यांच्याहून श्रेष्ठ अशी मी आपल्या सामर्थ्याने एवढी झालें.

सायणाचार्यांनी या सूक्ताचा अर्थ आत्मपर केला आहे. सूक्तांतील 'अहम्' हा निर्देश ब्राह्मी स्थितीचा अनुभव घेणाऱ्या सूक्तकर्त्रीचा वाचक आहे. "अहं सूक्तस्य द्रष्ट्री वागाम्भृणी यद् ब्रह्म जगत्कारणं तद्रूपा भवन्ती" असें 'अहम्' बद्दल सायणाचार्य लिहितात. या सूक्तावरील भाष्याच्या उपोद्घातांतच सूक्ताच्या आत्मपरतेची भूमिका त्यांनी स्पष्ट केली आहे. ते म्हणतात—

"अम्भृणस्य महर्षेः दुहिता वाक्—नाम्नी ब्रह्मविदुषी स्वात्मानम् अस्तौत् । अतः सा ऋषिः । सच्चित्सुखात्मकः सर्वगतः परमात्मा देवता । तेन हि एषा तादात्म्यम् अनुभवन्ती सर्वजगद्रूपेण सर्वस्य अधिष्ठानत्वेन च अहं एव सर्वं भवामि इति स्वात्मानं स्तौति ।"

या सूक्ताची ऋषिका वाक् आहे, आणि देवता आत्मा आहे. कात्यायनाच्या सर्वानुक्रमणींतहि "अहम् अष्टौ वाक् आम्भृणी आत्मानं तुष्टाव" असेंच दिलें आहे.

हेंच सूक्त थोड्याशा फरकाने अथर्ववेदांतहि (४।३०) आलेलें आहे. तेथे मात्र सूक्ताचा ऋषि अथर्वा, आणि देवता 'सर्वरूपा सर्वात्मिका सर्वदेवमयी वाक्' अशी दिली आहे. अथर्व भाष्यांतहि या सूक्तावरील उपोद्घातांत सायणाचार्यांनी वर प्रमाणेच पण अधिक विस्तारपूर्वक लिहिलें आहे. ते म्हणतात—

"एकस्यैवहि ब्रह्मणः तत्तदुपाध्यवच्छेदेन वस्वादिरूपेण भेदावभासात् । वस्तुतस्तु ऐक्यमेव इति तदनुसन्दधाना ब्रह्मवादिनी एवं ब्रूते ।...मत्स्वरूपे अद्वितीये ब्रह्मणि सर्वं जगत् शुक्तौ रजतमिव अध्यस्तं सत् दृश्यते ।"

त्या त्या उपाधिभेदाने एकाच ब्रह्मशक्तीचे वसुरुद्रादिक देवताभेद भासमान होतात. वस्तुतः सर्व ऐक्यच आहे. अद्वितीय ब्रह्माच्या ठिकाणीं सर्व जगत् शुक्ति-

रजतन्यायाने अध्यस्त झालें आहे. सूक्ताची ही मध्यवर्ती कल्पना आहे. सायणाचार्यांनी हें सूक्ताच्या पहिल्या ऋचेवरील भाष्यांत सांगितलें आहे. " मयि हि सर्वं जगत् शुक्तौ रजतमिव अध्यस्तं सत् दृश्यते । मया हि जगदाकारेण विवर्तते । "

या आत्मपर सूक्ताचा व्यावहारिक अर्थ कोणता निष्पन्न होतो हें पाहण्याचा आपण या लेखांत प्रयत्न करूं.

" मी वसुरुद्रादि देवतांच्या बरोबर फिरतें. " हें ऐकल्यावरोबर आपल्या मनांत प्रश्न येतो, ही ' मी ' कोण ? पार्थिव देहाने आपल्या समोर उभी असलेली अम्भृण ऋषीची मुलगी वाक् ही व्यक्ति कांही ' अहं 'ची वाच्य नव्हे. ज्या समष्टि-शक्तीशीं व्यष्टिरूप वाक्चें तादात्म्य झालें आहे त्या समष्टीचा निर्देश ' अहं ' या शद्वाने केला आहे. ही समष्टि आपली स्वतःची ओळख तिसऱ्या ऋचेंत या शद्वांनी करून देते—" अहम् राष्ट्री. "

अहं राष्ट्री—मी राष्ट्री आहे. राष्ट्री हा शद्व येथे नाम आहे. राष्ट्र हें ईश्वर नाम आहे. "अहं राष्ट्री । ईश्वर नाम एतत् । सर्वस्य जगतः ईश्वरी । " असें यावर सायणाचार्य लिहितात. राष्ट्र म्हणजे ईश्वर. राष्ट्री म्हणजे ईश्वरशक्ती. राष्ट्री म्हणजे राष्ट्रशक्ति (शक्तिशक्तिमतोरभेदात् ।). राष्ट्र हा शद्व देश किंवा राज्य या अर्थी ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं वापरला आहे. (पाहा— राजा राष्ट्राणां पेशो नदीनाम् । ७।३४।११ इत्यादि) तेव्हां राष्ट्री याचा अर्थ राष्ट्रातून व्यक्त होणारी लोकशक्ति असा करावयास कांही हरकत नाही.

शक्ति नेहमींच कार्यद्वारां व्यक्त होत असते. राष्ट्रशक्ति सुद्धा कार्यद्वाराच प्रकट होईल. कोणत्या कार्याच्या द्वारें ही राष्ट्री प्रकट होते ? " संगमनी वसूनाम्" आणि "चिकितुषी " असें तिसऱ्या ऋचेंत सांगितलें आहे. राष्ट्री ही ' वसूनां संगमनी ' म्हणजे धनाचें संगमन करणारी आहे. आणि " चिकितुषी " म्हणजे ज्ञानाचा साक्षात्कार करणारी आहे. धनाचें संगमन म्हणजे धनाचें प्रापण किंवा वाटप. "वसूनां धनानां संगमनी संगमयित्री उपासकानां प्रापयित्री " असा सायणाचार्यांनी अर्थ दिला आहे. राष्ट्री ही तिच्या उपासकाकडे धन पोंचवितें. धनाची निर्मिति, वर्धन आणि प्रापण किंवा योग्य वाटप हें राष्ट्रशक्तीचे एक कार्य होय. आणि दुसरें कार्य म्हणजें राष्ट्रांत ज्ञानाचा साक्षात्कार होणें. ज्ञानसंवर्धन, ज्ञानसाक्षात्कार हें राष्ट्रशक्तीचें कार्य होय. ज्ञानसंवर्धन, आणि धनसंवर्धन या दोन कार्यांच्या द्वारें राष्ट्री—राष्ट्रशक्ती व्यक्त होत असते. ज्ञानशक्ती व धनशक्ती यांवरच राष्ट्राची प्रगति आणि अभ्युदय अधिष्ठित झालेले असतात.

आणि म्हणूनच राष्ट्री ही पूजनीयांमध्यें सर्वश्रेष्ठ (यज्ञियानां प्रथमा) आहे. यज्ञिय म्हणजे यज्ञार्ह, पूजनीय. राष्ट्री हीच अग्रपूजेला योग्य आहे. राष्ट्रीची सेवा हीच परमश्रेष्ठ उपासना होय. आणि या उपासनेचा मार्ग म्हणजे ज्ञानसंवर्धन आणि धनसंवर्धन. ओघा ओघानेच येथें सुचले म्हणून निर्देश करितों. युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञांत अग्रपूजा कृष्णालाच अर्पण कां करावी हें सांगताना कृष्णामध्यें यज्ञ शौर्य, ज्ञान, धन आणि राष्ट्राचें जें जें म्हणून प्रतीक आहे तें तें सर्व प्रतिष्ठित आहे व म्हणून त्यालाच अग्रपूजा देणें योग्य आहे असें भीष्म म्हणतात. "कृष्णच

अग्रपूजेला योग्य का ? आम्हाला त्याच्या विषयीं प्रेम आहे म्हणून नव्हे, तो आप्त आहे म्हणून नव्हे, तो आमचा उपकारकर्ता आहे म्हणून नव्हे तर त्याच्यामध्यें सर्व राष्ट्र प्रतिष्ठित आहे म्हणून " या दृष्टीने महाभारत सभापर्वांतील ३७ ते ४५ हे शिशुपाल वधासंबंधींचे अध्याय वाचून पाहण्यासारखे आहेत. राजसूय प्रसंगीं केलेली श्रीकृष्णाची अग्रपूजा ही एकप्रकारें राष्ट्रशक्तीच्या प्रतीकाचीच पूजा होती.

ज्ञान आणि धन या रूपाने व्यक्त होणारी ही राष्ट्रशक्ती राष्ट्रातील कांहीं व्यक्तींत किंवा एकाद्या भागांत केंद्रित झालेली नाहीं. ती राष्ट्रांत सर्वत्र पसरलेली असते आणि त्या सर्वांनाच चैतन्य प्राप्त झाल्याशिवाय राष्ट्रशक्तीचे संवर्धन होत नाहीं. ही गोष्ट तिसऱ्या ऋचेंतील उत्तरार्धात सांगितली आहे.

तां मा देवा व्यदधुः पुरुत्रा
भूरिस्थात्रां भूर्यावेशयन्तीम् ॥

ज्ञान आणि धन स्वरूप अशा मला देवांनीं अनेकस्थानी धारण केलें आहे. राष्ट्र शक्ति ही अनेक केंद्रांतून व्यक्त होते. राष्ट्रांतील विद्वान्, पंडित, वैज्ञानिक, संशोधक, तत्त्ववेत्ते, कवि, लेखक, संपादक, शिक्षक, वकील इत्यादि विविध केंद्रांतून राष्ट्रातील ज्ञानशक्ती व्यक्त होते, तर धनशक्ति ही शेती, पशुपालन, उद्योग, वनें, खाणी, निरनिराळे उत्पादक धंदे या अनेकविध केंद्रांतून वर्धन पावते. ज्ञानाच्या किंवा धनाच्या बाबतींत जें जें म्हणून निर्माण केलें जातें, ज्याचा ज्याचा म्हणून शोध केला जातो, त्या सर्वांमधून राष्ट्रशक्तीचा-राष्ट्रीचाच विकास होत असतो.

राष्ट्रशक्ति ही सर्वत्र स्थित आहे व ती अनेकांतून चेतन होत आहे ही गोष्ट "भूरि-आवेशयन्तीम् " या दोन शद्बांतून व्यक्त झाली आहे. भूरिस्थात्र म्हणजे बहुभावांनीं स्थित असलेली, आणि भूर्यावेशयन्ती म्हणजे अनेकांमध्यें स्फुरण निर्माण करणारी. राष्ट्रशक्तीचा विकास एकाच केंद्रांतून, एकाच प्रदेशांतून किंवा एकाच वर्गातून होत नसतो. राष्ट्रशक्ती विकसित व्हावयाची असेल तर सर्वच केंद्रांचा, सर्वच प्रदेशांचा आणि सर्वच वर्गांचा विकास व्हावयास पाहिजे. सर्वांऱ्याच ठिकाणीं स्फुरण चैतन्य निर्माण झालें पाहिजे. राष्ट्रशक्तीची प्रतिष्ठा व्यष्टिरुपाने नसून समष्टि रुपाने आहे. त्यामुळें समाजांतील सर्वच वर्गांचा विकास झाल्याशिवाय राष्ट्रशक्तीचा विकास होणें शक्य नाहीं. राष्ट्रांतील धन आणि ज्ञान हें राष्ट्रांतील कांही व्यक्तींचा मक्ता होऊन बसणें यांत राष्ट्रीचा विघात आहे. कारण राष्ट्रीचे अवस्थान एकदेशीय नाहीं. तें सर्वत्र आणि सर्वरूपानें आहे. "उक्त प्रकारेण वैश्वरूप्येण अवस्थानात् " म्हणूनच या अनेक विध केंद्रांचा विकास म्हणजेच राष्ट्रीचाहि विकास ठरतो. "यत् यत् कुर्वन्ति तत् तत् सर्वे मां एव कुर्वन्ति" असें सायणांनी लिहिलें आहे.

"तां मा देवाः पुरुत्रा व्यदधुः " या मध्येच सूक्तकर्त्रीने 'पुरुत्र विधारणा'चें तत्व बीजरूपानें प्रतिपादिलें आहे. पुरुत्र विधारणाच्या उलट एकत्र धारण होय. एकत्र धारण म्हणजे ज्ञानशक्तीचा किंवा धनशक्तीचा एकाचठिकाणी संकोच. हा संकोच करणें म्हणजे राष्ट्रशक्तीचा अपमान करणें होय. त्याचें पर्यवसान अखेर एकत्र धारण करणाऱ्या व्यक्तींच्या नाशांत होतें. हें पुढील

ऋचेंत सांगितलें आहे. एकत्र धारणाच्या कल्पनेचाच विकास अलीकडे आसुरी संपत्तींत झालेला दिसतो. "पुरुत्र विधारण " हें राष्ट्रशक्तीचें नैसर्गिक स्वरूप आहे. कारण राष्ट्री समष्टिरूप आहे. ज्ञान आणि धन यांचें कांहीं ठराविक व्यक्तींच्या किंवा वर्गाच्या हातांत केंद्रीकरण म्हणजे एकत्र धारण. ज्ञान आणि धन यांचें सर्वत्र धारण म्हणजे पुरुत्र विधारण. एकत्र धारण आणि पुरुत्र विधारण हे दोन वाद आहेत. राष्ट्रांतील धन आणि ज्ञान यांच्या एकत्र धारणाच्या परिस्थितींतूनच क्रांतीला कारण होतें. वेळोवेळीं झालेल्या धर्मक्रांत्या ज्ञानाच्या एकत्र धारणामुळें झाल्या तर भांडवलदार व मजूर हा वाद धनाच्या एकत्र धारणांतून उदयास आला. वैदिक काळांत पुरुत्रविधारणाचें कार्य यज्ञसंस्थेमुळें झालें. या गोष्टीचा निर्देश पुढें येईल.

पुरुत्र विधारणामुळें सर्वत्र पसरलेली ज्ञानस्वरूप आणि धनस्वरूप राष्ट्री हीच प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची पोषक आहे ही गोष्ट पुढील (४ थ्या) ऋचेंत सांगितली आहे. "जो कोणी उपभोग घेतो (अन्नम् अत्ति) जो कोणी पाहतो, जो कोणी श्वासोच्छ्वास करतो, व जो कोणी सांगितलेलें ऐकतो, तो सर्व तें तें माझ्या मुळेंच करतो " असें राष्ट्री आपल्याला सांगते. सारांश राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाची प्रतिष्ठाच राष्ट्रशक्तीवर असते. ही गोष्ट प्रत्येकाने जाणली पाहिजे. जे कोणी राष्ट्रीचें हें स्वरूप जाणत नाहींत, ते राष्ट्रशक्तीचा अपमान करतात. राष्ट्रशक्ति विश्वरूपांत स्थित आहे हें जे जाणत नाहींत, तिचें पुरुत्र विधारण आहे हें ज्यांना पटत नाहीं,ज्ञान आणि धन यांचे एकत्र धारण करून आपल्यांतच सर्वशक्ति केंद्रित करणारे " ईश्वरोऽहमहं भोगी " अशा वृत्तीचे लोक राष्ट्रीला जाणत नाहींत, तिचा ते अपमान करतात. आणि अखेर ते अपमान करणारे नाश पावतात.— "अमन्तवो मां त उपक्षियन्ति । "

राष्ट्री देवीने आपल्याला हा गंभीर इशारा दिला आहे. पुरुत्र विधारण राष्ट्रशक्तीचे नैसर्गिक स्वरूप आहे. आणि ही राष्ट्रीच सर्वांची पोषक आहे. ही गोष्ट लोक अनेकदां विसरतात. कित्येक तर मुळीं जाणतच नाहीत. समजलें तरी त्यांना पटत नाही. या गोष्टीवर त्यांची श्रद्धा बसत नाही. म्हणून राष्ट्री आपल्याला पुनः पुनः बजावून सांगते—" हे बहुश्रुत (शाहण्या) मित्रा नीट ऐक; मी सांगतें त्यावर विश्वास ठेव "—"श्रुधि श्रुत श्रद्धिवं ते वदामि । "

राष्ट्रीचें स्वरूप कसें आहे याचें विवेचन मागील दोन ऋचांत झालें. आतां पुढील दोन ऋचांत राष्ट्रीचा प्रभाव कसा आहे हें सूक्तकर्त्री - सांगते. " हें सर्व (पूर्वोक्त) मी स्वतःच सांगतें आणि देव आणि मानव यांना तें मान्य आहे. " राष्ट्रीने स्वतःबद्दल जें सांगितलें त्याबद्दल संशय येण्याचें कांहीं कारण नाहीं. एकतर तिने स्वतःच आपलें स्वरूप विशद केलें आहे आणि देव आणि मानव यांना तें मान्य झालें आहे. त्यावर आपण श्रद्धा ठेवली पाहिजे आणि मनोभावाने राष्ट्रीची सेवा केली पाहिजे.

आता राष्ट्रशक्तीचा केवढा प्रभाव आहे तें पाहा. राष्ट्री म्हणते-

यं कामये तं तमुग्रं कृणोमि
तं ब्रम्हाणं, तमृषिं, तं सुमेधाम् ।

"मी ज्याला इच्छितें त्याला उग्र (वीर) बनवतें, त्याला ज्ञानी, त्याला द्रष्टा, आणि त्याला बुद्धिवान बनवतें " राष्ट्रामध्यें एक अशी स्थिति निर्माण होते की वीर पुरुष, ज्ञानी पुरुष आपोआप निर्माण होतात. हें सर्व त्या राष्ट्रीच्या स्फुरणामुळें होत असते. राष्ट्रशक्तीची सर्व केंद्रें आपल्या ठिकाणींच एकत्रित करून राष्ट्रीचा संकोच करणारे पुरुष स्वतःलाच राष्ट्राचे कर्ते धर्ते समजतात. "ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी । आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।" अशा प्रकारच्या विचारसरणीच्या लोकांना राष्ट्री पुनः पुनः सांगते की हा तुमचा भ्रम आहे. जेव्हां मला माझें कार्य करून घ्यावयाचें असतें तेव्हां सामान्य जनतेंतून मी वीर पुरुष निर्माण करते, व तींतूनच ज्ञानी, द्रष्टे, व मेधावी निर्माण करते. मानव जातीच्या इतिहासांतील सर्व प्रकारच्या क्रांत्या या गोष्टीची कल्पना देण्यास पुरे होतील. धन आणि ज्ञानशक्तीचे पुरुत्र विधारण कायम ठेवण्यास राष्ट्रशक्तीला उग्रवीरांची गरज असते. या उग्रांच्या द्वारें राष्ट्री आपलें काम कसें करून घेते हें सहाव्या ऋचेंत सांगितलें आहे. "ज्ञानाचे विरोधक असे शत्रु निर्माण होतात तेव्हा मी रुद्राकरितां धनुष्य सज्ज करते." रुद्र हा फार मोठा धनुर्धर आहे. रुद्राच्या धनुष्याची प्रशंसा वेदांत, पुराणांत आणि साहित्यांतहि केलेली आहे. वीर पुरुषांची अशी परंपरा निर्माण होऊं लागताच—

अहं जनाय समदं कृणोमि
अहं द्यावापृथिवी आविवेश ।

"प्रसंग आला तर लोकांच्या करितां मी युद्ध करितें. त्यावेळीं मी सर्व द्यावा-पृथिवींत व्यापून राहतें." राष्ट्रीने अशाप्रकारे निर्माण केलेला संग्राम हा लोकांच्या करिता असतो व त्यांतूनच राष्ट्रशक्तीचा पुनर्विकास होत असतो. जुनी रचना पार नष्ट होऊन नवीन रचनेला अशावेळी आरंभ होत असतो. हीच क्रांती होय. भारतीय युद्ध ही एक अशा प्रकारची क्रांति होती. आणि श्रीकृष्णाच्या रूपाने राष्ट्रीने ही क्रांती घडवून आणली. महाभारताचें उद्योगपर्व या दृष्टीनें वाचण्यासारखें आहे.

राष्ट्रीचा प्रभाव केवढा आहे हें पांचव्या सहाव्या ऋचेंत सांगितले. राष्ट्र-शक्ति केवळ एवढेंच करून थांबत नाहीं. ती लोकांच्या शिरोभागीं एक पालक-पिता निर्माण करते.—"अहं सुवे पितरमस्य मूर्धन् ।"

वैदिक कालांतील हा राष्ट्राचा पिता किंवा पालक कशा प्रकारे निर्माण केला जात असे हा प्रश्न आपल्या मनांत येथे येणे साहजिक आहे. असा राजा निर्माण करण्याच्या पद्धतीला "राजसूय" असें नांव आहे. (" राज्ञ एव राजसूयम । राजा वै राजसूयेन इष्ट्वा भवति । " — ऐ० ब्रा.). राजसूय यज्ञ म्हणजे राजा निर्माण करण्याचा यज्ञ. हा राजा कसा निर्माण होत असे हें पाहणें बोधप्रद असलें तरी या लेखांत त्याचे विवेचन करणें शक्य नाहीं. फक्त येथें एवढेंच सांगतां येईल कीं वैदिक काळांत राजाचें निर्वाचन (election) होत असे. राजसूय हा राजाला राजसिंहासनावर अधिष्ठित करण्याचा विधि होता. लोकांची समिति राजाला आदेश देत असे आणि राजा ते आदेश पालन करण्याची शपथ घेत असे. ऋग्वेद १०।१७३, अथर्ववेद ६।८७,८८, आणि ऐतरेय ब्राम्हणांतील राजसूय प्रकरण या दृष्टीने पाहावें.

राष्ट्रशक्तीचें स्वरूप आणि प्रभाव यांचें येथवर वर्णन झालें पण ही राष्ट्री मुळी उत्पन्नच होते कोठून ? राष्ट्रीचें उत्पत्तिस्थान कोणतें ? व ती तेथून प्रसार कशी पावते ? या गोष्टींची कल्पना सूक्ताच्या राहिलेल्या भागांत दिली आहे.

मम योनिरप्सु अन्तः समुद्रे ।

"समुद्रांतील जलप्रवाहांत माझें उत्पत्तिस्थान आहे." येथील समुद्र आणि 'आप्'—जल हीं रूपकात्मक आहेत हें स्पष्ट आहे. सायणाचार्यांनीं आध्यात्मिक दृष्टीने समुद्र म्हणजे परमात्मा आणि आप म्हणजे व्यापनशील बुद्धिवृत्ति असा अर्थ केला आहे. "समुद्द्रवन्ति अस्मात् भूतजातानि इति समुद्रः परमात्मा । तस्मिन् अप्सु व्यापन शीलासु धीवृत्तिषु अन्तः मध्ये यत् ब्रम्ह चैतन्यं तन्मम कारणम्" असें सायणाचार्य म्हणतात. व्यावहारिक दृष्टीने समुद्र=संघटित होऊन उत्कर्षाकरितां केलेली हालचाल असा अर्थ पंडित सातवळेकरांनी केला आहे. "(सं) एक होकर (उत्) उत्कर्षका साधन करने के लिये जो (द्र, द्रा) हलचल की जाती है, उसका नाम 'समुद्र' (सं+उत्+द्रा) है ।" असें ते म्हणतात. तेव्हां समुद्र म्हणजे राष्ट्रांतील अगाध जनसमुदाय असा अर्थ घेण्यास हरकत नाहीं. या अगाध समुदायाची जो चळवळ, त्या चळवळींतील अप्सु—व्यापन शील धीवृत्तींतून—विचार शीलतेंतून जें चैतन्य निर्माण होतें त्यांत या राष्ट्रीचा-राष्ट्र शक्तीचा उदय होतो, व असा उदय झाल्यावर ही राष्ट्रशक्ति 'विश्वा भुवनानि'—सर्व भूतजातांना व्यापून राहते, आणि "शरीरानें द्युलोकाला स्पर्श करते" मूर्तिमंत द्युलोकाला खाली आणते. द्युलोक म्हणजे स्वर्ग. स्वर्ग हें सुखनाम आहे. स्वर्ग म्हणजे एखादा विशिष्ट प्रदेश किंवा एखादी वस्तु नसून तो सर्वांनी इच्छिलेली, सुखमय अवस्था* आहे. (मीमांसा सूत्रांच्या ६ व्या अध्यायांतील स्वर्गकामाधिकरणावरील शाबर भाष्य पाहा). जनसमुदायाच्या चैतन्यमय जीवनांतून राष्ट्रशक्तीचा उदय होतो, ती सर्व भूतजातांना व्यापते व शेवटी मूर्तिमंत सुखस्वरूप स्वर्गाला पृथ्वीवर आणते.

अशा प्रकारें उदित झालेली ही राष्ट्री वायुवेगानें राष्ट्रभर पसरते आणि विशालरूप धारण करते ही गोष्ट शेवटल्या ऋचेंत सांगितली आहे.

अहमेव वात इव प्रवामि
आरभमाणा भुवनानि विश्वा ।

"सर्व भुवनांना उत्पन्न करीत मी वाऱ्याप्रमाणें—वायुवेगानें सर्वत्र प्रवर्तित होतें." हीं उत्पन्न होणारीं सर्व भुवनें म्हणजे राष्ट्रांतील विविध प्रकारच्या कार्यांची विविध केंद्रें होत. ही सर्व केंद्रें मानवी संस्थांच्या रूपानें कार्य करतात. राष्ट्रशक्तीच्या उदयाबरोबर या सर्व मानवी संस्थांना स्फुरण मिळतें. त्या सर्व कार्यक्षम, विकासक्षम होतात व त्यांच्याद्वारें राष्ट्रीचाच एवढा मोठा विकास होतो कीं ती सर्व द्यावा-पृथिवीलाहि व्यापून राहते. राष्ट्र शक्तीचा महिमा असा आहे.

सारांश, राष्ट्रीचे—राष्ट्रशक्तीचें कार्य व स्वरूप थोडक्यांत असें आहे.

---

* "यन्न दुःखेन संभिन्नं, न च ग्रस्तमनन्तरम् ।
अभिलाषोपनीतंच तत्पदं स्वःपदास्पदम् ॥" —विष्णुपुराण

१. राष्ट्रीचा—राष्ट्रशक्तीचा आविष्कार राष्ट्रांतील धनशक्तित व ज्ञान शक्तीच्या रूपाने होतो.

२. ही धनशक्ति व ज्ञानशक्ति अनेक केंद्रांत स्थित असते व अनेक केंद्रांत स्फुरण पावते.

३. राष्ट्रशक्तीचें पुरुत्र विधारण झालेलें असतें. राष्ट्रांतील ज्ञानशक्ति आणि धनशक्ति ही राष्ट्रभर पसरलेली असते ती विशिष्ट व्यक्तींत केंद्रित झालेली नसते.

४. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचें जीवन राष्ट्रशक्तीवर आधिष्ठित असते.

५. या राष्ट्र शक्तीचा अनादर करणारे लोक अखेर नाश पावतात.

६. राष्ट्रशक्ति ही समाजांतून वीर, ज्ञानी, द्रष्टे आणि मेधावान पुरुष उत्पन्न करते.

७. राष्ट्रशक्ति ही वीरांना आयुधें देते व लोककल्याणार्थ युद्ध करते.

८. राष्ट्रशक्ति लोकांवर पालक निर्माण करते.

९. राष्ट्रशक्तीचा उगम जनसमुद्राच्या चैतन्यमय जलप्रवाहातून (जीवनांतून) होतो.

१०. राष्ट्रशक्तीचा उदय होताच ती सर्व मानवी संस्थांना वायुवेगाने व्यापते. व त्यां द्वारें राष्ट्रांत उत्कर्ष व सुखें निर्माण करते.

आता आपण पहिल्या दोन ऋचांकडे वळूं. सर्व राष्ट्राला व्यापून असलेली ही राष्ट्रशक्ति रुद्र, वसु, आदित्य आणि विश्वेदेव यांच्या बरोबर फिरते. त्याच प्रमाणे ती मित्रावरुण, इंद्राग्नि आणि दोन अश्विदेव यांना धारण करते. या पैकी रुद्र, वसु, आदित्य आणि विश्वदेव हे गण आहेत तर मित्रावरुण, इंद्राग्नि आणि आश्विनौ हीं देवताद्वन्द्वें म्हणजे जोड्या आहेत. वैदिक कालांतील राष्ट्रांत ज्या वेगवेळ्या संस्था होत्या त्यांची प्रतीके या देवता होत.

रुद्रगण हा वीरांचा गण आहे. यांचा सर्वात छोटा गण ११ चा असें. ११, १२१, १३३१ या क्रमाने तो वाढत जाई. या गणांचे अनेक प्रकार व त्यांची विविध कार्यें यांची कल्पना यजुर्वेदांतील रुद्राध्यायावरून येते. यांच्या जवळ अनेक प्रकारचीं शस्त्रें असत. पण धनुष्याकरिता यांची प्रसिद्धि असे. रुद्राध्यायाच्या सुरुवातीच्या मंत्रांतच रुद्राच्या धनुष्यबाणाची स्तुति आहे. वसूंचा गण हा धनोत्पादन करणाऱ्यांचा गण होय. हा आठांचा गण आहे. आदित्यांचा गण हा स्वातंत्र्य टिकविणाऱ्यांचा गण होय. यांचें विशेश कार्य म्हणजे राष्ट्रांतील व्यवस्था ठेवणें. राष्ट्रांत शांतता आणि सुव्यवस्था ठेवणें हें त्यांचे विशेष कार्य होतें. आदित्यांचा गण १२ चा असे. विश्वेदेवांत सर्व ज्ञानवान् देवांचा समावेश होत असे. यांचें कार्य ज्ञानसंर्वधन करण्याचें असे. विश्वेदेवांची गणसंख्या ठराविक नव्हती.

या देवगणांशिवाय देवतांच्या कांही जोड्या असत. मित्रावरुण ही जोडी मैत्रभाव आणि न्याय निष्ठुरता यांची आहे. मैत्रभावांत न्यायित्व पाहिजे, आणि न्यायाच्या ठिकाणी मैत्रभाव असावा असें ही जोडी दाखविते. इन्द्राग्नि ही जोडी बल आणि

ज्ञान यांच्या सहभावाची द्योतक आहे. अश्विदेवांची जोडी सेवाधर्माचें प्रतीक आहे. अश्विदेव हे कोणाच्याहि मदतीस धावून जात. शिवाय ते देवांचे वैद्य होते. वैद्य म्हणून ते चिकित्सक व शस्त्रवैद्य यांचे प्रतीक आहेत असें पंडित सातवळेकर म्हणतात.

दुसऱ्या ऋचे मध्ये सोम, त्वष्टा, पूषा आणि भग या देवता आल्या आहेत. या पैकीं सोम ही उत्साह आणि बल यांचे वर्धन करणारी देवता आहे. त्वष्टा हा देवांचा शिल्पकार आहे. राष्ट्रांतील शिल्पकार व कारागिर यांचा तो प्रतीक आहे. पूषा ही पोषणशील देवता असून धन वर्धन करणारी आहे. हिची गणना आदित्यांत आहे. भग हाहि आदित्यांपैकीं एक आहे. त्याचें काम राष्ट्रांत धनविभाग करण्याचें आहे. याशिवायहि अन्य देवता त्या त्या संस्थेच्या प्रतीक आहेत. त्या सर्वांतून राष्ट्री ओतप्रोत भरलेली आहे. या सर्वांच्या विकासांतून राष्ट्रशक्तीचा विकास होत आहे.

समष्टींत समावलेली ही राष्ट्रशक्ति राष्ट्रांतील विविध संस्थांतून अशी व्यक्त होत असताना समाजांतील व्यक्तीचें या सर्व संस्थांशीं आणि त्याद्वारें राष्ट्रशक्तीशी कोणतें नातें आहे हें ठरविणें अवश्य आहे. याची कल्पना दुसऱ्या ऋचेंतील उत्तरार्धांत दिली आहे.

अहं दधामि द्रविणं हविष्मते
सुप्राव्ये यजमानाय सुन्वते ।

"हवींनी यज्ञ करणाऱ्या, आणि तो शोभन हवि देवांना देऊन संतुष्ट करणाऱ्या सवनशील यजमानाला मी धन देते." राष्ट्री ही यजमानाला म्हणजे यजन करणाऱ्याला धन देते. पण कोणत्याहि मनुष्याला हें धन दिलेलें नसतें. जो हविष्मन् म्हणजे हवि देणारा आहे आणि हवींनी देवांना संतुष्ट करणारा आहे, त्याच प्रमाणे जो सवनशील म्हणजे सततोद्योगी श्रमशील आहे, अशा करितांच राष्ट्री धन धारण करते. जो मनुष्य धन केवळ स्वतःकरितांच ठेवतो, देवांना म्हणजे राष्ट्रांतील संस्थांच्या प्रतीकांना समर्पण करीत नाहीं, आणि जो श्रमशील नाही अशाकरिता राष्ट्री धनाचें धारण करीत नाहीं. तात्पर्य व्यक्तीला राष्ट्राकडून जें मिळतें त्याचा उपयोग राष्ट्रांतील संस्था वर्धन करण्याकडेच झाला पाहिजे. यज्ञामध्ये ही कल्पना आहे. मागे राजसूय यज्ञाचा निर्देश आला आहे. राजसूय यज्ञाने राजा निर्माण होतो. राजा निर्माण झाल्यावर त्याला सर्वमेध यज्ञ करावा लागतो. या सर्वमेध यज्ञावरून यज्ञाची कल्पना आपल्याला येऊं शकेल. सर्वमेध यज्ञाची कल्पना शतपथ ब्राह्मणांत अशी दिली आहे.

ब्रह्म वै स्वयंभुस्तपोऽतप्यत । तदैक्षत, न वै तपस्यानन्त्यमास्ति । हन्ताहं भूतेषु आत्मानं जुहवानि, भूतानिचात्मनि इति । तत् सर्वेषु भूतेषु आत्मानं हुत्वा भूतानिचात्मनि, सर्वेषां भूतानां श्रैष्ठ्यं, स्वाराज्यं, आधिपत्यं पर्येत्, तथैव एतद्यजमानः सर्वमेधे सर्वान् मेधान् हुत्वा सर्वाणि भूतानि श्रैष्ठ्यं, स्वाराज्यं आधिपत्यं पर्येति ॥"

स्वयंभु ब्रह्माने तप केलें आणि त्याला दिसून आलें की तप हें कांहीं साध्य नव्हे. तेव्हा त्याने विचार केला की मी माझें सर्वभूतजातींत, व सर्वभूतजातींचें

माझ्यांत हवन करीन. त्या प्रमाणे त्याने आपलें सर्व भूतांत हवन केलें आणि सर्व भूतांचे आपल्या आत्म्यांत हवन केलें. यामुळें तो सर्वभूतांत श्रेष्ठ बनला व त्याला स्वाराज्य आणि आधिपत्य प्राप्त झालें. जो यजमान या प्रमाणे आपलें सर्वभूतांत हवन करील तो सर्वांत श्रेष्ठ बनेल व त्याला स्वाराज्य आणि आधिपत्य प्राप्त होईल.

सारांश यज्ञाच्या ठिकाणी सर्वस्वार्पणाची कल्पना आहे. राष्ट्रदेवी यजमाना-कडून अशा सर्वस्वार्पणाची अपेक्षा करते. अशा प्रकारचा यज्ञ भुवनपुत्र विश्व-कर्म्याने केला होता, असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे. तो कसा केला असेल याची थोडीशी कल्पना ऋग्वेद १०।८१ या सूक्तावरून येते. या सूक्ताच्या पहिल्याच मंत्रांत सांगितलें आहे—

य इमा विश्वा भुवनानि जुह्वत्
ऋषिर्होता न्यसीदत् पिता नः ।
स आशिषा द्रविणमिच्छमानः
प्रथमच्छदवराँ आ विवेश ॥

—आमचा अतींद्रियार्थदर्शी याजक पिता यज्ञस्थानीं बसला होता. त्याने सर्वभूतांचें हवन केलें. शुभेच्छेने धनप्राप्ती व्हावी अशी त्याची इच्छा होती. म्हणून तो सर्वांत उच्चस्थानीं असून सुद्धा खालीं राहणाऱ्यांत मिळून गेला.

या ते धामानि परमाणि यावमा
या मध्यमा विश्वकर्मन्नुतेमा ।
शिक्षा सखिभ्यो हविषि स्वधावः
स्वयं यजस्व तन्वं वृधानः ॥

—विश्वाची रचना करणाऱ्या हे प्रभो ! तुझें जे परम श्रेष्ठ धाम आहे तसेंच जे मध्यम आणि खालचें धाम आहे, त्यांचे हवन करण्याच्या वेळीं आमच्या सर्व मित्रांना तूं सांग,—" हे शक्तिशाली रक्षक हो ! स्वतःचें वर्धन करून आपल्या शरीराचें हवन करा."

विश्वकर्मन् हविषा वावृधानः
स्वयं यजस्व पृथिवीमुतद्याम् ।
मुह्यन्त्वन्ये अभितो जनासः
इहास्माकं मघवा सूरिरस्तु ॥

—हे विश्वकर्मन् , हवनाच्या अर्पणाने वाढणारा असा तूं पृथ्वी आणि द्युलोकाचें यजन कर. (त्या यज्ञांत सामिल न होणारे) इतर लोक मूढ होऊन भटकत राहोत. आणि येथे आमचा प्रमुख ज्ञानी व धनवान् बनो.

या सूक्तांत सर्वमेधाचे पुढील सिद्धांत आले आहेत. (१) यः भुवनानि जुह्वत् (अहं आत्मानं भूतेषु जुहवानि—श. ब्रा.)—आपलें सर्वस्व भूतहितार्थ समर्पण करणें. (२) सः प्रथमच्छद् अवरान् आविवेश—आपलें उच्चस्थान सोडून खालच्या स्तरांत येऊन मिळणें. (३) स्वयं यजस्व तन्वं वृधानः—आपलें वर्धन करून आपल्या शरीराचें यजन करणें (४) हविषा वावृधानः स्वयं यजस्व—

हंवनामध्यें समर्पण करीत संवर्धित होणें व संवर्धित संपत्तीचा पुन: यज्ञ करणें; आणि (५) मुल्यन्तवन्ये अभितो जनास :—या यज्ञांत भाग न घेणारे मूढ होऊन फिरोत.

यजुर्वेदांतील रुद्राध्यायांतहि समर्पण—संवर्धनाची अशीच कल्पना दिली आहे. "प्राणश्च मेऽपानश्च मे व्यानश्च मेऽसुश्च मे चित्तं च मे आधीतं च मे वाक् च मे मनश्च मे चक्षुश्च मे श्रोत्रं च मे दक्षश्च मे बलंच मे यज्ञेन कल्पन्ताम् ।" —माझे प्राण, अपान, व्यान, असु, चित्त, अध्ययन, वाणी, मन, चक्षु, श्रोत्र, बल, हें सर्व यज्ञांत समर्पित होऊन वाढो. तात्पर्य "मी माझी शक्ति वाढवीन तिचें यज्ञांत समर्पण करीन, आणि त्या समर्पणांतूनच माझें संवर्धन होईल." ही कल्पना सर्व यज्ञाच्या मुळाशी आहे—"हविषा वावृधानः स्वयं यजस्व."

मूळ सूक्ताला सोडून यज्ञाचें हें जास्त वर्णन करण्याचें कारण असें की यज्ञ ही वैदिक काळांतील ज्ञानशक्ति व धनशक्तीच्या पुरुत्र विधारणाची संस्था होती ही गोष्ट लक्षांत यावी. स्वतःच्या समर्पणाने राष्ट्रशक्तीचें संवर्धन, आणि राष्ट्र शक्तीच्या आधारावर आपलें संवर्धन अशा प्रकारे यज्ञ संस्थेच्या द्वारे राष्ट्रांतील ज्ञान आणि धन खेळतें राहत होतें. या संस्थेंत भाग न घेणारे मूढ होऊन भटकावेत; आमच्यांत राहूं नयेत असें एक सूक्तकर्ता इच्छितो; तर त्यांचा नाश होतो असें राष्ट्री त्यांना बजाविते. यज्ञामागील ही भूमिका लक्षांत घेतल्यावर राष्ट्री सूक्तांतील "मी हविष्मान् आणि समर्पणशील (सुप्राव्य), आणि सवनशील यजमानाला धन देते" या राष्ट्रीच्या वचनाचा अर्थ स्पष्ट होईल.

सूक्ताचें विवेचन येथें संपलें. वस्तुतः येथें थांबावयास हरकत नव्हती. पण या सूक्ताबाबत दोन गोष्टींचा खुलासा करणें अवश्य आहे. एक म्हणजे सूक्ताचा हा व्यावहारिक अर्थ आणि सायणाचार्यांनी केलेला आत्मपर अर्थ यांचा परस्पर संबंध कसा लावावा. आणि दुसरी गोष्ट म्हणजे या सूक्ताचा असा व्यावहारिक विशेषतः राष्ट्रविषयक अर्थ करण्यास कोठें परंपरेचा आधार मिळतो काय. या सूक्ताचा आध्यात्मिक आणि व्यावहारिक अर्थ यांचा परस्पर संबंध पंडित सातवळे-करांनी आपल्या विवेचनांत दाखविलेला आहे. त्यांनी या सूक्ताच्या विवेचनाला "ब्रम्हशक्तीसे प्रभावित राष्ट्रशक्ति" असेंच शीर्षक दिलें आहे. त्या विवेचनाची येथे पुनरुक्ति न करतां वाचकांनी तें वाचावें एवढेंच फक्त सुचवितो. दुसऱ्या मुद्याबाबत मात्र येथें थोडेसे लिहितो.

कल्याण मासिकाच्या शक्ति अंकांत श्री० नलिनी मोहन सन्याल यांचा "वेद चण्डी, और गीतामें शक्ति तत्व" या नांवाचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत या सूक्ताचें विवेचन करून त्यांनी या कल्पना गीतेंत कशा प्रकारें आल्या हे दाखविले आहे. त्यांनी दाखविलेल्या कल्पनाशिवाय अधिकहि कल्पनासाम्यें दाख-विता येतात. गीता हा कर्मयोगपर ग्रंथ आहे व त्यांत अध्यात्माच्या आधारावर नीति विचार—कर्तव्याकर्तव्यविचार केलेला आहे. गीतेंत दोन प्रवृत्तींचें विवेचन आहे. एक दैवीसंपत्तीने युक्त असलेली प्रवृत्ति व दुसरी आसुरीप्रवृत्तीने युक्त असलेली प्रवृत्ति. भारतीय युद्धांतील एका पक्षाचा नायक दुर्योधन व त्याचे सोबती आसुर संपत्तीने युक्त आहेत. दुसऱ्या पक्षाचा नायक अर्जुन हा दैवी संपत्तीने युक्त आहे.

श्रीकृष्ण हा त्यावेळच्या राष्ट्रशक्तीचा प्रतीक आहे. भारतीय युद्धाच्या मागे केवळ प्रादेशिक राज्य मिळवण्याचा हेतु नसून समाजांत कोणत्या प्रवृत्तीची धारणा असावयास पाहिजे हा हेतु आहे. दैवीसंपत्तीने युक्त अशा पुरुषांनी समाजधर्धन करावें हा हेतु श्रीकृष्णाचा आहे. म्हणूनच त्यांनी अर्जुनाला हाताशीं धरलें आहे. श्रीकृष्णांच्या उपदेशानंतर सुद्धा अर्जुनाने युद्धांतून निवृत्त होण्याचेंच ठरविलें असतें असें घटकाभर मानलें तरी श्रीकृष्णाने तें युद्ध घडवून आणलेंच असतें असें म्हणावयास जागा आहे. (पाहा गीता ११।३२) सारांश भारतीय युद्धाचें महत्त्व वैयक्तिक दृष्टीने पांडवांना राज्य मिळण्यांत असलें तरी राष्ट्रीय दृष्टीने राष्ट्रशक्तीचा विकास दैवी गुणयुक्त सत्तेमधून व्हावा असेंच महत्त्व आहे. दैवीसंपत्, राष्ट्रशक्ति आणि राष्ट्रांतील सत्ता यांचा असा अन्योन्य संबंध आहे. दैवीसंपत् हीच राष्ट्रविकासाला कारण होते. आसुरी संपत् राष्ट्राला विनाशाकडे लोटते. राष्ट्रीय दृष्टीने गीतेची ही शिकवण आहे असें म्हणावयास कांही हरकत नाही. राष्ट्रीय दृष्टीने दैवीसंपत् संपादन करण्यास शिकविणारा आपल्या वाङ्मयांत गीता हा एक ग्रंथ आहे असें आपल्याला म्हणता येईल. पण गीतेपूर्वी किंवा निदान गीतेशिवाय इतर कांही ग्रंथ दैवी संपत्तीची शिकवण देणारे होते काय ? असतीलहि. आणि किती असतील हें जरी आज न सांगतां आलें तरी दैवी संपत्तीची शिकवण देणारें हें एक सूक्त होतें असें म्हणावयास जागा आहे. गीता आणि हें सूक्त यांच्यांत विचारसाम्य आहे हें एक कारण तर त्याला आहेच. पण तेवढें एकच कारण नाही. या सूक्ताचा दैवीसंपत् प्राप्त करण्याशीं संबंध आहे असें प्रत्यक्ष वचन आहे.

अथर्व वेदाच्या शेवटीं अथर्वशीर्ष म्हणून एक भाग येतो. अथर्वशीर्ष म्हणजे अथर्व वेदाचा शिरोभाग. यांना उपनिषदांसारखेंच महत्त्व आहे. या अथर्वशीर्षां पैकी देव्यथर्वशीर्ष एक असून त्याला फार महत्वाचें स्थान आहे. या देव्यथर्वशीर्षांत असें वचन आहे,

" अहं रुद्रेभिर्वसुभिश्चरामि······सुप्राव्ये यजमानाय सुन्वते ॥ अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् । अहं सुवे पितरमस्य मूर्धन् मम योनिरप्स्वन्तः समुद्रे ॥ य एवं वेद । स दैवीं संपदमाप्नोति ॥

अशा प्रकारें या सूक्तांतील मंत्र उध्दृत करून "हें जो जाणतो (केवळ तोंडाने म्हणून नाही) त्याला दैवीसंपत्तीची प्राप्ती होते." या सूक्ताच्या ज्ञानाने मनुष्यामध्ये दैवी संपत्तीचा विकास होतो. असा दैवी संपत्तीने युक्त असलेला पुरुषच राष्ट्रीची उपासना करण्यास समर्थ होतो असा गीतेचा अभिप्राय आहे.

आणि दुर्गासप्तशतींत तर या सूक्ताचा प्रत्यक्ष राजाशींच संबंध दाखविला आहे. दुर्गा सप्तशती हा ग्रंथ शक्तीच्या उपासनेचा ग्रंथ आहे हें सर्वश्रुत आहेच. सप्तशतीचा पाठ करताना या राष्ट्री सूक्ताचा पाठ अवश्य करतात. या सूक्ताला 'देवीसूक्त' असें नांव आहे. हें सूक्त देवीसूक्त म्हणून ओळखलें जाते, आणि सप्तशती हा देवीच्या उपासनेचा ग्रंथ आहे एवढाच केवळ या दोघांचा संबंध नाही. त्यांचा आंतरिक संबंध आहे. सप्तशतीच्या उपक्रमोपसंहारावरून हें दिसतें. सप्तशतीच्या प्रथमाध्यायांत अशी कथा आहे.

पूर्वी स्वारोचिष मन्वन्तरांत सुरथ नांवाचा एक राजा होऊन गेला. तो संपूर्ण पृथ्वीचें राज्य करीत होता. तो राज्य करीत असता 'कोला विध्वंसी' नामक क्षत्रिय त्याचे शत्रु झाले. राजा सुरथाची दण्डनीति फार प्रबळ असे. कोला विध्वंसीशी सुरथाचें युद्ध झालें त्यावेळी कोला विध्वंसी संख्येने कमी असूनहि त्यांनी सुरथाचा पराभव केला. राजा पराजित होऊन आपल्या नगरांत आला व तेथे फक्त आपल्या देशांचे राज्य करूं लागला. पण तेथेहि प्रबल शत्रूंनी त्याच्यावर हल्ला केला.

सुरथ राजा अगोदरच दुर्बल झाला होता. आता त्याच्या दुष्ट आणि बलवान् अमात्यांनी त्या राजाचे सैन्य आणि कोश आपल्या ताब्यांत घेतले. अशा प्रकारे आपलें प्रभुत्व गमावलेला सुरथ राजा मृगयेचे निमित्त करून एकटाच घोड्यावर बसून अरण्यांत निघून गेला व तेथे मेधा नामक ऋषीच्या आश्रमांत जाऊन पोंचला.

मेधा ऋषीच्या आश्रमांत कांहीं काळ राहिल्यावर एके दिवशीं त्या आश्रमांत फिरत असता त्याच्या मनांत आपल्या राज्यासंबंधीं असे विचार आले—"माझ्या पूर्वजांनी पूर्वी जिचें पालन केलें ती नगरी मला अखेर सोडावी लागली. माझे दुराचारी भृत्यगण तिचें धर्मतः पालन करतात की नाही कोण जाणे. मदोद्धत प्रधान शूरहस्ती आता शत्रूला वश होऊन कोणकोणते उपभोग भोगीत असेल बरें. मेहरबानी, द्रव्य आणि भोजन मिळाल्यामुळे सर्वदा माझ्या मागे मागे फिरणारे माझे मित्र लोक आता खास दुसऱ्या राजाची अनुवृत्ति करीत असतील. अपव्यय करणारे ते सर्व आता एकसारखा खर्च करून मी अत्यंत कष्टाने साठवलेला खजिना रिकामा करून टाकतील."

अशा अनेक विचारांनी तो संत्रस्त होऊन गेला. व मेधा ऋषीकडे जाऊन त्याने आपली स्थिति निवेदन केली. मेधा ऋषीने त्याला देवीचें माहात्म्य सांगितले. त्या सर्वच कथांमधून राजाच्या मनावर असें बिंबविले कीं जेव्हा जेव्हा जगावर आसुर प्रवृत्तीच्या लोकांचा पगडा बसला तेव्हा दैवी गुणांच्या एकीकरणाने आविष्कृत झालेल्या चण्डिकेने जगाला आसुरी सत्तेतून सोडाविले. एवढेंच नव्हे तर

> " एवं भगवती देवी सा नित्यापि पुनः पुनः ।
> संभूय कुरुते भूयः जगतः परिपालनम् ॥ " (स. श. १२।३६)

असेंहि त्याला सांगून त्या जगद्धात्री चंडिकेला प्रसन्न करण्यास राजाला तप करण्यास सांगितलें.

मेधा ऋषीच्या सांगण्या प्रमाणें सुरथ राजाने तप केलें. तीन वर्षेपर्यंत त्याने " देवी सूक्ताचा " जप केला. देवीचें एकाग्रतेने चिंतन केलें. तेव्हां त्या जगद्धात्री जगदंबिकेचा त्याला साक्षात्कार झाला. जगदंबेच्या कृपेने त्याचे शत्रू नाहीसे होऊन त्याला त्याचें राज्य प्राप्त झालें. एवढेंच नव्हे तर पुढील जन्मी "सावर्णि " नांवाचा मनु होण्याची योग्यता त्याला आली.

सप्तशती ग्रंथाचा एक विशेष असा आहे की त्यांतील देवीच्या स्तवनांत सर्वच प्रार्थना विश्वकल्याणाकरितां आहेत. वैयक्तिक सुखाच्या हेतूने कोणतीहि मागणी नाही. विश्वाचें पालन करणारी जी शक्ती ती जगदंबिका आणि तिचें आवाहन देवीसूक्ताने होते. या देवीसूक्ताच्या जपमननानेच सुरथाने चंडिकेला प्रसन्न

केले व तो मन्वन्तराधिपति झाला. सुरथ राजा तोच पण प्रथम राजा असताना त्याला आपले राज्य टिकविता आलें नाही तो स्वतः चांगला असला असला तरी त्याचें प्रधानादिक दुर्वृत्त होते. त्याचा परिवार खुशमस्कऱ्यांचा होता. आपला राजा हरतो हें दिसताच ते त्याला सोडून गेले व जो सत्ताधारी असेल, त्याच्या मागे लागले. राज्यातील सैन्याचा व कोशाचा त्यांनी आपल्या स्वार्थी हेतूकरितां उपयोग केला. अशा परिस्थितीत सुरथाला आपलें राज्य सोडावे लागलें. पण सुमेधा ऋषीच्या उपदेशाने जगद्धात्री चंडिकेचे स्वरूप पूर्णपणें कळतांच आणि देवीसूक्ताच्या (राष्ट्री सूक्ताच्या) तीन वर्षे केलेल्या अखंड जपमननाने त्याच्या मनावर संस्कार होताच तो पूर्वीचा दुर्बल सुरथ राहिला नाहीं. त्याने आपलें गेलेलें राज्य मिळविले एवढेंच नव्हे तर मन्वन्तराधिपतीची त्याला योग्यता प्राप्त झाली. पुराणांच्या मतें देवीसूक्ताचा राष्ट्राशीं एवढा घनिष्ठ संबंध आहे. म्हणूनच ऋग्वेदांतील या सूक्तांत राष्ट्रशक्तीचें वर्णन आहे असें म्हणावेसें वाटतें.

'वाग्वैजयन्ती'चें पुनर्मूल्यन

★ माधव गोपाळ देशमुख

[विदर्भ साहित्य संघाच्या, गडकरी स्मारक समितीच्या विद्यमाने कै. गडकरी यांच्या ३३ व्या स्मृतिदिन प्रसंगीं ता. २३ जानेवारी १९५२ रोजीं वाचलेला प्रबंध. या समारंभाच्या अध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांनी समारोपादाखल असे उद्‌गार काढले, "गडकऱ्यांच्या काव्याच्या पुनर्मूल्यनाचा अभिनव असा प्रयत्न या प्रबंधामुळें प्रथमच होत आहे. वाङ्मयावरील भक्ति आंधळी असूं नये, चिकित्सक रसिकाचीच असावी, या दृष्टीने व टीकाविषयक ऐतिहासिक दृष्टिकोण म्हणूनहि डॉ. देशमुख यांचा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण आणि स्वागतार्ह आहे".]

कोणत्याहि वस्तूचें सम्यग्‌दर्शन घ्यावयाचें असल्यास त्या वस्तूपासून थोडे तरी लांब गेल्यावाचून तें नीट होऊं शकत नाही. कवि गोविंदाग्रज दिवंगत होऊन आज ३३ वर्षें पूर्ण झालीं. आधुनिक कविता आज सुमारे पाऊणशे वर्षांची आहे. त्या हिशेबाने गोविंदाग्रज हे आधुनिक मराठी कवितेच्या मध्यकालांत होऊन गेले हें स्पष्ट होईल. गोविंदाग्रजांच्या पूर्वी केशवसुत, टिळक, विनायक व बालकवि हे मराठींतील प्रमुख चार कवि होऊन गेले. आणि नंतरच्या काळांतहि ताम्बे, बी, चंद्रशेखर व माधव ज्यूलियन हेहि कवि दिवंगत झाले आहेत. आज विद्यमान असलेल्या कवींत वि. दा. सावरकर यांची ओजस्वी कविता, विदर्भांतील देशपांडे त्रयीची गूढवादी कविता, तसेंच रविकिरणमंडळांतील यशवंत गिरीशादिकांची गेय कविता व मर्ढेकर, य. द. भावे, मुक्तिबोध इत्यादिकांची नवकाव्य सम्बोधित कविता ही आपल्या डोळ्यासमोर आहे. पूर्वीचे केशवसुत व आजचे नवकवि या दोन टोकांच्या मधोमध गडकरी येतात. या दृष्टीने गोविंदाग्रजांची वाग्वैजयंती आधुनिक मराठी काव्यांत मध्यमस्थानी असून तिचें मूल्यमापन करण्यासाठी आज अगदी ठीक समय आलेला आहे. किंबहुना गोविंदाग्रज मानतात त्याप्रमाणें ते केशवसुतांचे सच्चे चेले आहेत काय ? तसेंच त्यांचे अनुकरण करण्यांत धन्यता मानणारे खंदे साहित्यिकहि आज निष्प्रभ होण्याच्या पंथाला लागलेले आहेत या दृष्टीने आधुनिक कविमंडलांत त्यांची जागा कोणती ? हें ठरविणें बरेच सोपें झालें आहे. नव्हे, त्यांच्या काव्याचें स्थलस्थितिसापेक्ष असें सम्यक् दर्शन (perspective) घेण्यासाठी एवढा कालावधि लोटणे जरूरच होतें.

नाट्यवाङ्मयाच्या क्षेत्रांत गडकऱ्यांनी श्री. कृ. कोल्हटकरांना गुरुस्थानीं मानिले. टीकाप्रांतातील त्यांच पट्टशिष्य म्हणजे गडकऱ्यांचे गुरुबंधु श्री. माडखोलकर यांना गोविंदाग्रजांचे पहिले टीकाकार म्हणून संबोधिलें पाहिजे. परन्तु 'आधुनिक कविपंचकां'तील त्यांचा 'गोविंदग्रजांची कविता' हा लेख गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर लगेच लिहिलेला असल्यामुळे व आजच्या माडखोलकरांचें तें तीन तपांपूर्वीचें लेखन

असल्यामुळे त्यांतील प्रत्येक कवितेवरील मतांची दखल न घेतां गोविंदाग्रजांवरील त्यांच्या टीकेचा आशय तेवढा लक्षांत घेण्यासारखा आहे. कारण त्यांत तत्कालीन तरुण रसिकांच्या गोविंदाग्रजांकडे पाहणाऱ्या मनोवृत्तीचें प्रतिबिंब पडलें आहे.

गोविंदाग्रजांचा आणि त्यांच्या नंतरचा रविकिरणमंडळाचा काळ केवळ कल्पकतेने भुलून जाणाऱ्या कवींचा व रसिकांचा काळ होता. त्यांना केशवसुत-टिळकांची साधीभोळी कविता न आवडतां त्यांचा लोभ गोविंदाग्रजांच्या शब्दसुंदर कवितेवर जडला; याचें कारण त्यावेळच्या माडखोलकरांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "आम्ही महाराष्ट्रीय बौद्धिक करामतीचे विशेष चाहते आहों. विनायक, केशवसुत, टिळक आणि बालकवि आम्हांला भुलवावयाला असमर्थ ठरले याचें कारण आम्हांला क्षणभर स्तिमित करील असें बुद्धिवैभव, त्यांत आमच्या दृष्टीला पडलें नाही·····महाराष्ट्राच्या बुद्धीला गोविंदाग्रजांनी थक्कित केलें व म्हणून गोविंदाग्रज महाराष्ट्राला प्यार झाले." पण गोविंदाग्रजांची ही लोकप्रियता इतक्या झपाट्यानें ओहोटीस लागली की काव्य, नाटक आणि विनोद या तिन्ही क्षेत्रांतील त्यांना एका काळीं मिळालेली लोकप्रियता हा आता एक ऐतिहासिक संशोधनाचा विषय होण्याची वेळ आली आहे! विशेषतः काव्याच्या प्रान्तांत वाग्वैजयन्तींतील 'राजहंस' 'मुरली', 'प्रेम आणि मरण', 'घुबडास', 'कलगीचे गाणें', 'फुटकी तपेली' 'गुलाबी कोडें' हीं पावशतकापूर्वी रसिकांच्या तोंडीं असलेलीं गीतें आज विस्मृतींत इतकीं दडून गेलीं आहेत की गोविंदाग्रजांच्या स्मृतिदिनाच्या दिवशीं तो विस्मृतीचा पर झटकून त्यांचे पैलू उघडकीला आणणें, किंबहुना त्यांच्या तेजाच्या प्रकाशांत व त्यांच्या इतरहि कवितांवरून मागोवा घेत गोविंदाग्रजांच्या कविमनाचें वा कविप्रतिभेचें विश्लेषण करणें हें आज अगत्याचें झालें आहे. श्री. माडखोलकरांनी 'गोविंदाग्रजांची कविता' हा लेख लिहिला त्यावेळीं त्यांना कवीच्या संपूर्ण कृति एका ठिकाणीं उपलब्ध झाल्या नाहीत. 'घुबडास' या कवितेचा त्यांनी 'घुबड' म्हणून उल्लेख केला असून ही कविता पूर्ण वाचावयास न मिळाल्यामुळे नुसत्या उल्लेखावरच भागविणें त्यांना प्राप्त झालें! 'वाग्वैजयंती'च्या आजवर निघालेल्या सातहि आवृत्ति गोविंदाग्रजांच्या मरणोत्तरच प्रसिद्ध झाल्या. परंतु मूळ काव्यसंग्रह, त्याचें नांव, अर्पणपत्रिका, वाचकांस विज्ञापन, 'ईशस्तवन' व 'माझी पहिली कविता'पासून तों 'माझा मृत्युलेख' पर्यंतची संपूर्ण तयारी गोविंदाग्रजांच्या डोळ्यांसमोरच झाली असली पाहिजे.

गोविंदाग्रजांची प्रतिभा ही साहित्याच्या अनेक क्षेत्रांत विहार करणारी असल्यामुळे तिला आपल्या काव्याचें अंतरंग हेंहि अलिप्तपणें पाहतां आलें. ही कविता आहे, गद्य नाही म्हणून हिला कांही निर्बंध नाही हें मनांत आणून मगच वाग्वैजयंती हातांत धरा, असें त्यांनी वाचकांस विज्ञापन केलें आहे. आपल्या काव्यसंग्रहाला रसनिष्ठ वा भावनिष्ठ असें एखादें नांव न देतां काव्यसुंदरीच्या गळ्यांत घालण्याची अशी एक शब्दनिष्ठ काव्यमाला रचली म्हणून तिला त्यांनी "वाग्वैजयंती" हें अभिधान दिलें व ईशस्तवनांत—

"वाग्वैजयंतींत शब्दमणि अगणित
स्वीकरुनि कविराणित, हंसुनि खुलवीं जरा!
गोविंदपूर्वपद अग्रज स्मरुनि पद
उधळीं निजहृत्सुखद शब्दरत्नाकरा!"

असे अर्थपूर्ण उद्‌गार काढले आहेत. आपली वाग्वैजयंती अगणित शब्दमण्यांची आहे, त्यांतील कविरणित जरा हसवण्याखुलवण्यासाठी आहे, व आपला शब्दरत्नाकर हृत्सुखद आहे हा त्यांचा सगळ्यांत मोठा विश्वासाचा आधार आहे. जें जें ज्या ज्या वेळीं स्वच्छंद मनाला सुचलें तें तें त्या त्या वेळीं जपून ठेवून ही गंगाजळी तयार झाली आहे (वाचकांस विज्ञापन). माझ्यांत कवित्व नाही, माझा वाचकुता स्वभाव मला कांही सुचूं देत नाही, परंतु उत्सुकतेमुळे माझ्याकडून कांही थोडे बोल निघाले आहेत असें ते 'देवल' या कवितेंत म्हणतात. आपल्याजवळ असलेलें शब्दांचें सामर्थ्य व त्याचें प्रदर्शन करण्याची दुर्दम्य हौस यामुळेच आपण श्रेष्ठ कवि ठरतो अशी त्यांची प्रामाणिक कल्पना होती. 'वेषभूषाकारास सादरार्पित पद्यभूषा' या कवितेंत त्यांची काव्याविषयींची कल्पना अधिक स्पष्टपणें कळून येते. न. चिं. केळकरांच्या 'रचिसि वेषभूषा। अथवा कुसुमचापपाशा ?' या ध्रुवपदांत 'वेषभूषा' बद्दल 'काव्यभूषा' एवढाच बदल ते करतात. येथे 'संशय' अलंकार साधून काव्य आणि वेश या उपमेय उपमानांतील 'भूषा' हा साधारणधर्म सूचित केला आहे. काव्याच्या या पोषाखी पद्धतीला ते 'चित्रकाव्य' म्हणतात.—म्हणजे जुन्या टीकावाङ्मयांत गाजलेला चित्रकाव्य हा शब्द या कवितेंत त्यांनी चांगल्या अर्थानें वापरला आहे. चित्रकाव्य हें अव्यंग असतें व अव्यंग्य हें अधम काव्य आहे, हा 'काव्यप्रकाश'कारांचा विचार त्यांच्या मनांतहि आला नाही. काव्याचीं अंगें या कवितेच्या निमित्ताने त्यांनी स्पष्ट केलीं आहेत. नादभूषा, शब्दभूषा, चित्रभूषा, काव्यभूषा, अर्थभूषा व गूढभूषा हीं पद्याचीं सहा प्रमुख अंगें असून त्या अंगांचें स्पष्टीकरण त्यांनी पुढीलप्रमाणे केलें आहे. पद्याचें प्रमुख लक्षण म्हणजे त्याने रसिकांच्या मनावर मोहिनी घातली पाहिजे. ती मोहिनी पुढील गुणांमुळे कवि सहज रीतीने घालूं शकतो.

१. "मंजुलगुंजारवें रंजवी, कुंज कुंजगत भृंग। घालिसी कुंजमुखावीर रुंजी मृदुपदिं होऊनी दंग" अशा नादमृदु शब्दांत दंग होणें म्हणजे नादभूषा.

२. व्यक्त अर्थाखालीं मूकार्थ दडविणें आणि रसिकांच्या मनांत गूढभाव निर्माण करणें हें शब्दभूषेचें कार्य आहे.

३. वर्णनशक्तीने शब्दांमधून चित्ततरंग हलविणारें चित्र रेखाटणें म्हणजे चित्रभूषा.

४. व्यक्त कल्पनांबरोबर प्रतिभेच्या साहाय्याने रसिकाला अव्यक्तापलीकडे नेणें म्हणजे काव्यभूषा.

५. काव्यांतील शब्द हे पुष्प होत व अर्थ म्हणजे आमोद होय. अशा पुष्पपरिमळवत् साहित्याने हृदयांतील प्रीतिदेवतेचें उद्दीपन करणें म्हणजे अर्थभूषा.

६. काव्याच्या प्रतिबिंबांत आपल्या मनांतील अर्थाचें प्रतिबिंब दिसणें म्हणजे गूढभूषा.

कवितेचीं हीं सहा अंगें स्पष्ट केल्यानंतर 'वेषभूषा' हें सुंदर रमणीवर्णनपर पद्य नसून माझ्यासारख्या वेड्याला गुंगी आणणारें मद्य आहे, असें ते अपह्नुतीने वर्णन करतात. वास्तविक पहातां 'वेषभूषा'कारांच्या कृतीविषयीं आदर व्यक्त करणारी ही कविता आहे. तिच्यांत काव्याचीं अंगें कोणतीं हें सांगण्याचा कवीचा उद्देश नाही. तथापि एक कवि आधीच्या त्याला आदरणीय वाटणाऱ्या कवीविषयी

जेव्हां असे चिकित्सक उद्गार काढतो तेव्हां त्याची एकंदर काव्यविषयक अभिज्ञता व्यक्त होते. वर वर्णिलेल्या सहाहि काव्यांगांत काव्याचें केवळ बहिर्मुख पद्धतीने वर्णन केलेलें आहे. याचें कारण मूळ कविता 'वेषभूषा', त्याच्या कर्त्यास सादरार्पित केलेली 'पद्यभूषा' व स्तवप्रस्तावकांची प्रतिभा ह्या सर्वच बहिर्मुख वृत्तींतूनच निर्माण झाल्या आहेत. प्रतिभेच्या बहिर्मुख वृत्तीला काव्यांतील शब्दांचें, अर्थांचें व शब्दार्थांच्या पुष्पपरिमलवत् साहित्याचें महत्त्व योग्य रीतीने कळतें. शब्द हे नादमधुर असावे, त्याने सर्व प्रकारचे अर्थ व्यक्त करावे, वर्ण्यविषयाचें चित्र हुबेहूब निर्माण करावें किंबहुना व्यक्त कल्पनांतून अव्यक्ताकडे जावें व काव्यादर्शांत रसिकाने आपलें प्रतिबिंब पाहावें; म्हणजे "मला वाटत होतें तेंच कवीने कसें सुंदर वर्णन केलें आहे" ह्याचा रसिकाला अनुभव येऊन त्याचें चित्त हरखून जावें, येथपर्यंतचें काव्याचें स्वरूप गोविंदाग्रजांनी यथायोग्य रीतीने जाणलें. याच त्यांच्या काव्यकल्पनेस अनुसरून त्यांनी 'गुलाबी कोडें' 'चिमुकलीच कविता' 'विरामचिन्हें' 'अरुण' 'पहिले चुम्बन' 'अल्लड प्रेमास' 'एक समस्या' ह्या सर्व प्रसिद्ध कविता रचल्या आहेत. ह्या सर्व कवितांचा आत्मा चमत्कृति हा आहे. शब्दचमत्कृति व अर्थचमत्कृति या बाबतींत गोविंदाग्रजांना हरविणारा कवि क्वचितच आढळेल. कारण त्यांची काव्यविषयक कल्पनाच अशी की ' शब्दासाठी हपापले । अर्थासाठी जन टपले !' (एका बालकवीस पृ. १९४). शब्दांची मजा ही हिमवंतीच्या कणांप्रमाणे आहे. ते पाण्याचे थेंब नसतात किंवा स्फटिकाचे खडेहि नसतात. त्यांचा अस्फुट आकार वाऱ्यावर स्वार होऊन पळत असतो, असेहि ते त्याच कवितेंत म्हणतात. क्षणोक्षणीं शब्दांचा फुलता पोशाख चढवावा, अहंपणाच्या मर्दुमकीचे लाख अलंकार घालावेत, तरल कल्पनांचा तुरा शिरावर डुलवावा म्हणजे आदर्श काव्य होते हीच त्यांची काव्यविषयक कल्पना 'विश्वाची विजयादशमी' या कवितेंतहि आली आहे.

केशवसुतांच्या संप्रदायांतील आधुनिक मराठी कविता ही साध्या विषयांतून मोठा आशय काढण्यासाठी निर्माण झाली. या दृष्टीने केशवसुतांच्या 'म्हातारी'च्या चालीवर गोविंदाग्रजांनी 'हलत्या पिंपळपानास' उद्देशून काव्य लिहिलें. परंतु त्यांत केशवसुतांच्या अनुकरणाशिवाय दुसरा कोणताहि नवीन किंवा मोठा आशय नाही. किंबहुना त्याची रचनाहि विस्कळित झाली आहे. केशवसुतांच्या 'सतारीचे बोल' कानांत घुमत असतांनाच गोविंदाग्रजांनी 'अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस' ही कविता आळविली. परंतु मूळांतील काव्यविषयक आणि संगीतविषयक आत्मप्रत्ययाचा व्यापक आढळ अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेंत एक शतांशहि नाही. किंबहुना साध्या विषयांतून मोठा आशय काढण्याचा त्यांचा सर्वच प्रयत्न उसना वाटतो. 'बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास' 'रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास' 'गुलाबास' 'पाखरास' अशा सर्वच सकारान्त कविता मोठ्या आशयापेक्षा अर्थचमत्कृतीच दाखवितात. इतकेंच काय पण 'रांगोळी घातलेली पाहून' ह्या कवितेंत तर साध्या विषयामधून मोठा आशय काढण्याच्या केशवसुतांच्या मूळ कल्पनेची डघड उघड थट्टाच केलेली आहे. अर्थात् गोविंदाग्रजांच्या अशा सर्व कविता म्हणजे केशवसुतांचें प्रच्छन्न विडंबन होय.

केशवसुतांच्या संप्रदायाचें दुसरें वैशिष्ट्य साधे विषय निवडणें हें होय. 'कवितेसाठी धडपड ' या कवितेंत कवितेसाठी कोणता विषय घ्यावयाचा- याचा विचार करतांना ते गमतीने लिहितात—

काठी, जोडा, छत्री, टोपी, ताट, तवा, पितळी
कुत्रें, मांजर दत्त म्हणोनि येति पुढे सगळीं
पसंत न पडे परी एकही सर्वां घालविलें
श्रेष्ठ प्रतीच्या विषयास्तव मग मस्तक खाजविलें।

मग श्रेष्ठ प्रतीचे असे प्रसिद्ध विषय कोणते तर—

मूल, फूल, फळ, संध्या, रजनी, चंद्र सूर्य, तरुणी
समोर ठाके फौज अशी ही रुचे न परि कोणी।

असेंहि ते गमतीनेंच लिहितात. केशवसुतांनी 'शब्दांनो, मागुते या,' या कवितेंत गाणाऱ्या शब्दांनी माझ्या हृदयांत शारदेचा देव्हारा स्थापन केला आहे, काव्यकल्पनांसाठी किंवा विषयांसाठी मला धडपड करण्याची जरूर नाही, मात्र हे क्षणांत नाहीसे होणार दिव्यभास धरून ठेवण्यासाठी शब्द सुचले पाहिजेत असें म्हटलें आहे. येथे सर्वच प्रकार वेगळा आहे. कवनाला विषय शोधतांशोधतांच कवीच्या नाकीं नऊ येतात आणि 'कवितेसाठी धडपड' याच विषयावर कविता तयार होते!

केशवसुतांच्या कवितेंत 'तुतारी' 'स्फूर्ति' 'नवा शिपाई' 'दोन वाजी' व 'गोफण' अशा प्रक्षोभरसात्मक काव्यांचें एक मोठें भव्य दालन आहे. परंतु 'तुतारी'च्या गगनभेदी आवाजापुढे 'दसऱ्याचें सोने' अगदी हिणकस वाटतें, हें कांही वेगळें सांगावयास नको. 'दसऱ्यां'त आगरकरांच्या गद्यांतील गतिमानता नाही आणि केशवसुतांच्या तुतारींतील आवेश नाही. 'तशाच विधवा करिती तळमळ, फत्तर फुटतिल-येऊनि कळवळ' अशी सवंग लोकप्रियता आहे. आपल्या काव्यगुरूचें या बाबतींत अधिक अनुकरण करण्याची बुद्धि गोविंदाग्रजांना झाली नाही, हें मराठी काव्याचें सुदैवच म्हटलें पाहिजे.

साध्या विषयांतून मोठा आशय काढणारी प्रतीकात्मक व प्रतीतिधर्मी रचना म्हणजे गूढवादी कविता होय. 'पुत्रशोक' या कवितेंत 'जिने आतांही मारितां भरारी। गूढ गगनें भेदून पार सारी। तत्त्वरत्नें उघडल्या दिव्य खाणी। तीच कृष्णाची महाराष्ट्रवाणी' असे उद्गार गोविंदाग्रजांनी काढले आहेत. यावरून 'हरपलें श्रेय' 'झपूर्झा' 'म्हातारी' 'कोणीकडून कोणीकडे' 'सतारीचे बोल' यांनी तत्त्वरत्नांच्या दिव्य खाणी उघडल्या आहेत, याची गोविंदाग्रजांना जाणीव दिसते. गडकऱ्यांची जीं कांही गूढ समजलीं जाणारीं गीतें आहेत तींहि त्यांनी केशवसुतांच्या पावलावर पाऊल ठेवूनच रचलेली दिसून येतील. 'म्हातारी' 'झपूर्झा' व 'सतारीचे बोल' यांचें त्यांनी अनुकरण केलें. परन्तु 'हरपलें श्रेय' ह्या कवितेची दखल घेण्याचें त्यांनी योजिलें नाही, ही गोष्ट फार सूचक आहे. केशवसुतांनी 'हरपलें श्रेय' या आपल्या अखेरच्या, पण प्रथम दर्जाच्या, कवितेंत हरवलेल्या श्रेयाच्या प्राप्तीविषयी तळमळ आणि तें हरपलें म्हणून हुरहूर व्यक्त केली आहे ध्येयवादी माणसाच्या वांट्याला हमखास येणाऱ्या दुःखांना त्यांनी वाचा फोडली. आयुष्यांतील 'प्रेय' त्यांना मिळालें. परंतु त्रिखंड धुंडून हिंडल्यावरहि सर्व ध्येयवादी लोकांप्रमाणे त्यांचें ध्येय दूरच राहिलें. उलटपक्षीं गोविंदाग्रजांनी मात्र 'ये, ये, ये कविते!' याठिकाणीं

हाय, हाय, कां येशि न अजुनी; त्रिखंड धुण्डुनि झालें।
तुजविरविहित मम हृदयिं रमाया परब्रह्म बघ भ्यालें॥ (पृ. १८७)

असे अतिशय सार्थ उद्गार काढले आहेत. केशवसुतांना आयुष्यांतील 'प्रेय' गवसलें म्हणून ते 'श्रेया'च्या शोधासाठी हळहळतात. बिचाऱ्या गोविंदाग्रजांना त्रिखंड धुंडून झालें तरी प्रेयच आढळलें नाही. अर्थात् 'ह्रदयिं रमाया परब्रह्म न्यालें.' वनांत आणि विजनांत केशवसुतांना हरपल्या श्रेयाची थोडीशी ओळख पटली. 'जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे' असें ते याच अर्थानें म्हणतात. परंतु असल्या शून्य कल्पनेहून प्रेमप्रलयाचेच बोल गोविंदाग्रजांना 'खोल' वाटतात. (प्रेमाचा प्रलयकाळ, पृ. १९२). केशवसुतांना सुखदुःखांचें मर्म त्या दोहोंपलीकडील ज्ञशून्य अवस्थेमध्यें आहे हें कळून चुकलें. 'रुचे मला तर दुःख, सुखाहुनि, वेडा वाटे तरी म्हणा' (सुखदुःख, पृ. ९) असा गोविंदाग्रजांचा दुःखवेडा स्वभाव आहे.

मानलेल्या गुरूच्या काव्यांतील विषादाचा सूर शिष्याच्या काव्यांत उमटला आहे, अशी टीकाकारांची समजूत दिसते. परंतु उभयकवींच्या दुःखांचें स्वरूप सर्वस्वी भिन्न आहे. एड्गर ॲलन पोच्या 'रेव्हन्' या कवितेवर ताण करणारी घुबडास ही केशवसुतांची कविता समोर ठेवून त्याच नांवाची कविता त्यांनी लिहिली आणि तींत—

मनांत माझ्या जी हुरहूर
जनांत काढिन तिचा सूर
साथ मला कर; जरि तूं दूर
बेसुरानें, भेसुरानें, झोप जगाची भंगू ! (पृ. १५)

असा आपला काव्योद्देशच जणू गोविंदाग्रज व्यक्त करतात. घुबडाच्या घूत्कारांत 'कांहीतरी असे थेट जें जिवास लागे विलगूं' असें त्यांना वाटतें. घुबड हा विषाद-युक्त जीवितांचें प्रतीक दोघांनीहि मानलें. परंतु प्रतीकाचा उलगडा वेगवेगळ्या रीतीनें केला आहे. केशवसुतांच्या 'घुबडास'मध्यें मूळ कवीवर ताण करणारें भावना चित्रण आहे तर गोविंदाग्रजांच्या कवितेंत जिथें साधारणीकरण होऊं शकत नाही अशी स्वयंकेंद्रित व स्वतःभोवती एकसारखी गुरफटणारी दुःख चघळण्याची वृत्ति आहे. या दोन्ही गूढवादी कवींची प्रतीकयोजनाच भिन्न प्रकृतीची आहे. 'फुंक आपुलें भयाण शिंग । काळोखाचें फोडुनी भिंग । अंधाराचें उकली ढिंग । पृथ्वीचें नारिंग फुंकरावर उडवाया लागूं !' वस्तुतः हें प्रतीक नसून एक अचाट रूपकच बनलें आहे !

निष्प्रेमाची शेज सोबती
भयाण दुनिया सारी भवती
विषण्ण येती विचार चित्तीं
बाह्यांतर विश्वांत खेळते, उदासीनता एक ! (पृ. ५३)

हें गोविंदाग्रजांचें वर्णन केशवसुतांच्या 'सतारीचे बोल' मधील

तों मज गमलें विभूति माझी । स्फुरत पसरली विश्वामाजी
दिक्कालासहि अतीत झालों । उगमीं—विलयीं अनंत उरलों !

या वर्णनाशीं ताडून पाहतांच दोन कवींच्या प्रतीकयोजनींतील प्रकृतिभिन्नता चटकन् ध्यानांत येते.

केशवसुत आणि गोविंदाग्रज यांच्या एकंदर काव्यप्रकृतींतच अंतर्मुख आणि बहिर्मुख अशी वृत्तिभिन्नता आहे. त्यामुळे काव्याच्या माध्यमांतून सौंदर्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोणांतहि वेगळेपणा आहे. केशवसुतांना सौंदर्याचें निजरूप दिसलें व तेंच त्यांनी सर्व विश्वांत पाहिलें पण गोविंदाग्रजांनी सौंदर्याचें दृश्य रूप पाहिलें. तें त्यांनी ज्या विविधतेने पाहिलें व ज्या विविधतेने नटविलें व दृश्यरूपाच्या भोक्त्यांना भुलविलें ती भुलावण केशवसुतांना साधली नाही. मात्र, अंतर्मुख वृत्तीमुळे केशवसुतांना दृश्य सौंदर्याच्या परिघाचा मध्यबिंदु हस्तगत करितां आला. म्हणून वनीं विजनीं पाहिलेल्या दृश्यरूपांत मनांतल्या श्रेयाची ओळख पटून जें रम्य तें बघून त्यांना वेड लागलें. यामुळे त्यांच्या काव्यांतून एका अंतर्मुख वृत्तीच्या महोदार आत्म्याच्या द्वंद्वातीत अवस्थेचा अनुभव येतो. उलटपक्षीं गोविंदाग्रज हे बाह्याभ्यंतर विश्वांत स्वतःच्याच उदासीनतेचें रूप पाहण्यांत दंग झाल्यामुळे त्यांच्या अशा बहिर्मुख व वस्तुनिष्ठ वृत्तीने चमत्कृतीचें रूप घेतलें. परंतु सुखदुःखाच्या द्वंद्वापलीकडे न जातां आल्यामुळे अंतर्मुख वृत्तीलाच आकलन होणारें रम्य औदासीन्य त्यांना कधी जाणवलें नाही. रम्यतेचें केवळ दृश्यरूपच त्यांनी नावीन्याने व चमत्कृतीने नटविलें व आपल्या विभूतीची विश्वव्यापकता अनुभवण्या ऐवजी स्वतःच्याच संकुचित जगांत गुरफटून जेथे तेथे स्वतःचेंच दुःखमय प्रतिबिंब पाहण्याच्या हव्यासांत 'घुबडास' सारख्या कांही कवितांत तर ते सर्वस्वी स्वयंकेंद्रित झाले !

घुबडास या कवितेंतील पुनरुक्ति–दोष सोडला तर तींत गोविंदाग्रजांनी

प्रीति असे का ठाउक तुजला ?
जीव कधी का दुःखें सुजला ?
प्रकाश कधि का नयनां दिसला ?
तुझ्यावांचुनी तुझ्या जगांत न देसी कोणा वाग्रं ! (पृ. १६)

अशा साध्या शब्दांत आपल्या काव्याचे प्रीति, दुःख आणि तत्त्वप्रकाश हे तीन विशेष व स्वतःच्या जगांत रंगून जाण्याची वृत्ति अगदी स्पष्टपणें व्यक्त केली आहे. ही कविता म्हणजे कवीच्या मनांत खोलवर दडलेल्या काव्यविषयक कल्पनेचाच एक प्रतीकरम्य आविष्कार आहे. गडकऱ्यांच्या काव्यविषयक वृत्तींत हळूहळू फरक पडत गेला ही गोष्ट त्यांच्या काव्याचें कालानुक्रमें ओझरतें दर्शन घेतलें तरी कळून येईल. घुबडाच्या भयाण सहवासांत इतक्या उत्कटतेने प्रारंभीं रममाण होणारा हा कवि 'निजलेल्या बालकवीस' या आपल्या अखेरीअखेरीच्या कवितेंत मात्र

तव गीत खळाला नेइल पुण्याकडे
शिकवील यमाला सदयत्वाचे धडे
फत्तरांत वाजविल प्रेमाचे चौघडे
नेईल सज्जनां आनंदापलिकडे । (पृ. १९४)

असे आशावादी सूर काढतांना दिसतो. या उद्‍गारांत कवीची काव्यध्येयविषयक दृष्टि दिसून येते. वाग्वैजयन्तींतील सर्व कविता कालानुक्रमानुसार छापलेल्या दिसत नाहीत. या पुस्तकाच्या सात आवृत्ति निघाल्या पण निदान यापुढील आवृत्तींत प्रत्येक कवितेचा लेखनकाल उपलब्ध झाल्यास त्यांच्या काव्यविषयक वृत्तींत कसकसा विकास झाला आहे हें शोधून काढणें मोठें उद्बोधक होईल. उपलब्ध संग्रहांत त्यांच्या कांही अपूर्ण कविता शेवटींशेवटीं दिल्या आहेत. पूर्ण कवितांपेक्षा

एका दृष्टीने अपूर्ण कविता ह्याच मोठ्या सूचक आणि महत्त्वाच्या ठरतात. एका बैठकीला कवि एखादी कविता पूर्ण करूं शकत नाही याचें पुष्कळदा मानसशास्त्रीय स्पष्टीकरण असें करतां येतें की, तींतील विषय बाह्यमनाला आकर्षक वाटला तरी अंतर्मन त्याविरुद्ध प्रतिकार करून कविता अपूर्ण ठेवतें म्हणजे आपल्या नाराजीचा ठसा उमटवून बाह्यमनावर विजय मिळवितें. प्रारंभीच्या कवितांत स्वतःच्या शब्द-सामर्थ्यावर व शब्दार्थनिष्ठ अशा विविध काव्यांगांवर विसंबून राहणारा हा कवि उत्तरोत्तर, एकेका शब्दें भरले। काव्याचे अद्‌भुत पेले! (पृ. ३७)— असें म्हणतो.

नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी
नाचत डोलत करि शिणलेल्यीं मनें पुनः ताजीं! (पृ. ५८)

असें 'गाण्याने श्रम वाटतात हलकें, हेंहि नसे थोडकें' हें काव्यध्येय जाणून घेतो व 'धरी सावरुनि कविता पडत्या हृदयाचा तोल' (पृ. ५९) अशा काव्यशक्तीची ओळख करून घेऊन त्याला 'अर्थाविण मेळेने बोल' (मोरपिसावरचा डोळा, पृ ६१) टाकून द्यावेसे वाटतात मध्येच त्याला 'हेंचि द्यावें दान। घडो तुझें कांही गान' (पृ. ६४) असें संतकाव्यध्येयहि आठवतें. 'कांही इंग्रजी कविता वाचून' आपलीं चढलेलीं कवीश्वरें म्हणजे 'पोत घालुनी गळ्यांत फिरती भिल्लांच्या काळ्या पोरी' (पृ ७९) हें हि त्याला कळून चुकतें.

'गीतविरक्ति' ह्या कवितेंत गोविंदाग्रजानी

प्रतिवस्तूचा शब्दचि उरला
भावमया जगतीं राही;
त्या शब्दाचा अर्थ कुणातें
वस्तुज्ञानाविण नाही!

गूढार्थचि तो अलिखित भागीं। मत्कवनीं भरुनी जाई! (पृ. ८०)

असे काव्यविषयक अतिशय सूचक उद्गार काढले आहेत. गोविंदाग्रजांच्या काव्यांतील 'अलिखित' भाग कोणता, हें त्यांच्या अपूर्ण कवितांवरून अनुमानाने ताडून काढतां येतें.

'कविता म्हणजे स्वच्छंदाने शब्दांची शाल पांघरलेली कल्पना होय' (चिमुकलीच कविता) असें म्हणणारा 'कवि समसमा संयोग की जाहला' या कवितेंत मनासारखा शब्दसंघ असूनहि व गाणारा गळा गोड, अर्थाची ओढ व रसाचा उत्कर्ष असून एक हृदय तेवढें नाही म्हणून हळहळतो. 'ये ये ये कविते' मध्ये भांबावून जाऊन कवनीं गाई मीच मला, आणि—

हृदयाचा केला डोला
कवितेने आत्मा ओला
त्यावरी बसुनि घे झोला

खोला खोला हृदयपटा। ध्या कवितेचा पूर! (पृ. १८८)

असें म्हणून 'निजलेल्या बालकवीस' उद्देशून वर उद्‌धृत केलेले आशावादी सूर काढतो. 'एका बालकवीस' या अखेरच्या कवितेंत त्यांना 'आम्ही गातों जें गाणें।

तें जगताचें रडगाणें ॥ हृदयीं भरला जो त्रास । तो कवितांचरणीं प्रास ' याची पुरेपूर जाणीव झालेली असून, ठरविकांनी बेजार आणि नियमांनी ठार झाल्यामुळे—

अर्थ—शब्द सोंगें सारीं । वडेजाव हा बाजारी... ।
अर्थ मरूं दे । शब्द खरूं (सरूं ?) दे । काव्य झरूं दे । (पृ. १९६)

असे प्रारंभापेक्षा अगदी निराळे दिसणारे विचार त्यांनी व्यक्त केले आहेत. 'विश्वाची विजयादशमी' या अपूर्ण कवितेत शब्द, अलंकार, कल्पना यांचेंच वर्णन आहे. पण

'तुरा शिरावर डुलतो पवनीं तरल कल्पनांचा' (पृ. १९८)

यापुढील 'आलेखन' गूढार्थ भाग जाणून घ्यावयाचा आहे. 'पुत्रशोक' या काव्याविषयक अपूर्ण कवितेत मायभाषेमध्ये श्रेष्ठ कवि कोण आहेत यासंबंधात—

शोकमंगल गावया गोड गाणीं
सजे राजस रमवनी 'रामवाणी'! (पृ. २००)

असे 'अपराध क्षमा कर' म्हणून आत्मगौरवाचे उद्गार काढले आहेत. अशा अपूर्ण कवितेतील उद्गारांचा एक आशयच असा की गोविंदाग्रजांच्या काव्यविषयक कल्पनांत उत्तरोत्तर पुष्कळ फरक व विकास होत गेला. 'काव्याची व्याख्या' या आणखी एका अपूर्ण कवितेत तर त्यांनी—

"उंची इमला शिल्प दाखविले, शोभा म्हणजे काव्य नव्हे
काव्य करावा, जिला जिवाचें जीवन करणेंच हवें !" (पृ. २२६)

असे अगदी प्रारंभीच्या 'वेडाभ्याकाराम' या कवितेपेक्षा दुसऱ्या टोकाचे उद्गार काढले या आधी उद्धृत करून त्यांवर श्री. ना. ना. हडू यांनी "म्हणजे काय हवें ?" असा प्रश्न केला आहे ['गोविंदाग्रजांची काव्यसृष्टि' 'मधुवन', त्रैमासिक २६ जाने० १९५२]. वास्तविक "म्हणजे काय हवें ?" हें खुद्द गोविंदाग्रजांनाहि कळलें नाही. म्हणून त्यांची ही व इतर कांही कविता अपूर्णच राहिली. या अपूर्णतेचें कारण 'इच्छा, उपभोग आणि विरागप्रयोग त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे —"असें असावें यांच्या मांसा अपूर्णता ही दाविनसे !"

काव्यस्वरूपाचा विचार करितांना कविमनाप्रमाणेच कविकालीन परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. ती परिस्थिति म्हणजे आंग्ल संस्कृति आणि आंग्ल वाङ्मय यांचा जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर झालेला सर्वंकष प्रभाव होय. आंग्ल संस्कृतीच्या प्रभावाने डोळे दिपून गेलेला सुधारकवर्ग समाज सुधारणा करण्याकडे वळला. अशा साहित्यिकांचे अध्वर्यु गोपाळराव आगरकर होत. त्यांच्या विचारांतून स्फूर्ति घेऊन हरिभाऊ आपट्यांनी कादंबरी लिहिली व केशवसुतांनी कविता निर्माण केली. पूर्वजांच्या गौरवांत आणि भारतीय संस्कृतीचें पुनरुत्थान करण्यांत रमलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापासून स्फूर्ति घेऊन तेजस्वी पण स्थितिमान् विचारसरणी प्रसृत करणारे जे अनेक वाङ्मयनिर्माते निर्माण झाले त्यांतील प्रमुख लोकमान्य टिळक होत. गोविंदाग्रज एकीकडे केशवसुतांस काव्यगुरु मानीत होते तर दुसरीकडे लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीशीं विशेष जुळणारी अशी त्यांची मनोवृत्ति बनत चालली होती. ही त्यांची 'द्विविधा निष्ठा' त्यांच्या सर्वच वाङ्मयप्रकारांतून अभिव्यक्त होते व वाग्वैजयन्तीहि तिला अपवाद नाही.

इंग्रजी वाङ्मयांत काव्यटीकाकार काव्याचे 'क्लासिकल्' आणि 'रोमान्टिक्' असे दोन प्रकार मानतात (या संज्ञांचीं 'अभिजात' आणि 'अभिनव' अशीं मराठींत रूपांतरें करितां येतील; पण तीं येथें मुद्दामच केलीं नाहींत). पैकी क्लासिकल् कविता ही रूढ कल्पना, बाह्य परिवेश, रचनेची ठाकठीक व अर्थापेक्षा शब्दांकडे, व्यंजनेपेक्षा लक्षणेकडे, आशयापेक्षा चमत्कृतीकडे, स्फूर्तीपेक्षा प्रयत्नाकडे, भविष्यापेक्षा भूताकडे, ध्येयापेक्षा आदर्शाकडे, क्रांतीपेक्षा उत्क्रांतीकडे, खळबळीपेक्षा संयमाकडे, भावनेपेक्षा कल्पनेकडे किंबहुना सूक्ष्म भावगंधापेक्षा स्थिर रमणीयतेकडे अधिक लक्ष देणारी म्हणजे बहुतांशीं स्थितिमान् स्वरूपाची असते. हिचे प्रमुख अनुयायी म्हणजे पोप आणि ड्रायडन् हे होत. उलटपक्षीं रोमांटिक् कविता वरील सर्व बाबींत क्लासिकल्हून वेगळी म्हणजे नवरचनात्मक, व्यंग्यार्थयुक्त, आशयपूर्ण, स्फूर्तिजन्य, भविष्यवादी, ध्येयनिष्ठ, क्रांतिकारक, खळबळजनक, व भावगंधवाहक असते. या प्रकाराचे इंग्रजींतील प्रमुख कवि म्हणजे शेली, वर्ड्स्वर्थ्, कोट्स्, आणि बायरन् हे होत. केशवसुतांच्या कवितेंत या सर्व गुणांची साक्ष पटते. गोविंदाग्रजांच्या काव्यापुढे केशवसुतांचा म्हणजे पर्यायाने रोमांटिक् काव्याचाच आदर्श होता. त्यांनी 'दसरा' या कवितेंत स्वतः होऊन 'केशवपुत्रांचा महशूर। गोविंदाग्रज चेला सच्चा' हे जे उद्‌गार काढले आहेत त्यांचा अर्थ रोमांटिक् पद्धतीच्या काव्यगुणांनी मोहून जाऊन त्यांचें निरनिराळ्या क्षेत्रांत अनुकरण करण्याचा कवीनें बुद्धिपुरःसर प्रयत्न केला एवढाच आहे. त्यांनी काव्यस्फूर्ति केशवसुतांपासून घेतली परंतु मार्ग स्वतःचाच अनुसरला. किंबहुना केशवसुतांवर ताण करणारी त्यांची तरल कल्पनाशक्ति ही त्यांच्या नंतरच्या अनेक कवींना व लेखकांना उपजीव्य ठरली, हें विसरतां येत नाहीं.

रोमांटिक् काव्याचा आदर्श समोर ठेवलेला परंतु कवीची वृत्ति मात्र क्लासिकल् पद्धतीच्या काव्याला अधिक अनुकूल होती. इंग्रजींत काय किंवा तीच वर्गवारी इतरत्र लावली तरी काय, क्लासिसिझम् आणि रोमांटिसिझम् यांत कांही उच्च-नीच-भाव नाहीं. या द्विविध निष्ठा म्हणजे कविमनाच्या व काव्यदृष्टीच्या दोन परस्पर भिन्न वृत्ति होत. प्रत्येक प्रकृतीची श्रेष्ठ कलाकृति सारखीच हृद्य व चिरंतन होऊं शकते व जगांतील अमर कलाकृति दोनपैकी कोणत्याहि प्रकाराची असूं शकते, आहे. मुद्दा गोविंदाग्रजांचा काव्यादर्श व काव्यप्रकृति यांतील विसंगतीचा आहे. ती जाणून घेतली तर त्यांच्या श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या काव्यकृतींत या दोन परस्परभिन्न रंगाचे पदर कसे गुंफून वा गुंतून गेले आहेत हें सहजच लक्षांत येतें. मराठी भाषेंत, विशेषें-करून बोलण्याच्या भाषेंत 'रोमान्स' या शब्दाला प्रणय किंवा स्त्रीपुरुषांच्या प्रेमलीला असा अर्थ आला आहे. त्यावरूनच बहुधा किंवा 'रोमान्स' या शब्दाचें संस्कृत 'रोमांच' या शब्दाशीं जें उच्चारसाम्य आहे त्यावरून असेल, गोविंदाग्रजांची कविता ही 'रोमांटिक्' आहे अशी समजूत रूढ झालेली दिसते! काव्याच्या बाबतींत गोविंदाग्रजांनी केशवसुत—बालकवींसारख्या 'रोमांटिक्' पद्धतीची कविता करणाऱ्या कवींचा आदर्श समोर ठेवला हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या अखेरीअखेरीच्या व त्यांतहि अपूर्ण असलेल्या कवितांतून हा आदर्श त्यांना प्राप्त करून घेतां आला नाही याची मनोमन जाणीव व्यक्त झाली आहे. 'दसऱ्या'सारख्या प्रारंभीच्या कविता 'मी केशवसुतांचा सच्चा चेला आहें' अशा आत्मविश्वासाच्या भावनेने पूर्ण झाल्या परंतु 'महाराष्ट्रगीत' या अखेरच्या अपूर्ण कवितेंत मात्र त्यांना केशवसुतांनी तत्त्वरत्नांच्या दिव्य खाणी उघडल्या हें प्रामुख्याने दिसलें व मी रामबाणील

रसवंती म्हटलें व हृदयगंगा करुणरसाने उचंबळून दुथडी वाहविली या'पुत्रशोक'भरांत काढलेल्या उद्गाराबद्दल पश्चात्ताप झाला. 'केशवसुतांची कविता वाचून' या एका त्रुटित कवितेंत शिवरायाच्या मागे त्यांच्या लालमहालीं फिरणें, तसेंच केशवसुतांच्या मागे नवीन कविता करणें, हें आम्हाला लाजिरवाणें आहे असें म्हटलें आहे. येथे 'हा दृष्टान्त लागू पडत नांही' असें डॉ. हर्षे यांचें म्हणणें आहे ('गोविंदाग्रज' काव्य-परीक्षण, पृ. ५२). एक तर हें दृष्टान्ताचें उदाहरण नसून प्रतिवस्तूपमेचें आहे. कारण उपमानवाक्य आणि उपमेयवाक्य यांच्यांतील साधारण धर्म 'लाजिरवाणें जिणें' हा एकच आहे व तो 'लालमहालीं फिरणें' व 'नवीन कविता करणें' या शब्द-भेदाने दाखविला आहे. येथे वस्तुप्रतिवस्तुभाव म्हणजे एकच साधारणधर्म आहे, बिंबप्रतिबिंबभाव म्हणजे दोन वाक्यांत दोन साधारणधर्म (दृष्टान्त—दार्ष्टान्तिकसंबंध) नाहींत. ही अलंकारशास्त्रांतील परिभाषा येथे मुद्दाम वापरण्याचें कारण आहे. केशवसुतांच्या काव्याचें नवीन कविता करून अनुकरण करणें न जमल्यामुळे त्यांना कवि या नात्याने आपलें जिणें लाजिरवाणें कसें वाटूं लागलें व इतर कवितांतून केशवसुतांचा आपण केलेला गौरव स्वकाव्यप्रकृतीच्या दृष्टीने कसा अनाठायीं होता याची कवीला येथे जाणीव झालेली दिसून येते. त्रुटित वा अपूर्ण कवितांच्या मुळाशीं असें हें मानसशास्त्र आहे. गोविंदाग्रजांची ही जाणीव केवळ विनयाची द्योतक समजतां येत नाही. रोमांटिक् काव्य लिहिण्यासाठी त्यांनी जिवाची आटाआटी केली परंतु निर्माण केलेलें काव्य मात्र क्रामिकल् झालें. प्रारंभीं हवी असलेली नवीनता काव्यांत उतरली नाही म्हणून त्यांना जिणें व्यर्थ वाटलें. पण हळूहळू या वस्तुस्थितीशीं त्यांनी हातमिळवणी केली व 'घडूं नये तें घडून गेलें' (तीन तरी) निज कवनाचें हें मासिलेखन क्षुद्र असलें तरी पुरून जाऊं नये म्हणून त्यावर कालाची घटका मोजणारे वाळूकण पसरतों (परमाणूंचें कार्यमाहात्म्य) असे सूचक उद्गार काढले आहेत.

पण या सर्वांहून गोविंदाग्रज कवीची सूचक कविता म्हणजे शेवटीं आलेली 'हृदयास' ही होय. या कवितेचा उल्लेख करितांना मराठी काव्यटीकेंत कवींच्या कवितांचें काव्यपर, प्रेमपर, निसर्गपर, सामाजिक, राजकीय इ. इ. प्रकार पाडून त्यांचें ठोकळेबाज वर्गीकरण बसवून पृथक्करणात्मक समजलें जाणारें, शेरेबाज, पंतोजी-पद्धतीचें परीक्षण करण्याची जी प्रथा पडली आहे तिचा विचार केला पाहिजे. अशा टीकाकारांनी 'हृदयास' ही कविता इतर अनेक कवितांप्रमाणे अर्थात्, 'प्रेमपर' समजून चर्चा केली आहे. नुसत्या संख्येच्या दृष्टीने पाहिलें तरी गडकऱ्यांच्या निम्म्या-अधिक कविता प्रेमविषयक अथवा प्रेमाशीं कसलें तरी नातें असलेल्या आहेत (वि. स. खांडेकर, गडकरी—व्यक्ति व वाङ्मय, पृ. २४२) असें वर्गीकरण करून ठरविल्याशिवाय त्यांना 'प्रेमाचे शाहीर' अथवा 'प्रेमाचे पहिले शाहीर' कसें ठरवितां येणार व 'गुरूसे चेला सवाई' कसा ठरणार ! प्रेम या विषयाबद्दल गोविंदाग्रजांना आदरयुक्त आकर्षक वाटे, त्यांनी प्रेम विषयाची थट्टा केली नाही ही गोष्ट प्रा. जोगांना लक्षांत ठेवण्याजोगी वाटते (अर्वाचीन मराठी काव्य, पृ. ८४). 'गडकऱ्यांचें अंतरंग' उकलणारे प्रा. वाळिंबे यांनी तर याच्याहि पुढे जाऊन शेक्सपियरच्या सुनीतांमधील dark lady शोधून काढण्याच्या उत्साहाने 'जुन्या कवितांची आठवण' या प्रेमपर कवितेंतील फुल्यांच्या जागीं 'तारा' (श्री. वा. ना. देशपांडे यांना वाटतें तसें 'आशा' नव्हे) हें नांव असलें पाहिजे याचें मोठें मनोरंजक संशोधन केलें आहे ('गडकऱ्याचें अंतरंग' पृ. १७२ व पुढे).

काव्यटीकेच्या अशा अवस्थेंत 'वाग्वैजयन्ती'चें पुनर्मूल्यन करितांना 'गडकऱ्यांच्या मतें प्रेम ह्मणजे काय' अशा गंभीर प्रश्नाची चर्चा करण्याऐवजी 'हृदयास' ही हमखास प्रेमगीत ठरलेली कविता काव्यपर ह्मणून विवेचिल्यास रसिक लोक रुष्ट होणारच. पण गडकऱ्यांचें काव्यान्तरंग शोधून काढतांना प्रथम समोर ठेवलेला काव्यकल्पनेचा आदर्श त्यांना सरतेशेवटीं कसा कमअस्सल जातीचा, बेगडी वाटला, रोमांटिक् कवींना सौंदर्यांत—प्रेमांत चंचल, लहरी रंग दिसतो पण तें चंचल जग कवीला कसें 'नटवें सोंग' वाटलें, किंबहुना आपल्या क्लासिकल् पद्धतीच्या विद्यावैभवापुढे, ज्ञानगौरवापुढे, विशाल उदारतेपुढे तें सौंदर्य, तें प्रेम—प्रेम कसलें, प्रेमाचीं सोंगें, मातीचें बाहुलें, रंगीत खेळणें, नकली नाणें, गर्वाचें घर, आता मातींत मिळो; तूं मात्र निजयश मिरवीत रसिकांच्या मृदु हृदयमंदिरांत खुशाल राहा!—हा अंतर्मनांतला आशय या कवितेइतका स्पष्ट शब्दांत कोठेहि व्यक्त झाला नाही. मग त्या कवितेचा लक्षणार्थ कितीहि कविचरित्रपर असो!

चिताडसी कां ? चित्र जिवाचें पाण्यावरच्या रेघांनी
'गोविंदाग्रज' सांगे तुजला रहा त्याहुनी स्वस्थानीं। (पृ. २३२)

रोमांटिसिझ्म् हा त्यांना पाण्यावरच्या रेघांसारखा वाटला, आपल्या जिवाचें चित्र उगीच चिताडलें गेलेसें वाटलें व ते आपल्या 'क्लासिकल्' स्थानावर स्थिर राहून गेले!

गोविंदाग्रजांच्या 'प्रेमविषयक' म्हणून समजल्या जाणाऱ्या बऱ्याच कविता त्यांचें सौंदर्यविषयक व काव्याविषयक मनोगत व्यक्त करणाऱ्या आहेत. किंबहुना पुष्कळ ठिकाणीं प्रेम आणि काव्य हें त्यांनी समरूप मानलें आहे. हें दाखविण्यासाठी उदाहरणेंच दिलीं पाहिजेत असें नाही व त्यामुळे त्यांची 'प्रेमाचे शाहीर' ही पदवी काढून घेतली पाहिजे असेंहि नाही. केशवसुत, बालकवि आणि बी यांना प्रेमाचा अनुभव नव्हता तो गोविंदाग्रजांना होता; त्यामुळे त्यांची कविता अधिक प्रत्ययोत्पादक आहे असा एक गैरसमज पसरलेला दिसतो. इंग्रजी काव्यटीकेंत experience असा शब्द वापरला जातो; त्याचें मराठींत 'अनुभव' असें भाषांतर करतात, त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. काव्यांत एखादी भावना वर्णन केलेली असली म्हणजे ती हृद्य होण्याला कवीच्या जीवनचरित्रांत तिचा त्याला अनुभव आलेला असलाच पाहिजे, असें आमच्या टीकाकारांचें गृहीत तत्त्व आहे. Experience शब्दापुरतें तें ठीकच आहे. पण जीवनांतला अनुभव व काव्यांतला अनुभव इंग्रजींत या एकाच शब्दाने दाखविला जात असला तरी त्यांतील दोन भिन्नार्थच्छटा व्यक्त करण्यासाठी मराठींत 'अनुभव' आणि 'अनुभूति' असे दोन वेगळे प्रतिशब्द वापरले पाहिजेत. पंचज्ञानेंद्रियापासून जीवनांत प्रत्यक्ष मिळालेलें जें ज्ञान तो अनुभव व प्रत्यक्षावर आधारलेलें असो वा नसो, रसिकांच्या अनुभवाशीं साधारणीकरण पावणारें कविकल्पित परोक्षज्ञान ती अनुभूति. असा फरक मानला म्हणजे गोविंदाग्रजांच्या काव्यांत टीकाकारांना इतर कवींच्या मानाने 'अनुभवाचा प्रत्यय (?)' दिसतो त्याची कांहीच मातबरी उरत नाही. अनुभव आणि अनुभूति या शब्दद्वयांतील सूक्ष्म फरक ज्ञानेश्वरांच्या कुशाग्र बुद्धींतून सुटला नाही. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत 'स्वानंदानुभवरसा'चें वर्णन करितांना 'अनुभवही वेडावला। अनुभूतिपणें' (ज्ञा. १८–१२११) असें ते म्हणतात. कवीला एखाद्या भावनेचा अनुभव आला की

नाही ही गोष्ट काव्याच्या चर्चेत बरीच गौण असून कवीची अनुभूति किती उत्कट आहे हाच प्रश्न महत्त्वाचा आहे. जीवनांतले सर्वच अनुभव जसेच्या तसेच काव्यनिविष्ट होऊं लागले तर कवीच्या प्रतिभेला कार्यच उरलें कोणतें? गोविंदाग्रजांच्या तथाकथित प्रत्येक प्रेमगीतांत त्यांचे अनुभव शोधूं गेलों तर पुष्कळच शोधून काढतां येतील. पण त्यांना काव्यात्म अनुभूति किती आली होती याचा विचार करितांना मात्र निराशाच पदरीं येते. क्लासिकल् पद्धतीच्या उत्कृष्ट काव्याला अनुभूतीपेक्षा अनुभवांचीच अपेक्षा अधिक आहे हें खरें. पण गोविंदाग्रजांच्या बहुतेक सर्व प्रेमगीतांत प्रेमभंगाच्या अनुभवांची लयलूट दिसते एवढ्यानेच कांही त्यांच्या काव्याचा गौरव होत नाही. त्या अनुभवांचें वर्णन कवीने ठिकठिकाणीं मोठें चमत्कृतिपूर्ण केलें आहे, तें वाचकांचें मन आकर्षित करतें व What was oft thought has been so very well-expressed असे वाचक उद्गार काढतो, यांतच गोविंदाग्रजांच्या प्रेमकाव्याचें वैशिष्ट्य साठविलें आहे. गोफ, फणसाचें पान, घुंघुरवाळा या आत्मप्रत्ययाच्या कवितांपेक्षा गुलाबी कोडें, पहिलें चुंबन, प्रेम आणि मरण, राजहंस माझा निजला, मुरली अशा बहिर्मुख कृतींचाच बोलबाला झाला याचें तरी कारण हेंच की त्यांतच वाव आपलें काव्यकौशल्य अधिक तन्मयतेने दाखवूं शकतो. एकंदरीने स्वतःच्या अनुभूतीचें भावचित्रण करण्यासाठी जी अंतर्वृत्ति पाहिजे तिचाच अभाव कवीच्या ठिकाणीं असल्यामुळे दुसऱ्यांच्या भावनांशीं कल्पनाशक्तीने तादात्म्य पाहून त्यांचेंच चित्रण कवीने मोठें नाट्यपूर्ण रीतीने केलें आहे, याकडे समीक्षकांनी विशेष लक्ष द्यावयास हवें.

भावकाव्यापेक्षा गडकऱ्यांनी नाट्यगीतेंच अधिक यशस्वी रीतीने लिहिलीं. त्यांचीं बरीचशीं सरस व लोकमान्य गीतें ही नाट्यगीतें आहेत. बऱ्याचशा भावगीतांत ते ज्या भावनेशीं समरस होतात ती प्रेमाची नसून काव्याची आहे. काव्यापेक्षा नाट्याच्या प्रांतांत गडकऱ्यांनी जें यश मिळविलें तें अधिक उज्ज्वल, स्वतंत्र प्रतिभेचें द्योतक व त्यांच्या मनोवृत्तीस अधिक वाव देणारें ठरलें. शृंगारिक व गूढवादी कविता, निसर्गगीतें, सामाजिक व विनोदी कविता अशा सर्वच बाबतींत जेथे जेथे शब्दार्थचमत्कृतीला वा नाट्याला वाव मिळाला तेथे तेथे गोविंदाग्रज प्रकर्षाने चमकून दिसतात, हें त्यांच्या कविता वरवर चाळल्या तरी कळून येतें. पण नाट्य झालें तरी ती कला आहे व कलेचा आत्मा संयम आहे. नाट्यगीतांच्या शिल्परचनेंतहि अंतर्बाह्य संयम हवाच; तो त्यांना राखतां आला नाही. 'दुर्दैव नगाऱ्या शिखरीं। नव-विधवा दुःखी आई' अशा सदोष प्रतिभेपासून व अनावश्यक तपशिलापासून आपल्या सर्वप्रसिद्ध काव्याची सुरवात करून खरोखरी कविता संपल्यानंतरहि 'सांगुनी असें सकलांशीं'...मग काय झालें, त्याचें दोन कडव्यांत वर्णन केलें आहे. 'राजहंस माझा निजला!' या कवितेची 'बी' कवींच्या 'माझी कन्या'शीं रचनाशिल्पाच्या दृष्टीने तुलना केली तर बींचें रचनाकौशल्य व गोविंदाग्रजांचा संयमाभाव डोळ्यांत भरतो. आजहि या कवितेचें परिष्करण करून 'गाई पाण्यावर काय म्हणुनि आल्या?' अशा प्रकारची तिचीहि 'करुं नका गलबला अगदी। लागली झोंप मम बाळा!' या मनाची पकड घेणाऱ्या ओळीपासून सुरवात करितां येईल. तसेंच, 'प्राणांचें पसरुनि जाळें—मी निजतें घेउनि याला!' येथेच तिचा शेवट करणें किती उचित आहे, हेंहि सहजच लक्षांत येईल.

गोविंदाग्रजांच्या भावकाव्यांचें व नाट्यगीतांचें रचनाशिल्पाच्या दृष्टीने मूलग्राही असें परीक्षण व्हावयाचेंच आहे. त्यांची कविता वरवर चाळून गुणदोषात्मक मूल्यमापन पुष्कळ झालें. त्यांच्या गुणपरमाणूंचे पर्वत केले गेले याबद्दल कांही म्हणावयाचें नाही. कारण त्यांच्या कवितेंत तसें आकर्षण आहेहि. परंतु बहुतेक टीकाकारांनी त्यांच्या कवितेचे दुर्बोधत्व व अश्लीलत्व हेच दोन दोष प्रामुख्याने वर्णावे याचें आश्चर्य वाटतें ! संपूर्ण वाग्वैजयन्तींत जिचा बोध होऊं शकत नाही अशी एकहि ओळ वा शब्द आढळत नाही. त्यांचीं प्रतीकें हीं बरीचशीं रूपकात्मक असल्यामुळे त्यांची तथाकथित गूढवादी कविता देखील अगूढ आहे, मग इतरत्र आलेल्या कल्पना दुर्बोध असण्याची गोष्टच सोडा ! 'मुरली'मधील तरुशिरीं मूळ उफराटे आणि शून्यांत पराचें भरली किंवा 'फुटकी तपेली'मधील कडक कायदा धावायाचा, ह्या अध्यात्मांतील प्राथमिक गोष्टी किंवा 'कलगीचें गाणें'मधील 'दाट तमाच्या तेजांत' यातील साधासुधा विरोधाभास वा 'नाहिंपणाचा गिरि दिसत' यांतील इंग्रजी वळणाचें negative attitude वरील पर्वताचें रूपक ज्यांच्या लक्ष्यांत येऊं शकत नाही त्यांना जगतांत सुबोध काय आहे ? गडकऱ्यांच्या 'बालकाचें चुंबन घेतांना पाहून' किंवा 'सांग कसें बसलों ?' यांसारख्या संभोगशृंगाराच्या साध्या छटा असलेल्या गमतीच्या कविता ज्यांना एकदम अश्लील, ग्राम्य वाटतात त्यांनी आपली अभिरुचि अधिक सुसंस्कृत केली पाहिजे यापेक्षा जास्त काय सांगावें ? ज्यांच्या कवितेंत कोठेहि दुर्बोधत्व व अश्लीलत्व हे दोष नाहीत असे हमखास म्हणतां येईल अशा कवींत गोविंदाग्रजांची गणना होते, याहून अधिक लिहिण्यास येथे अवकाश नाही.

आधुनिक मराठी कवींत गोविंदाग्रजांचें स्थान कोणतें हें ठरविण्यासाठीं वरील तुलनात्मक, धावतें आलोचन पुरेसें नाही. विशेषतः त्यांच्या कांही प्रसिद्ध कवितांची रसग्रहणात्मक छाननी करून त्यांचें काव्यस्वरूप नव्याने आकलन करणें अवश्य आहे. विशेषेंकरून त्यांच्या प्रेमपर समजल्या जाणाऱ्या कवितांतील भावनेचा व कल्पनेचा भाग वेगळा करून म्हणजे अनुभव व अनुभूति यांची तफावत अधिक स्पष्ट करून त्यांच्या प्रेमपर काव्यांत केशवसुतादि कवींच्या मानाने अनुभूतीचा वा आत्मप्रत्ययाचा अंश, कसा कमी आहे हें तुलनेने दाखवितां येण्यासारखें आहे. त्याचप्रमाणे मराठी भाषेला त्यांनी कोणकोणते नवे शब्द, वाक्प्रचार दिले व कोणकोणत्या पूर्वीच्या शब्द-रत्नांना उजळा देऊन आपली वाग्वैजयन्ती रचली हा तर एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे. तथापि त्यांचीं काव्यें वाचून अनुभूतीपेक्षा भाषेचें वैभवच प्रकर्षाने डोळ्यांत भरतें, हें विसरतां येत नाही.

केवळ काव्याचाच नव्हे तर संपूर्ण आधुनिक मराठी वाङ्मयाचा भाषेच्या दृष्टीने विचार केला तर केवळ वाग्वैजयन्तीवरून हें सहज लक्षांत येतें की आजच्या मराठीवर गडकऱ्यांच्या भाषेचा फार दाट प्रभाव पडला आहे. किंबहुना मराठी भाषा सुरू झाल्यापासून ह्मणजे थेट ज्ञानेश्वरांपासून तों आजच्या माडखोलकरांपर्यंत मराठी भाषेला समृध्द करणारे जे कांही थोडे भाषाप्रभु होऊन गेले त्यांत गोविंदा-ग्रजांना फार मानाचें स्थान आहे. प्राचीन मराठी भाषेवर परिणाम घडवून आणणारे ज्यांना भाषाप्रभु म्हणतां येईल असे दोनच प्रमुख कवि झाले. एक ज्ञानेश्वर आणि दुसरे मुक्तेश्वर. शेवटचे श्रेष्ठ भक्तकवि मोरोपंत हे ज्या काळांत झाले तो काळ

शाहिरी वाङ्मयाचा होता. शाहिरांनी अस्सल मराठी बाण्याची कविता लिहिली. त्यांनी आपलें मनोगत व्यक्त करण्यासाठी अस्सल मराठमोळे शब्द वापरले. परंतु मोरोपंतांनी त्याच काळांत देशीच काय पण तद्भव शब्दांचाहि कमींत कमी वापर केला व शुद्ध तत्सम शब्दांचा पांडित्यपूर्ण उपयोग करून मराठी भाषेला प्रौढगंभीर वळण दिलें. व्यक्ति तशी भाषाशैली या न्यायाने मोरोपंतांच्या भरीव व्यक्तिमत्वासारखीच त्यांची शैलीहि भारदस्त होती व तिचा प्रभाव अद्यापि मराठीवरून पुसला गेला नाही. मोरोपंतांनंतरचे आधुनिक मराठीचे भाषाप्रभु विष्णुशास्त्री होत. त्यांनी गद्यरचना इंग्रजी वळणाची, उत्कट व खोचदार केली. पण संस्कृतचें भारदस्त वळण, पंडिती थाट, बिघडूं दिला नाही.

ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, मोरोपंत, चिपळूणकर यांच्यानंतर 'भाषाप्रभु' या पदवीला पात्र असलेले आधुनिक मराठींतील अग्रगण्य शैलीकार म्हणजे गोविंदाग्रज होत. त्यांच्या काव्याचें स्वरूप त्यांतील अभिजात काव्यगुणांमुळे क्लासिकल् बनलें. पण क्लासिकल् काव्याचे मुख्य गुण म्हणजे अर्थगौरव, कल्पकता व चमत्कृति हे होत. त्यांच्या साधनेसाठी आवश्यक असलेलें अखंड शब्दभांडार गोविंदाग्रजांजवळ जय्यत होते. अत्यंत सुलभ, नादपूर्ण, अर्थवाहक, भावसूचक, ताजेतवाने, श्रुतयोजनकुशल शब्द जणू कांही आज्ञाधारक हुजऱ्यांप्रमाणे 'आम्ही तुमच्या कसे उपयोगी पडूं ?' अशा भावनेने त्यांच्या सेवेसाठी सदैव सिद्ध होते. जणू कांही हुकुमासाठी हात जोडून कवीपुढे ते उभेच आहेत, असें भासतें. गोविंदाग्रजांची कल्पनाशक्ति, त्यांची प्रत्युत्पन्नमति, त्यांचें शब्दांवरील प्रभुत्व व अलंकारांचें प्राचुर्य या आकर्षक गुणांमुळे त्यांची सार्थनामा कविता 'वाग्वैजयन्ती' या नात्याने रसिकांची हृदयशारदा सदैव अभिमानाने धारण करील यांत शंका नाही.

गोविंदाग्रजांच्या तेतीसाव्या स्मृतिदिनप्रसंगीं त्यांच्या वाग्वैजयन्तीचें अवलोकन करतांना, आजवरच्या प्रमुख टीकाकारांनी मांडलेल्या परामर्शाचा आढावा घेतां घेतां जे कांही थोडे वेगळे विचार सुचले ते शक्य तितक्या संक्षेपाने वर दिले आहेत. त्यांवरून वाग्वैजयन्तीचें कांही वेगळ्या निकषांवर पुनर्मूल्यन करितां येतें—निदान त्यांच्या काव्याकडे पाहण्याचा थोडा वेगळा दृष्टिकोण असूं शकतो एवढें मान्य झालें तर याच दृष्टिकोणांतून त्यांच्या सर्व कवितांचें विकासशील समीक्षण करणें सुलभ होईल.

जयपुरांतील इतिहासपरिषद् ★ इतिहासप्रेमी

गेल्या डिसेंबर महिन्याच्या शेवटल्या आठवड्यांत जयपूर येथें इतिहासज्ञांचा मोठा मेळावा जमला होता. दप्तरसमिति, नाणकपरिषद, इतिहासपरिषद व वस्तुसंग्रहालयपरिषद अशा अखिल भारतीय स्वरूपाच्या चार परिषदांची वार्षिक अधिवेशनें जयपूर येथें गेल्या नाताळांत झालीं. त्या निमित्ताने भारताच्या सर्व भागांतून संशोधक व इतिहासप्रेमी लोक जमले होते. महाराष्ट्रांतूनहि बरेच गृहस्थ उपस्थित होते आपल्या प्रांतांतून नागपूर व सागर विश्वविद्यालयांच्या प्रतिनिधींशिवाय यवतमाळहून बरींच इतिहासप्रेमी मंडळी आली होती विशेष उल्लेखनीच गोष्ट ही कीं नागपूरच्या पारशी कन्याशाळेंतील दोन पारशी शिक्षिका उपस्थित होत्या महाविद्यालयांतील इतिहासाच्या प्राध्यापकांचें एतद्विषयक औदासीन्य लक्षांत घेतां त्यांचें इतिहासप्रेम कौतुकावह वाटलें.

प्रथम दप्तरसमितीचें अधिवेशन झालें. या समितीला भारत सरकारचा आश्रय असल्याने तिच्या कार्याला पैशाची उणीव भासत नाहीं. उलट भारत सरकार कडून आलेल्या वार्षिक देणग्यांचा विनियोग मार्च अखेर कसा करावयाचा याचीच कित्येक केंद्रांत विवंचना असते. याच्या उलट इतिहासपरिषद, नाणकपरिषद व वस्तुसंग्रहालयपरिषद यांची स्थिति. यांना भारत सरकारचा आश्रय मुळींच नसल्याने त्यांना आपल्या कार्याकरितां सभासदांच्या वर्गणीवर अवलंबून राहावें लागतें. त्यामुळें त्यांच्या कार्याचें क्षेत्र दप्तरसमितीच्या क्षेत्राच्या मानाने अत्यंत विस्तृत असूनहि प्रत्यक्ष कार्य फारसें होत नाहीं. ही विसंगति भारत सरकारच्या दृष्टीस आणली असतांहि ती दूर करण्याकडे त्यांचें लक्ष जात नाहीं याचें आश्चर्य वाटतें.

दप्तरसमितीच्या अधिवेशनानंतर नाणकपरिषदेची वार्षिक सभा झाली. म. म. प्रा. मिराशींनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत दक्षिणेंतील सातवाहन नाण्यांच्या ज्ञानाचा अद्ययावत् आढावा घेऊन पुढील कार्याविषयीं कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यानंतर वाचलेल्या निबंधांत अनेक प्राचीन नाण्यांविषयीं महत्त्वाची माहिती देण्यांत आली. सातवाहन हाल, रामगुप्त, देवपाल, विक्रमादित्य इत्यादि प्राचीन राजांच्या अज्ञात नाण्यांचे फोटो किंवा छाप दाखविण्यांत आले व छत्रपति शिवाजी महाराजांच्या होनाविषयींही महत्त्वाची चर्चा झाली. नाणकपरिषदेच्या कार्याचें महत्त्व लोकांना पटून तिचे सभासद वाढत आहेत भारतसरकारनें तिला आर्थिक साहाय्य केलें नसलें तरी कांही प्रादेशिक सरकारकडून तिला वार्षिक देणग्या मिळत आहेत. संस्थेचें कार्य पाहून जयपूरचे दानशूर गृहस्थ श्री सेठ सोहनलाल दूगड हे पांचशें रुपये देऊन संस्थेचे आश्रयदाते झाले.

इतिहासपरिषदेचें अध्यक्षपद महाराष्ट्रांतील वयोवृद्ध, तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध 'रियासतकार' रा. ब. डॉ. सरदेसाई यांनीं मंडित केलें होतें. त्यांच्या अध्यक्षत्वा-

बद्दल सूचना करतांना डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनीं राजपूत व मराठे यांच्या पुरातन झगड्याचा उल्लेख केला. त्यामध्ये प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या राजपूत राजाच्या राजधानींत एका महाराष्ट्रीय विद्वानाच्या अध्यक्षतेखालीं इतिहासपरिषद भरत आहे ही कौतुकाची गोष्ट होय असें ते म्हणाले. त्यानंतर अनुमोदनाकरितां केलेल्या भाषणांत म. म. पोतदार यांनीं सांगितलें कीं राजपूत व मराठे हे कांहीं प्रसंगीं एकमेकांशीं लढत असले तरी त्यांच्या प्रमुखांना परस्परांविषयीं आदर व त्यांच्या कार्याचें महत्त्व वाटत होतें व अनेक प्रसंगीं त्यांचें सख्यहि झालें होतें योगायोगाची गोष्ट ही कीं प्रा. पोतदारांच्या या विधानाचें प्रत्यंतर या अधिवेशनांतच प्रथम ज्ञात झालेल्या एका पत्रानें आलें. हें पत्र थोरले बाजीराव पेशवे यांनी जयपूरचा राजा सवाई जयसिंग याला लिहिलें होतें. तें संस्कृतांत असून त्यांत राजपूत व मराठे यांनीं एक होऊन शत्रूशीं लढावें व त्याच्या तावडींतून देशाला सोडवून धर्माचें रक्षण करावें अशी सूचना केली होती. हें पत्र उदयपूरचे श्री अक्षयकुमार व्यास यांनीं प्रतिनिधींना दाखविलें. छत्रपति श्री. शिवाजी महाराज यांनीं मिर्झा राजा जयसिंग याला आणि संभाजी व त्याचा मंत्री कविकलश यांनी जयसिंगाचा पुत्र रामसिंग याला लिहिलेलीं पत्रेंहि प्रसिद्ध झालीं आहेत. अशा पत्रांवरून राजपूत व मराठे यांच्या अंतरींच्या भावना व्यक्त होतात. राजपूत व मराठे एक झाले असते तर भारतीय इतिहासाला निराळेंच वळण लागलें असतें असें वाटल्यावाचून राहत नाहीं.

डॉ. सरदेसाई यांनी आपल्या भाषणांत उत्तर भारतांतील राजपुताना, माळवा, बुन्देलखंड, उत्तर प्रदेश इत्यादि भागांतील इतिहासविषयक साधनांचा संग्रह व अभ्यास करण्याविषयीं कळकळीची विनंती केली. या बाबतींत संशोधकांनी कै. राजवाडे यांचा आदर्श पुढें ठेवावा असें ते म्हणाले. याशिवाय इतिहासपरिषदेच्या पुढील कार्याविषयीं त्यांनी महत्त्वाच्या सूचना केल्या व कालांतरानें फाळणीमुळें झालेलीं भारताचीं शकलें सांधलीं जातील व हिंदुमुसलमान प्रेमाने एकत्र राहूं शकतील असा आपला आशावाद व्यक्त केला. तरुण अभ्यासकांना त्यांनी खालील संदेश दिला—‘ तुम्हाला आवडलेलें तें काम हातीं घ्या व इतर काय म्हणतील याची पर्वा न करतां तें अत्यंत परिश्रमानें तडीस न्या. आपलें कार्य अगदीं निर्दोष व पूर्ण होईपर्यंत वाट पाहू नका. कारण मिळालेली संधि पुन्हा येणार नाहीं व काळ कोणाकरिताहि थांबत नाहीं. ’ डॉ. सरदेसाई यांचे हे स्वानुभवाचे बोल अत्यंत महत्त्वाचे व प्रत्येक संशोधकाने ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. आमचे एक स्नेही आज अनेक वर्षें आपल्या विशिष्ट विषयाच्या संशोधनाचीं साधनें जमविण्यांत गुंतले आहेत. आतां त्यांना वृद्धत्व आल्यामुळें अधिक साधनें जमविण्याची खटपट न करता प्रथम मिळालेल्या साधनांचें प्रकाशन करण्याविषयीं आम्ही त्यांना अनेकदां आग्रह केला होता तोहि याच हेतूने. उपलब्ध झालेलीं साधनें प्रकाशित झाल्यानें त्यांचा इतरांना तरी उपयोग करतां येतो. या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यामुळें आज कित्येक वस्तुसंग्रहालयांत अनेक प्राचीन कोरीव लेख, नाणीं व कागदपत्र अज्ञातावस्थेंत राहिले आहेत. त्यांचेंहि प्रकाशन होणें जरूर आहे.

डॉ. सरदेसाई यांच्या भाषणाने प्रभावित होऊन श्री. सेठ सोहनलाल दूगड यांनी तेथल्या तेथेंच स्वयंस्फूर्तीने इतिहासपरिषदेच्या कार्याकरितां पांच हजार रुपयांची मोठी देणगी जाहीर केली.

इतिहास परिषदेचे सहा विभाग केले होते व त्यांचे अध्यक्षहि भिन्न भिन्न होते. सर्व विभागांत निबंधवाचनाचें काम एकाच वेळीं चाले पण अध्यक्षांच्या भाषणां-करिता कार्यक्रमपत्रिकेंत भिन्न भिन्न वेळा ठरविल्या होत्या. त्यामुळें प्रतिनिधींना वाटल्यास सर्व अध्यक्षीय भाषणें ऐकतां येत. प्राचीन भारतीय इतिहासविषयक दोन विभागांत बरेच निबंध आले होते व त्यांवर चर्चाहि चांगली झाली. या विभागांतील संशोधनांतील क्षेत्र व अभ्यासकांची संख्या ही नजरेंत भरण्यासारखी होती. तिसऱ्या किंवा पूर्वमध्ययुगीन इतिहासविषयक विभागांत फक्त तीनच निबंध वाचनार्थ आले होते. त्यामानाने चौथ्या व पांचव्या विभागांतील निबंधांची संख्या बरीच होती. सहाव्या विभागांत राजस्थानविषयक निबंधांचा समावेश केला होता. या विभागांतहि केवळ तीनच निबंध आले होते.

प्रतिनिधींच्या मनोरंजनार्थ रोज सायंकाळीं एकादा कार्यक्रम ठेवण्यांत येई. त्याशिवाय दोन महत्त्वाचीं व्याख्यानें व एक परिसंवाद झाला. मौर्यपूर्वकालीन भारतीय इतिहास व संस्कृति यांचें ज्ञान आपणांस रामायण, महाभारत व पुराणें यावरूनच काय तें होतें. त्या काळचे अवशेष अद्यापि सांपडले नाहींत. म्हणून पुरातत्त्वखात्याने हस्तिनापुर येथें उत्खनन सुरू केलें आहे. त्याची माहिती श्री. लाल यांनी लॅंटर्न स्लाइड्सच्या साहाय्याने दिली. दुसऱ्या व्याख्यानांत पुरातत्त्वखात्याचे श्री. घोष यांनी बिकानेरमधील आपल्या अलीकडील संशोधनात सरस्वती व दृषद्वती या नद्यांच्या खोऱ्यांत सिंधमधील मोहेंजोदडो व हरप्पा येथील संस्कृतीसारखीच संस्कृति प्रागैतिहासिक काळांत प्रचलित होती असें आढळून आल्याचें सांगितलें व उत्ख-ननाई अशा कांही स्थळांविषयीं लॅंटर्न स्लाइड्सच्या साहाय्याने माहिती दिली. परिसवाद राजपुतांच्या उत्पत्तीविषयीं होता. राजपूत हे भारतीय इतिहासांत खिस्तोत्तर आठव्या नवव्या शतकांत एकाएकी पुढे येतात तेव्हा शक, कुशाण'हूण इत्यादिकां-प्रमाणें तेहि आर्यवंशी नसून बाहेरून भारतांत आले असावे असें कांही संशोधकांनी प्रतिपादिलें होतें. त्याविषयावर हा परिसंवाद होता. या विषयावर अधिकारी वक्त्यांची प्रथमपासून निवड न झाल्याने तो रंगला नाही. याशिवाय चित्रकलेवर व्याख्यान, भाटांचे प्राचीन पोवाडे, इंग्रजी व हिंदी नाटकें इत्यादि मनोरंजनाचे कार्यक्रम झाले.

जयपूरला महाराष्ट्रीयांची थोडीशी वस्ती आहे. त्यांनी एक मंडळ स्थापून सार्वजनिक उत्सव, व्याख्यानें इत्यादिकांच्या प्रसंगाने एकत्र जमण्याची व्यवस्था केली आहे. डॅं. ग. स. महाजनी हे जयपूरच्या राजस्थान विश्वविद्यालयाचे उपकुलपति आहेत व त्यांनी तेथे चांगला लौकिक संपादन केला आहे हें अभिनंदनीय होय. ते इतर परिषदांना उपस्थित राहण्याकरिता परगावीं गेले होते, तथापि त्यांच्या सुविद्य पत्नींनी त्यांची अनुपस्थिति भासूं दिली नाही. त्यांनी महाराष्ट्रीय प्रतिनिधींना चहाला बोलावून त्यांचा सन्मान केला. त्याप्रसंगीं डॉ. सरदेसाई यांनी थोरल्या बाजीरावांची मातुःश्री राधाबाई हिच्या उत्तरभारतांतील यात्रेची माहिती सांगितली. पेशव्यांच्या घराण्यांत ज्या कर्तबगार व करारी स्त्रिया होऊन गेल्या त्यांमध्ये तिची गणना होते. राधाबाई यात्रेला निघाल्यानंतर राजपूत व मराठे यांचें युद्ध जुंपलें. तेव्हा यात्रेचा बेत रद्द करून परत फिरण्याविषयीं कांही लोकांनी तिला सल्ला दिली. दुर्दैवाने ती शत्रूच्या हातीं सांपडल्यास तिचा छळ होईल किंवा तिला ओलीस धरून मराठ्यांवर दडपण आणण्यास तिचा उपयोग करण्यांत येईल अशी भीति त्यांना

वाटली होती. पण त्या करारी स्त्रीला तो सल्ला पसंत पडला नाही. ती तशीच पुढे चालली. बाजीरावांची मातुःश्री यात्रेकरितां आपल्या मुलखांतून जाणार आहे हें समजतांच राजपूत राजा सवाई जयसिंग यानें तिला मोठ्या सन्मानानें जयपूर शहरीं आणवून तिचा मोठा आदर सत्कार केला व मोठा लवाजमा देऊन तिच्या पुढील यात्रेची सर्व व्यवस्था केली. त्याप्रमाणेच फरुखाबादचा सुभेदार महमद बंगष याचेंहि मराठ्यांशीं वैर होते. पण त्यानेहि बाजीरावाच्या मातुःश्रीस मोठ्या आदरानें वागविलें व तिचा सन्मान कसा करावा याविषयीं राजा जयसिंगाकडून माहिती मागवून आपल्या मुलखांत तिचा मोठा आदर सत्कार केला. या यात्रेची हकीकत तात्कालीन कागदपत्रांत आली आहे. तिजवरून मराठ्यांचा दरारा व तत्कालीन लोकांची धर्मप्रवण व समंजस वृत्ति हीं दोन्ही दिसून येतात.

इतिहासपरिषदेंतील अध्यक्षीय भाषणें, व निबंध वाचन हा कार्यक्रम आटोपल्यावर पुढील वर्षाकरता कार्यकारी मंडळाची निवडणूक, वार्षिक अहवालाची मंजुरी, इत्यादि कामांकरितां प्रतिनिधींची सभा भरली होती. या प्रसंगी इतर संस्थांच्या निवडणुकींत दिसतात तसे सर्व दोष दिसून आले आणि संकुचित वृत्ति, अधिकाराची लालसा, इतरांचा मत्सर इत्यादि अवगुणांचें प्रदर्शन झालें. परिषदेच्या स्थापनेनतर गेलीं पंधरा वर्षे प्रयागच्या मंडळीकडे परिषदचीं सूत्रें होतीं पण त्यांच्याकडून परिषदेचें वार्षिक अधिवेशन भरविणें व त्याचा अहवाल छापणें या खेरीज इतर काम झालें नाहीं. भारतीय इतिहासाची योजना तयार होऊन एक तप लोटलें तरी संकल्पित दहा भागांपैकीं एकहि भाग प्रसिद्ध झाला नाहीं. मध्यंतरीच्या काळांत या भागांच्या लेखकांपैकीं अनेक अधिकारी विद्वान दिवंगत झाले. त्यांची जागा भरून काढणें कठीण होत आहे. दरवर्षीं इतिहासपरिषदेच्या अध्यक्षांनी 'भारतीयांनीच भारताचा इतिहास लिहिल्याशिवाय तो निर्दोष होणें शक्य नाहीं' असें प्रतिपादावें, पण ग्रंथनिर्मिति जगन्नाथाच्या रथाप्रमाणें एक इंचहि पुढें सरकू नये अशी परिस्थिति गेलीं कित्येक वर्षे चालू आहे. तिला कंटाळून प्रतिनिधींनी या वर्षी परिषदेचीं सूत्रें प्रयागच्या मंडळींकडून काढून घेऊन कलकत्त्याच्या मंडळींच्या स्वाधीन केलीं. पुढील वर्षाकरितां सर यदुनाथ सरकार यांची अध्यक्षपदीं निवडणूक होऊन तें अधिवेशन ग्वाल्हेर येथें भरण्याचें ठरलें आहे. या नवीन व्यवस्थेनें तरी परिषदेच्या कार्याला चालना मिळेल अशी आशा आहे.

परिषदेचें कामकाज आटोपल्यावर प्रतिनिधींना जयपुर व आमेर येथील प्रेक्षणीय स्थळें दाखविण्याची सोय करण्यांत आली. जयपुर हें शहर सन १७२७ मध्ये सवाई जयसिंहाने वसविलें. त्यापूर्वी त्या घराण्याची राजधानी आमेर येथे होती. हें शहर अठराव्या शतकांत वसविलें असलें तरी सध्या प्रचलित असलेल्या नगर रचनाशास्त्राप्रमाणें त्याची मांडणी आहे. विस्तृत रस्ते, पदपथ, एका विशिष्ट तऱ्हेचीं व गेरूच्या रंगाचीं ओळीनें असलेलीं घरें व दुकानें, मोठमोठे बाजार, उद्यानें, इत्यादिकांमुळे परकोटाच्या आंत असलेलें जयपुर शहर अगदीं अलीकडे वसविलें असावें असें वाटतें. शहरांतील स्वच्छताहि उत्कृष्ट आहे. त्यांतील राजवाडा, गोविंदजीचें मंदिर, हवा महाल, वेधशाळा, पोथीखाना, शस्त्रागार इत्यादि ठिकाणें प्रेक्षणीय आहेत. परकोट्याला आठ दरवाजे असून त्या बाहेरहि सर्व बाजूंस शहराचा विस्तार झाला आहे. बाहेरील भागांत वस्तुसंग्रहालय, महाराज कॉलेज, महाराणी कॉलेज, गायत्री देवी पब्लिक स्कूल इत्यादिकांच्या इमारती भव्य व प्रेक्षणीय आहेत.

जयपूर संस्थानची प्राचीन राजधानी आमेर जयपूरपासून सहा मैलांवर आहे. येथील किल्ला फार विशाळ आकाराचा असून आंतील राजवाडा अनेक मजली आहे. त्यामध्ये विस्तृत दिवाणखाने, आरसेमहाल, वर्गांचे इत्यादि पाहिल्यावर राजपूतराजे मोंगलांप्रमाणेंच ख्याली खुशालीचे भोक्ते व कळाकुसरीचे चाहते होते हें स्पष्ट दिसतें. सभोंवारच्या अनेक टेंकड्यांवर तटबंदी करून या किल्ल्याला दुर्भेद्य केलें आहे. सध्या येथे प्राचीनवस्तुसंग्रहालय केलें आहे. यांत इ. स. च्या तिसऱ्या चौथ्या शतकांतील दगडी यूप किंवा यज्ञस्तंभ, कोरीव लेख व उत्खननाने मिळालेली विविध ऐतिहासिक सामग्री ठेवली आहे.

परिषद आटोपल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रतिनिधींना जयपूरपासून सुमारें साठ मैलांवर असलेल्या वैराट नामक ऐतिहासिक महत्वाच्या स्थळीं नेण्याची व्यवस्था केली होती. हें वैराट मत्स्यदेशचा राजा विराट याची राजधानी होती अशी समजूत आहे. चीनी यात्रिकरू ह्युएनत्संग यानेहि येथील बौद्ध विहाराचा उल्लेख केला आहे. या ठिकाणी 'बीजककी पहाडी' नांवाची टेकडी आहे तेथें अशोकाचा लेख सांपडला होता. तो सध्या कलकत्त्याच्या इंडियन म्यूझियममध्ये ठेवला आहे. येथे उत्खनन केल्यावर एका वर्तुळाकार बौद्ध चैत्याचें व वरच्या एका टेकडीवर विहाराचे अवशेष दृष्टीस पडले. त्यावरुन अशोकाच्या विस्तृत साम्राज्याची व या प्रदेशांतील बौद्धधर्मप्रसाराची कल्पना येते. जवळच एक दीड मैलावर भीमजीकी डुंगरी येथे अशोकाचा एक लहानसा लेख खडकावर कोरलेला अद्यापि विद्यमान आहे. या लेखांत अशोकाने उद्योगाचें महत्व वर्णन करून आपल्या प्रजेस आळस टाकून प्रयत्नशील बनण्याचा उपदेश केला आहे.

यांप्रमाणें जयपूर येथील इतिहासपरिषदेचें अधिवेशन समाप्त झालें. उपस्थित गृहस्थांत बंगाली गृहस्थांचा भरणा विशेष होता. महाराष्ट्रीय त्यामानाने बरेच कमी होते. यावर्षी परिषदेचे अध्यक्षपद रा. ब. डॉ. सरदेसाई यांनी व पूर्व मध्यविभागाचें अध्यक्षस्थान पुण्याचे सव्यसाची संशोधक श्री. ग. ह. खरे यांनी भूषविलें होतें. पुढील अधिवेशनांत उत्तर-मध्यविभागाचें अध्यक्षपद डॉ. दिघे यांस मिळालें आहे हीहि संतोषाची गोष्ट आहे. तथापि एकंदरींत महाराष्ट्र इतिहाससंशोधनाच्या बाबतींत बराच मागे आहे यांत संशय नाही. तो अग्रेसर होण्याकरिता अनेक उत्साही व परिश्रमशील तरुणांनी या कार्याला स्वतःला वाहून घेतलें पाहिजे.

साफल्य

★

वेणांनीं डबडबले डोळे
त्यांतच आंसू साफल्याचे
पान्हा दाटत वाळरसानें
आई वांके प्रेमभरानें
पदर घालते मग मायेचा
तव देहावर
तुझी सुखाची अंगाई ती
त्या बाजेवर

सत्याचा तुज सालस ध्यास
निर्भय वाणी हा तव श्वास
नव्या जगाचीं स्वप्नें सांगत
पुढें चालसी प्रहार झेलित
उन्मत्तांचे अन् क्लीबांचे
तव देहावर
तुझी सुखाची पण अंगाई
अंगारांवर

शोकानें डबडबले डोळे
त्यांतच आंसू साफल्याचे
हृदयें फुललीं अभिमानानें
लाखों बांधव मूक मनानें
पाखर घालति दृढ श्रद्धेची
तव देहावर
तुझी सुखाची ही अंगाई
दीप्त चितेवर

—दि. के. बेडेकर

त्रावणकोर–कोचीन

★

धन्य त्रावणकोर
धन्य ते कोचीन
उंच झाली आज
तळाची दक्षीण
नवा दीस जन्मे
आज दक्षीणेला
काळोख ग्रासतो
पुराण पूर्वेला !

उंच हिमाद्रीची
लाजली उत्तर
कोणत्या धक्कानें
झाली निरूत्तर ?
कोणत्या द्रोहानें
डागळून काळें
हिमवस्त्र शुभ्र
उत्तरेचें झालें ?

कधींतरी पूर्वी
खैबरे मधून
नवे नवे लोट
आलेत वाहून
त्याच प्रवाहांनी
केला इतिहास
सत्तीचा जो फक्त
झाला गळफास !

उत्तर ठरली
पांढऱ्या पायांची
हंसली दक्षीण
लाल सौभाग्याची
होणार उत्तर
काय कोमिंगटान ?
होणार कोचीन
काय नवा चीन ?

म्हणते पुराण
आहे दाक्षिणेंत
यमाची कराल
घोर राजवट
पुराणाची मेली
पुराणांत भाषा
दाक्षिणेंत नाचे
जीवनाची आशा !

करिती पोवारा
सारे यमदूत
नव्या पावलांचा
स्पर्श हो आहूत
दाक्षिणेची व्यथा
झाली क्रांतिमयी
दाक्षिणेची कथा
झाली सर्वोदयी !

खैबर बुजली
उत्तर थिजली
पूर्व पश्चिमेची
ज्योत का विझली ?
स्वेद गंगा येता
रोमांचला मद्र
पुण्य – पावनेऱ्या
स्पर्शानें हो भद्र !

एव्हरेस्टा लागे
एकाद्याचा पाय
कोटी जन घरी
दाक्षिणेचे पाय
दाक्षिणे पासून
नवा इतिहास
नव्या मानवाचा
नवीन प्रवास !

दाक्षिण – मातींत
फुले नवे शेत
दाक्षिण – वाऱ्यांत
नाचे नवें गीत–
गीत जीवनाचें
शेत जीवनाचें
इथून तिथून
सर्वत्र लोकांचें !

क्षुधेसह जागे
तिथें अभिमान
श्रमाला प्रीतीचे
मिळाले विधान
युनान शान्तीची
कोचीनला शान
उत्तरेंत फिरे
'चांग' कुणी म्लान ?

जिरे उत्तरेचा
सरंजामी डौल
दाक्षिणेने घेता
जनोत्तीचा कौल
लोकांच्या वाटेंत
लोकांच्या पायांची
धूळ सांडणार
मानवपणाची !

पिचलेल्या गळ्याची
वाचा झाली तीर
मोडक्या घरांचें
मन हो खंबीर
हळव्या अश्रूंचें
प्रहारी हास्यांत
रूप चमकलें
जीवन–लास्यांत !

युगांनी सोडली
काळोखाची वाट
लोकांनी पाहिली
लोकांची पहाट
जमीन लोकांची
लोकांचें आकाश
निसर्ग लोकांचा
लोकांचा प्रकाश !

कुणाची ही फत्ते ?
ज्यांची न मावते
गती गगनांत
कुणी का 'माओ' ते ?
फत्ते ही चिंध्यांची
दबल्या पीडांची
मानव्यार्थ केल्या
तेजस्वी गुन्ह्यांची !

सूर्ययुगाचा दे
तेजारंभ सर्वा
दक्षिण नव्हे हो
अपूर्व ही पूर्वा !
चीन वा कोचीन
पौर्वात्यांचीं— घरें
येणाऱ्या युगांची
जीवन – माहेरें !

—अनन्त आठले

आजच्या सम्राटांनो

★

दुनियेच्या नाकांतील वेसण-
हातांत खेळविणाऱ्या दरवेशांनो,
उचला हें बेलभंडार अन् घ्या शपथ
अपुल्या मानबिंदुची, भाव-दैवताची,
जिथे तुमचें निलाजरें कोडगें मन
वाहत असेल अजूनहि
तुमच्या हृत्सरोवराच्या आंत आंत
उमलणारें
प्रामाणिक श्रद्धापुष्प;
आणि उच्चारा तुमच्या जगज्जेत्या वाणीने,
जिने केल्या वल्गना आकाश-पाताळ एक
करण्याच्या
आणि चालविला अखंड अविरत पाठ
विश्वशांतीचा,
हे हवलेसे शब्द--"मी स्वार्थी नाही !"
परि ठावूक आहे मजला पुरतें
नाही तोलणार तें लहानसेंच, पण
अंगात हुडहुडी भरविणारें शद्वब्रह्म
तुमच्या जिव्हेला;
कारण मुळांतच आहे ती म्याड,
वरती नुसतें सिंहाचें कातडें पांघरलेली !
तरी थोडाथोडका नाही तिचा पराक्रम
आजवरचा.
खपून रात्रंदिन गोळा केल्या
जरी नभोमंडळांतल्या अवघ्या चांदण्या
नाही पुरणार त्याहि मापाया
तुमच्या कराल कर्तृत्वाच्या किमयेचें
फलस्वरूप—
अगणित जीवांचे उध्वस्त संसार.
चालविली आहे तुह्मी जो
माझ्याच जीवनाची बेशरम राखरांगोळी
पुरेल तेवढीहि साक्षीदार ह्मणून
तुमच्या महनीयतेची, शौर्य शालीत्वाची!!

कुणास माहित कितीकं लोटलीं वर्षें त्या
गोष्टीला,
जेव्हापासून या टीचभर पोटाच्या
खळगींत
धगधगते आहे भुकेची भयानक आग.
नाही आज विष खायालाहि फुटकी
कपर्दिक
परि तुमच्या लालस जिभांनी
जळवांहूनहि अधिक अधाशीपणें
चालविलें आहे रक्ताचें शोषण
माझ्या आस्थिपंजर देहांतील.
या दाहकतेंतहि
नाजुक तरल कल्पना कुसुमांनी
कधी काळीं बहरून उठतां
माझ्या प्रतिभेचा प्रसन्न पारिजात,
तुमचे निर्दय कर लवभरहि नाही कचरत
मुळावरच घाव घालण्या,
आणि भग या मुस्कट दाबींत

उखगून, कातावून, गुदमरून जाऊन
माझं भावप्रवण मन
शोधू लागतें कुठे तरी प्रेमळ आसरा;
कुणाच्या तरी कुशींत लपवून अपुलें
शिणलें माथें
धडपडतें रडायातें पोटभर;
काळजांत दाटलेला दुःखवन्हि
निवेल थोडा तरी या वेड्या आशेने
आसावून जातें अंतर.
परि तुमच्या देहांतील दुष्ट राक्षस
मस्त होऊन हिडिस उन्मादाने
चुरगळून टाकतो याहि सुखाच्या कळ्या
आणि वाजवतो वर दात विचकून
"रडणें म्हणजे नामर्दपणा—!!"

अरे, मी तर यःकश्चित् पामर,
पंख तुटलेल्या पांखरागत.
घडीं घडीं कोलमडणारा दुबळा जीव
पण वडवीत आहांत युगानुयुगं
ज्याच्या विमल यशाचे दिगंत डिंडिम
तो प्रभु रामचंद्राहि
रडला होता एकदा त्या दंडकारण्यांत;
त्या धैर्यमेरूच्याहि पापण्यांवरून
निखळली होती आसवांची करुण सरिता,
जेव्हा त्याच्या प्राणसखीचा—
जिला त्याने निर्जन रानावनांत, हिंस्र
श्वापदांच्या भक्ष्यस्थानीं
एका परीटाच्या चवचाल चुगलीखातर
टाकून दिलें होतें—
त्या सीतेचा,
बारा वर्षांच्या विरहोचा विखार
असह्य होऊन उठला.
पण कुठला तुम्हाला एवढा विवेक !
अन् कुठली या जीर्ण इतिहासाची
मातब्बरी !
कारण तीं आहेत पुराणांतलीं वांगीं,
अन् तुम्हाला आहे घडवायाचें, नव्या
मानवी मूल्यांनो (!)—
या वसुंधरेचें शांत चरित्र,
नवा धर्म आणि नवी सभ्यता यांचें
स्वर्गीय रामराज्य !!

परि आजच्या सम्राटांनो !
ध्यानांत ठेवा,
नव्हता उघडला जोंवर त्या भोळ्या
शंकराने
आपला प्रलयंकर तृतीय नेत्र
तोंवरच त्या उन्मत्त भस्मासुराचा
चालला होता स्वच्छंद हैदोस.
माझ्याचसारखे सहस्रावधि
आतां उमजून चुकले आहेत तुमचें सत्य-
स्वरूप—
प्रेताच्या टाळूवरील लोणी खाणारें.
आतां नाही फसणार कोणी
तुमच्या मुखाच्या आमिषाला.
खदखदतो आहे त्यांच्या अंतर्यामीं
जो अपमानाचा, अन्यायाचा खवळत
जमदग्नि
तोच करील तुमचा चेंदामेंदा,
लोळागोळा;
अन् फेकेल तुमच्या शरीराचीं खांडोळीं
क्रांतीच्या लाल डोहांत !

—वसंत निनावे

शांतम्—दह–!

★

अश्रु-सरोवर तमीं निर्मितां
अघटित दिसला देखावा मज
पाण्यावर शव एक येउनी
तरूं लागलें जणूं तराफा,
उष्णाश्रूंच्या बाष्पां मधुनी
तत् हृदयावर ये आकारा
शोक विव्हला ललना अवचित
रतीच दुसरी विलापमग्ना
काया गोरा वस्त्र काजळी
म्लान सुमांची कंठीं माला
पुसतां कुंकुम कच संभारें
'हाय ! हंत ! हा !' घाली पिंगा

प्रेत ललाटी अन्या प्रतिमा
प्रगट जाहली कुणी तपस्वी
जटिलो मुंडी लुंचित केश:
करीं कमंडलु भाव 'उदाता'
वदे तयाची गंभीर वाणी
'शांतम् ! शांतम् ! स्मर परमेश्वर !'

फोडी टाहो अधिक तथापी
दुजी जानकी 'हाय ! हंत ! हा !'
युवती शीर्षी रिक्त कमंडलु
करी तापसी 'ॐ'-उद्गारत
क्षणभर झाली निश्चल रमणी
दुज्या क्षणीं परि क्रोध कंपिता
करीं जमवुनी अश्रु आपुले
प्रक्षेपी ते 'दह !' किंचाळत
तापसदेहीं चिता भडकली
प्रेत ललाटीं भस्माचे थर
गुप्त जाहली ललना सहसा
आणिक गेलें शवहि तळाशीं !

'शांतम्–दह–' या परंतु वाणी
घुमती माझ्या अजून कानीं !

द. चिं. सोमण.

भुलावण

★

मीच गायिल्या गीतांचा
आकळेना अर्थ मला
मीच बोलल्या शब्दांचा
होत नाही बोध मला !

चित्र-रंग-संगतींत
विसंगती भासतसे
काढलेल्या रेघोट्यांत
विद्रूपसें रूप दिसे !

नित्य नवीन आकार
नित्य नवा अनुभव
कालच्याच प्रतिमांचा
राहत ना आज ठाव !

मातीखालच्या गाभ्याचें
अस्तित्वहि आकळेना
गर्भातल्या बाळाचीहि
हालचाल जाणवेना !

भुलावणीच्या खेळांत
फसलेलें माझें मन
गोंधळतें, बावरतें
आक्रंदतें विव्हळून !

गुणाकर देशपांडे.

ग्रंथ समीक्षा

चटके आणि गहिंवर

'चटके आणि गहिंवर' हा इंदूरच्या श्री. वि. ह. आपटे यांच्या कवितांचा संग्रह आहे. माळव्याने मराठी कवितेला पुष्ट करण्यांत बराच वर हात उचललेला आहे. माळव्यांत गेल्या तीस एक वर्षांपासून श्री. वि. ह. आपटे काव्य लेखन करीत आहेत. १९३६ मध्ये त्यांचा पहिला काव्यसंग्रह "माला" प्रसिद्ध झाला आणि आता हा दुसरा. तारखांकडे पाहून ठरविलें तर असें दिसून येईल की या संग्रहांतील पहिली कविता १९२४ मध्ये लिहिली गेली आणि शेवटली १९४९ मध्यें. म्हणजे गेल्या पंचवीस वर्षांत त्यांनी लिहिलेल्या कवितां पैकी ५७ ह्या संग्रहांत समाविष्ट करण्यांत आलेल्या आहेत. तांबे, माधवजूलियन, यशवंत, बी, सावरकर ह्या कवींच्या कित्येक कवितांचें वळण ह्या कवितांतून उमटलेलें दिसतें. अर्थात हें सुचवितांना कवीला गौणता आणण्याचा मुळीच उद्देश नाही. तसल्याच एखाद्या mood मध्ये कवि असतांना भावनांशी खेळतांना बोधपूर्व काव्यपंक्तींतील कल्पनांचा स्वैर अनुवाद होणे साहजिक आहे. कवीने म्हटलेंच आहे—

> बघून जगतांतली विषमता विषारी अती
> तसा मनुज संभ्रमी विफल कुंठलेली गती
> तदा तळमळे पिळे खळवळे झरे अंतर
> सदैव चटके जिवा गहिंवरास येई भर.
>
> अशा तळमळींतुनीं उठत भावनांचे थवे
> तथा प्रबळ मन्मनामधुन काव्य येई नवे.

कवितांचे वर्गीकरण केलें तर स्वराज्यपूर्व कालांतील गुलामीचे जोखड झुगारून देण्यासाठी प्रेरित करणाऱ्या शाहिरी थाटाच्या अनेक कविता आढळतात. शाहिरा गा म्हणणारी—"ऊठ शाहिरा" भारता जागा हो म्हणणारी—"ऊठ भारता" किंवा तरुण हो तयार व्हा हें सांगणारी "उठा तरुण हो" ह्या आहेतच. त्याबरोबर शाहिराला कुणांत कांही माहात्म्य आढळलें तर, 'गाऊं त्यांना आरती' ह्या चालीवर 'मस्तक माझें लवे' किंवा 'धर्मपुरुष' अशा कविता प्रस्फुटित होताना दिसतात. त्या सोबत कुठे 'प्रक्षोभाचा हुंकार' आहे तर कुठे 'वाट कुणाची कशास बघता' अशी Atlantic Charter भारतास लावण्यास चर्चिल तयार नाही हें कळल्यावरची प्रक्षोभक चेतावणी आढळते; तसेंच मधेंच निझामीचा उग्र रझाकारी नाच चित्रित होतो. वत्सलभाव दर्शक, बरसात, अमृतवृष्टि, राणी, माझी आई इत्यादि असून 'त्यांचा स्वभाव', "आवडत्या लेकी", किंवा "पाळणा" इत्यादि संसारी जनांच्या मौजा आहेत. प्रीतीच्या देवा, प्रीती मधेंच समाधी, प्रीतीचे पांखरूं आणि पंढरीची वारी इत्यादि चढत्या भाजणीची प्रीति व्यक्त करणाऱ्याहि कविता आहेत. कोठे कोठे गडकऱ्यांनी वर्णिलेल्या सहा विरहावस्थांपैकी, पहिल्या 'चिरविरहाच्या' दर्शक दोन उपरोधपूर्ण कविता आहेत. उतरणीच्या पायथ्याशी असलेला एक वृद्ध

चटके आणि गहिंवर—
लेखक व प्रकाशक—वि. ह. आपटे इंदूर, मूल्य २॥ रुपये.

"विरही विरहिणि होती व्याकुळ परस्परांच्यासाठी, मीहि व्याकुळ विरह परी हा नकळे कोणासाठी" म्हणतो. तर असल्याच अवस्थेंत असलेला असाच एक 'चिरविरही' युवक "झाली तयारी सगळी परंतु, भेटेन अद्यापहि एक संतू, जो दाखवी हाय उपासनेला, देवी मला, आज उपास केला" असे खेदोद्गार काढतो. 'नृपाला जाहला पुत्र' ही अशीच एक उपरोधपूर्ण सुंदर कविता आहे. अर्थात् संस्थानें विलीन होत असतांना नृपपुत्रांवर ममता करणारे आता विरळाच असणार. त्यांतील भाव त्यामुळे आता ऐतिहासिक होत जाणार.

प्रक्षोभाचा हुंकार, शिलाखंड, काळोखांत, माझादेव, देवाचा दगड ह्या कविता चांगल्याच आहेत. उदा. 'पंढरीचा तो देव, शिलाखंड, साठविले त्यामधे की त्रिखंड, भावगंगेचा पूर पदीं लोटे, दगडपण तें जाहलें येथ मोठें!' ह्या ओळी पहा. तसेंच 'काळोखांत' या कवितेंत--जन्माच्या आधी लोटली युगें काजळांत--मृत्यूनंतरहि लोपणे त्या काळोखांत—ह्या वघा. आता अशा अर्थाच्या ओळी लिहिणाऱ्या कवीने आपल्या संग्रहामुळे मराठी काव्यवाङ्मयांत भर पडते किंवा कसे ह्याची शहानिशा कशाला करावी?

—मा. नी. गलगलीकर

'ज्ञानदेव' प्रथम किरण
'ज्ञानदेव' द्वितीय व तृतीय किरण
श्री गुरु जयराम वाक्सुधा

हीं तीन पुस्तकें आमच्याकडे अभिप्रायार्थ आलीं असून त्यांचे लेखक श्री. जयराम बावा यांचीं वारकरी पद्धतीचीं कीर्तनें ऐकण्याचें व त्यांच्याशीं आधुनिक चिकित्सक दृष्टीच्या वाङ्मयीन भूमिकेवरून वारकरी सांप्रदायाच्या मार्गाविषयी व वाङ्मयसेवनाविषयी चर्चा करण्याचा योग यापूर्वीच प्रस्तुत अभिप्रायलेखकास लाभला आहे. महाराष्ट्रीय संतांच्या कृतींचा वाङ्मयीन दृष्ट्या आस्वाद मराठींत अनेक टीकाकारांनी चाखला आहे. परंतु केवळ 'वाङ्मय' म्हणजे वाणीने कीर्तन करून वा कानाने श्रवण करून साहित्याची अभिरुचि नव्हे तर जीवन विषयक अनुभूति त्यांतून घेऊन सहृदय परंतु निरक्षरप्राय जनतेच्या मनांवर त्यांमुळे कोणकोणते संस्कार उमटूं शकतात वा उमटले आहेत, याचा विचार फार क्वचित् झाला आहे. केवळ पांढरपेशा वर्गानेच संतसाहित्याचा वाङ्मयीन आस्वाद घेतला. परंतु ज्या वारकरी पंथाची ज्ञानदेव ही माउली आहे त्यांच्या दृष्टिकोणांतून हें साहित्य पाहावयाचें असल्यास प्रस्तुत तीन्ही पुस्तकें अतिशय उद्बोधक ठरतील. श्री. जयराम बावा व त्यांचे वारकरी सच्छिष्य श्री. पातूरकर यांच्या श्रमजीवि व्यवसायाकडे पाहिल्यास त्यांची ज्ञानदेवादिकांच्या वाङ्मय परिशीलनाने व निदिध्यासाने मानसिक उन्नति किती झाली हें जवळून अनुभवणें मोठें कुतूहलजनक

१. श्री. जयराम बावा विवरेकर यांचा विवेकामृतधारा अनुवादक–श्रीनारायण अंबादास पातूरकर, गवर्मेंट कार्पेंटर, विदर्भ महाविद्यालय, अमरावती व तु. गो. राक्षे, मुंबई, पृ. २४+९४ किंमत १॥ रु.

२. श्री. जयराम बावा विवरेकर पृ. ८+७६ किं. १॥ रु.

३. ज्ञानदेव प्रकाशन मंडळ, अमरावती, पृ. ६+१८० किं. १॥। रु.

आहे. ह्या वाङ्मयाची अत्युच्च पदवी धारण करणाऱ्या उच्चपदस्थ अशा कोणत्याहि 'साहित्यिका'पेक्षा अत्यंत मृदु कनवाळू व भक्तिरसाचा आस्वाद घेण्यास अधिकारी अशा मनोभावनेचा विकास त्यांच्या ठिकाणीं झाला असून केवळ 'वाक्चातुर्याने सुखिया' झालेल्या आम्हा अहंकेंद्रित व हेवेदावे करणाऱ्या जेष्ठ कनिष्ठ साहित्यमतंगजांहून संतांच्या वचनांतील 'साखरेचे रवे' लुटणाऱ्या या वारकरी सहृदयांबद्दल मस्तक आदराने नम्र होतें. प्रस्तुत लेखकाने त्यांच्या विवेचनांतील, कांही भाषिक, पाठभेदात्मक, व्याकरणात्मक, साहित्यशास्त्रीय उणिवा त्यांना समजावून सांगतांच त्या प्रेमादरपूर्वक व निष्कपट मनाने त्यांनी वाद न घालतां मान्य केल्या. ज्ञानदेवांचे हार्द कितीतरी अधिक जाणणाऱ्या वयोवृद्ध व खऱ्या अर्थाने ज्ञानतपोवृद्ध अशा आधुनिक वारकरी संताने आपलाच पराभव झाल्याचें कबूल केलें हा अनुभव ज्ञानलव-दुर्विदग्धांच्या बरोबरीच्या वा वरचढ साहित्यिकांच्या चर्चेत क्वचितच् येणार! मराठी जनतेच्या रोमरोमांत 'ज्ञानदेव' खरोखर कोठें आहे हें पाहावयाचें असल्यास ही तीन्ही पुस्तकें प्रत्येक मराठी वाचकाने अवश्य वाचावी ह्मणजे वरील अनुभवाचें रहस्य थोडेबहुत तरी कळेल.

'ज्ञानदेवा'च्या प्रथम किरणांत श्रीसद्गुरु जयराम बाबा यांचें चरित्र दिलें असून तें प्राचीन संतचरित्राच्या चालीवर श्री. तु. गो. राक्षे यांनी लिहिलें आहे. या व पुढील किरणांत व श्रीजयराम वाक्सुधा या ग्रंथांत कर्म, उपासना, ज्ञान, कीर्तन, रूप, प्रेमाचा वाद व ऐक्याची सिद्धी, ज्ञानदेवांच्या एका अद्वैतपर अभंगाचा खुलासा व कृष्णचरित्रांतील एक अचंबा वर्णन केला आहे. हें सर्वच विवेचन ज्ञानदेवादि संतांच्या वचनांच्या आधारावर वारकरी संप्रदायाच्या शैलीनुसार भाविकरीतीने केलें आहे. त्याला संशोधनात्मक सर्व कसोट्या लावणें न्याय्य होणार नाही. अनुभव हीच खरी कसोटी. वारकरी मतें वाङ्मयनिविष्ट केल्याबद्दल ज्ञानदेव प्रकाशन मंडळाला धन्यवाद.

—माधव गोपाळ देशमुख

भारतीय राष्ट्रपुरुष

हें पुस्तक विशेषेंकरून विद्यार्थ्यांकरिता लिहिलें आहे. गेल्या १२५ वर्षांतील एकूण पंधरा महापुरुषांची चरित्रें ग्रथित करून हा रत्नहार प्राचार्यांनी भारतीय स्वातंत्र्य-लक्ष्मीला समर्पण केला आहे. एकूणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रियत्वाचा उगम आणि त्याचा सतत वाहणारा अखंड प्रवाह या पुस्तकांत एकसमयावच्छेदेंकरून पहावयास मिळतो. स्वर्गीय दादाभाई नौरोजी यांनी स्वातंत्र्याची मूर्ति मनोमय तयार करून ती भारतीय जनतेसमोर ठेवली इतकेंच नव्हे तर विलायतेच्या पार्लमेंटचे सभासद होऊन साम्राज्यसरकारच्या त्या सभागृहांत हिंदवी स्वराज्याचा प्रश्न उपस्थित केला. अशा प्रकारें दादाभाई यांनी घातलेल्या स्वराज्याच्या पायापासून आणि राष्ट्रियत्वाच्या पेरलेल्या बीजापासून या पुस्तकाला प्रारंभ होतो. हळुहळू राष्ट्रियत्व वाढीस लागलें व स्वराज्य आकारास येऊं लागलें असा गोड प्रत्यय पुढील एकेका चरित्रांतून येऊं लागतो. स्वर्गीय महात्मा गांधी यांचें चरित्र या पुस्तकांत

भारतीय राष्ट्रपुरुषः—श्री. भी. गो. देशपांडे, एम्. ए., बी. टी. प्राचार्य स्वावलंबन विद्यालय, वर्धा.

क्रमांकाने आठवें आहे. कळत वा नकळत तें मध्यावर आल्यामुळे त्याची योग्यता कौस्तुभ मण्याप्रमाणेच असल्याचा अनुभव येतो. महात्माजींच्या ह्यातींत स्वराज्य मूर्तिमंत पदरांत पडले. या पुस्तकांतील शेवटचीं तीन चरित्रें डॉ. राजेंद्रप्रसाद, मौलाना आझाद व पंडित नेहरू या विद्यमान नेत्यांचीं आहेत. या चरित्रांतून स्वराज्याचीं अमृतमधुर फळें सेवन करणारे भारतीय ह्मणून एकप्रकारची कृतार्थता वाटते. स्वराज्याच्या भव्य मंदिराचे, पायापासून कळसापर्यंत एकदम दर्शन या पुस्तकांत घडते व त्याबद्दल लेखकास शतशः धन्यवाद द्यावेसे वाटतात.

भारतीय राष्ट्र पुरुषांच्या विस्तारलेल्या चरित्रग्रंथांतून नेमकी विद्यार्थ्यांस उपयुक्त अशी माहिती निवडून काढणे हें काम कष्टाचें तर आहेच पण काय घ्यावें आणि काय टाकावें या बाबतींत लेखकाने दाखविलेला संयम अत्यंत स्पृहणीय आहे आणि ह्मणूनच त्यांना १५ राष्ट्रपुरुष अवघ्या १८८ पृष्ठांत सुखेनैव गोवता आले.

"लेखक पडले शिक्षक, त्यांतूनहि पडले निष्ठावंत; भाडोत्री गुरुंच्या सदरांत गणना करणे अशक्यच. झालें, शिष्यप्रेमाला पूर आला, प्रेमाचा प्रभाव या पुस्तकाचे रूपाने प्रगट झाला; विद्यार्थी आणि गुरु उभयता प्रेमाने आणि सेवाभावाने कृतार्थ झाले."

वरील चार ओळींत लेखकाच्या भाषेचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. ती पौराणिक पद्धति नव्हे. साने गुरुजींच्या शैलीशी वरील भाषेचें साम्य आहे असेहि म्हणतां येत नाही किंबहुना या पुस्तकांतील भाषेस शैली आहे असें म्हणणें धाष्टर्याचेंच ठरेल.

कांही शब्द, वाक्यें आणि वाक्यार्थ वाचतांना तर खटकल्यासारखे होतें. 'गद्‌गद' हा शब्द या पुस्तकांत ३।४ वेळां आला आहे, पण तो आहे त्या स्वरूपांत शुद्ध वाटत नाही. तसेंच 'अविधया' हा शब्द अनेक ठिकाणीं आला आहे पण तोहि पुरेसा अर्थवाहक वाटत नाही. 'वर्धित-उत्साह' असे कित्येक शब्द संधि न करतां लिहिले आहेत. कांही ठिकाणीं वाक्‌विलास असाहि शब्द आहे. 'वाग्विलास' असा शुद्ध शब्द आहे. वरीलप्रमाणे कांही ठिकाणीं संधि टाळले तर कांही ठिकाणीं विनाकारण केले आहेत. २१ पानावर 'कॉंग्रेसला त्यागले', असे वाक्य आहे. व्याकरण दृष्ट्या हा प्रयोग शुद्ध असला तरी कर्णकटु वाटतो. पंडित नेहरूंच्या चरित्रांत १६९ पानावर 'नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ' या उपमेचा उल्लेख अप्रासंगिक आणि अनुचित वाटतो. दोन तीन चरित्रांत 'अनुपेक्षणीय' हा शब्द घालून वाक्य बनविले आहे उदा:— 'फेरोजशहा मेथा ही एक अनुपेक्षणीय व्यक्ति होय' हें १८ पानावरील वाक्य पहा. अशींच वाक्यें आणखी एकदोन ठिकाणीं आहेतच. वरील वाक्याचा अर्थ, उपेक्षा न करतां येणारी व्यक्ति एवढाच होतो पण यामध्ये यथार्थ गौरवाची भावना सिद्ध होत नाही. तेथे अविस्मरणीय हा शब्द उचित होय.

कांही चरित्रांत, चरित्रनायकाचे एकेका वाक्यांत एकाच गुणविशेषाचें सूत्रमय वर्णन केलें आहे. ते फारच रमणीय आणि उपयुक्त आहे. उदा०—'Efficiency thy name is Jawaharlal Nehru' (पान १७७)

विद्यार्थी—जगतांत लेखकाने केलेल्या परिश्रमाचें यथोचित स्वागत झाल्याशिवाय राहणार नाही. लेखकाचें हें पुस्तक तरुण पिढीस अत्यंत उपकारक होईल यांत शंका नाही.

—ब. ना. एकबोटे

पोच

पुस्तकाचें नांव	लेखक	प्रकाशन संस्था–किंवा पत्ता
१ देमांद माहात्म्य	वि. का. प्रियोळकर	लोकवाङ्मय प्रकाशन माहीन, मुंबई
२ श्रीगुरू जयराम वाक्सुधा	सौ. कानडे	राम मारुति रोड, दादर, मुंबई
३ ज्ञानदेव–भाग १,२		ज्ञानदेव प्रकाशन मंडळ, अमरावती
४ जयजयवन्ती	मा. गो. काटकर	५२१ शुक्रवार, सोलापूर
५ संपादकाचा खून	वा. ह. शिंदे	विजयरहस्यमाला, राठी–मार्केट, वर्धा
६ बहुरूपी	मुकुंद गाडीवान	
७ वीज	चंद्रकांत रत्नपारखी	
८ गीतेंतील गूढ	भा. दे. पतकी	,,
९ उन्नतीचा जाहीरनामा	भालचंद्र सदाशिव	शेरकर निवास, खरेनगर नागपूर
१० सार्वजनिक संसार	लीला वाचासुंदर	किरण कार्यालय, बजेरिया नागपूर
११ मुक्तेश्वरकृत महाभारत	अ. का. प्रियोळकर	मराठी ग्रंथ संग्रहालय ठाकूरद्वार, मुंबई २
१२ आग्र्याहून सुटका (परीक्षण)	ब. ना. एकबोटे	श्रीउत्तमश्लोक ग्रंथ प्रकाशन-मंडळ, उमरखेड
१३ शेला	इंदिरा	
१४ हिन्दी भाषा और लिपी परिचय	वि. श्रा. चौधरी	जनसेवक प्रिंटिंग प्रेस, जळगांव पूर्व खानदेश
१५ विष्णुदास चरितामृत १	न. स. जोशी उर्फ खडशीकर शास्त्री	व्हीनस बुकस्टॉल, पुणे २
१६ नव्या व जुन्या कथा-काराचें वाग्युद्ध	ल. वा. पडोळे	पूजा प्रकाशन, नागपूर
१७ व्यवहार कोशः	स. ना. कुळकर्णी	प्र. स. कुळकर्णी धरमपेठ, नागपूर
१८ मराठी ग्रंथालयांचा इतिहास	सं. ल. वा. पडोळे	पूजा प्रकाशन, नागपूर
१९ सेवेचा सागर	कृष्णमूर्ति	मातृभूमि प्रकाशन, अकोला

विदर्भ साहित्य संघ

कार्यकारी मंडळाचें कामकाज

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार ता. २० जानेवारी १९५२ रोजी दुपारी ३॥ वाजतां वि. सा. संघाच्या कार्यालयांत संघाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेला सौ. विमलाबाई देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. नानासाहेब जोग आणि नागपूर नाट्यमंडळाचे कार्यवाह श्री. बाबुराव चिमोटे हे विशेष निमंत्रणाने हजर होते. सभेंत पुढील कामकाज झालें :—

प्रथम चिटणीस श्री. रा. पु. सगदेव यांनी मागील सभेचें प्रतिवृत्त वाचून दाखविलें. त्यानंतर अर्थ समिति, परीक्षा समिति, साहित्यसंस्था–सहकार–समिति आणि प्रकाशन समिति यांचीं प्रतिवृत्तें त्यांच्या आमंत्रकांनी वाचून दाखविलीं.

(१) नंतर ऑडिटर श्री. महेश्वर गद्रे यांच्याकडून तपासून आलेले जानेवारी १९५१ ते ३० नोव्हेंबर १९५१ पर्यंतचे हिशेब वाचून मंजूर करण्यांत आले.

या हिशेबाच्या तक्त्यांत रिसीटस् या सदराखाली ग्र्यॅंटस् आणि डोनेशन्स असा जो उल्लेख आहे त्याच्यापुढे रुपयें ६२०७–०–० हा आंकडा दिलेला आहे. त्यांत उपकर्त्यांकडून आलेली वर्गणी देखील समाविष्ट करण्यांत आलेली आहे. कांही उपकर्त्यांनी दिलेली वर्गणी विशेष कार्यासाठी म्हणून (earmarked) दिलेली आहे. ती लक्षांत घेऊन तशाप्रकारची दुरुस्ती जमाखर्चाच्या तक्त्यांत हिशेब तपासनिसाकडून करवून घेण्यांत यावी, अशी सूचना श्री. ए. श्री. पटवर्धन आणि श्री. पु. य. देशपांडे यांनी केली आणि ती सर्वानुमतें मान्य करण्यांत आली.

(२) हिशेब मंजूर झाल्यावर पुढील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला :—

"वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची ही सभा वि. सा. संघाच्या रकमा मुदतीच्या ठेवी म्हणून मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह ब्यांकेंत वेळोवेळी ठेवण्याचा आणि त्यासंबंधी जरूर ते सर्व व्यवहार करण्याचा अधिकार वि. सा. संघाच्या अध्यक्षांना देत आहे."

सूचक—प्रा. वि. भि. कोलते
अनुमोदक—श्री. ना. क. तांबी

(३) १९५२–१९५३ सालांच्या निवडणुकीसंबंधी कार्यकारी मंडळाचे गोंदिया येथील सदस्य श्री. नां. ग. डबीर यांनी संघाध्यक्षांना ता. १८–१–५२ रोजी पाठविलेलें पत्र सभेपुढें ठेवण्यांत आलें. त्यावर चर्चा होऊन पुढील ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला :—

"१९५२–१९५३ सालांसाठी कार्यालयाने चालू केलेल्या निवडणुकीच्या कार्यवाहीबद्दल घटनात्मक अडचणी निदर्शनाला आणून देण्यांत आल्यामुळे आकोला येथील साधारण सभेंत संमत झालेल्या ठरावाचा आणि तदनुषंगिक प्रश्नांचा विचार करून असें ठरविण्यांत येतें की अकोला येथील साधारण सभेने दिलेल्या आदेशा-

नुसार वि. सा. संघाच्या घटनेचे पुनर्लेखन (Redrafting) होऊन ती साधारण सभेकडून मंजूर होईपर्यंत निवडणुकीबाबतची सर्व कार्यवाही जुन्या घटनेच्या नियमानुसारच व्हावयाला पाहिजे. तरी नवीन निवडणुकी जुन्या घटनेच्या नियमानुसार व्हाव्यात व त्या निवडणुकी ता. १ मार्च १९५२ पूर्वी कार्यालयाने आटोपाव्या."

सूचक—श्री. प्र. ना. खोडे
अनुमोदक—श्री. द. रा. गोमकाळे

(४) अस्थायी नाट्योत्सव समितीकडून आलेली नाट्योत्सवाची योजना आणि त्या योजनेसंबंधीचे अस्थायी समिति आणि नागपूर नाट्यमंडळ यांचे कार्यवाह श्री. बाबुराव चिमोटे यांचे पत्र हीं दोन्ही सभेपुढे ठेवण्यांत आलीं. त्यांच्यावर चर्चा होऊन पुढील ठराव सर्वानुमतें करण्यांत आला—

" नाट्योत्सव अस्थायी समितीकडून आलेलें पत्र आणि नाट्योत्सवाची योजना यांचा सविस्तर विचार करून ही सभा असें ठरविते की नाट्योत्सव अस्थायी समितीला स्थायी स्वरूप देण्यांत यावे व या स्थायी समितीला वि. सा. संघाने प्राथमिक खर्चासाठी एकहजार रुपये द्यावे. या सभेची अशी अपेक्षा आहे की नाट्योत्सवाची सर्व जबाबदारी स्थायी समितीने अंगिकारावी व तिला विदर्भ साहित्यसंघ आणि नागपूर नाट्यमंडळ या संस्थांच्या सर्व सदस्यांनी हार्दिक सहकार्य द्यावें."

सूचक—डॉ. य. खु. देशपांडे
अनुमोदक—श्री. पु. य. देशपांडे

(५) प्रकाशन समितीचे आमंत्रक श्री. ह. ना. नेने यांनी निबंध परिमलाच्या प्रकाशनासंबंधी सादर केलेलें प्रतिवृत्त साभार स्वीकारण्यांत आलें व त्यासंबंधी पुढील ठराव सर्वानुमतें करण्यांत आला—

"निबंध परिमलाच्या संपादन कार्याबद्दल कार्यकारी मंडळ श्री. ह. ना. नेने यांचे हार्दिक आभार मानतें आणि मानधन म्हणून रुपये १३० त्यांना देण्यांत यावेत असें ठरवितें"

सूचक—प्रा. वि. भि. कोलते
अनुमोदक—श्री. पु. य. देशपांडे

(६) श्री. नानासाहेब जोग आणि प्रा. श्री. पु. ल. देशपांडे यांच्या अनुक्रमे 'भारती' आणि 'अंमलदार' या नाटकांसंबंधी श्री. जोग यांच्याकडून आलेलें ता ८-१-५२ चें पत्र सभेपुढे ठेवण्यांत आलें. त्यावर चर्चा होऊन पुढील ठराव सर्वानुमतें करण्यांत आला.

"श्री. नानासाहेब जोग आणि प्रा. पु. ल. देशपांडे यांच्या अनुक्रमे भारती आणि अंमलदार या दोन नाटकांच्या प्रकाशनासंबंधी श्री. जोग यांच्याकडून आलेलें जें पत्र प्रकाशन समितीचे आमंत्रक श्री. ह. ना. नेने यांनी वाचून दाखविलें त्यांतील सूचनांना ही सभा संमति देते. व श्री. जोग आणि प्रा. पु. ल. देशपांडे यांचे हार्दिक आभार मानते.

सूचक—श्री. प्र. ना. खोडे
अनुमोदक—डॉ. य. खु. देशपांडे.

अनुक्रमणिका

(७) श्री. वा. कृ. चोरघडे यांचे ता. ३१-१२-५१ चें त्यागपत्र सभेपुढे ठेवण्यांत आलें. त्या पत्रासंबंधी अध्यक्षांनी श्री. चोरघडे यांच्याशी विचारविनिमय करावा असें ठरलें.

(८) श्री. निनावे यांना संघलेखक म्हणून रु. ५० वर आणि किसन याला चपराशी म्हणून दरमहा रु. ३० वर जे नेमण्यांत आले त्या नेमणुकीला मंजुरी देण्यांत आली.

यानंतर उरलेल्या विषयांच्या विचारार्थ कार्यकारी मंडळाची तहकूब सभा रविवार ता. २७-१-१९५२ रोजी दुपारी २ वाजतां कार्यालयांत भरविण्यांत यावी असें सर्वानुमतें ठरलें.

कार्यकारी मंडळाच्या स्थगित सभेचें कामकाज

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची स्थगित सभा रविवार ता. २७ जानेवारी १९५२ रोजी दुपारी २ वाजतां केंद्रीय कार्यालयांत भरली होती. या सभेला श्री. आ. रा. देशपांडे आणि डॉ. मा. गो. देशमुख हे विशेष निमंत्रणाने हाजर होते. सभेंत पुढील कामकाज झालें :—

(१) श्री वा. कृ. चोरघडे यांनी विचारविनिमयानंतर आपला राजीनामा परत घेण्याचें मान्य केले याबद्दल सभेने समाधान व्यक्त केलें.

(२) वि. सा. संघाचे पहिले अध्यक्ष कै. वा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें चित्र विदर्भ साहित्य मंदिराच्या सभागृहांत अग्रभागी लावण्याच्या सूचनेसह श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी जी देणगी तें चित्र तयार करण्यासाठी देण्याची आपली योजना अध्यक्षांना कळविली आहे तिला सभेने संमति दिली.

(३) श्री. शं. ना. सहस्त्रबुद्धे यांची ता. २२–१–५२ आणि ता. २५–१–५२ अशा दोन तारखांचीं पत्रें वाचून दाखविण्यांत आलीं. ता. २२–१–५२ च्या पत्रांत श्री. सहस्त्रबुद्धे यांनी जी अयोग्य भाषा वापरली आहे आणि जे हेत्वारोप केले आहेत त्याबद्दल सभेने तीव्र नापसंती व्यक्त केली.

(४) वि. सा. संघाचे माजी सरचिटणीस कविभूषण प्रा. ब. ग. उर्फ अण्णा साहेब खापर्डे यांनी ता. २२–१–५२ रोजी पाठविलेलें पत्र आणि त्याला सरचिटणी-सांनी घातलेलें उत्तर वाचण्यांत आलें. श्री. खापर्डे यांनी संघाचे त्यांच्या जवळ असलेले सर्व कागद पत्र आणि सामान संघाच्या अगत्यपूर्वक स्वाधीन केल्याबद्दल व त्याबरोबरच आपल्याकडे असलेला संघाचा निधीहि स्वाधीन करण्याचें आश्वासन दक्षतेने दिल्याबद्दल सभेने समाधानपूर्वक आभार व्यक्त केले.

(५) यानंतर घटनेच्या पुनर्लिखित मसुद्यावर कलमवार चर्चा करण्यास सुरवात झाली. घटनेच्या मसुद्यासंबंधी कार्यकारीमंडळाचे गोंदिया येथील सदस्य श्री. ना. ग. डबीर यांचें ता. २५–१–५२ चें पत्र वाचण्यांत आलें व त्यांतील सूचनांचाहि अगत्यपूर्वक विचार करण्यांत आला. ही चर्चा रात्री ९। पर्यंत चालली. सभेने घटनेचा मसुदा कांही संशोधनें आणि सुधारणा करून मंजूर केला.

(६) या सभेंत येत्या निवडणुकीसंबंधी डॉ. कोलते यांनी तयार केलेलें पत्रकहि मंजूर होऊन निवडणुकीची कार्यवाहि निश्चित करण्यांत आली.

कामकाजाचे नियम

(१) संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यांतून निदान एकदां तरी भरवावी. विशेष प्रसंगीं तांतडीची सभा बोलावण्याचा अधिकार अध्यक्ष व सरचिटणीस यांना राहील व त्यासाठीं निदान तीन दिवसांची नोटीस देण्यांत येईल.

(२) कार्यकारी मंडळाची गणसंख्या ४ राहील. गणसंख्या न जमल्यास सभेच्या त्याच दिवशीं व त्याच जागीं, आगाऊ पूर्व सूचना दिली असल्यास, पूर्वनियोजित सभेच्या वेळेनंतर अर्ध्यातासाने ही सभा भरविता येईल. मात्र अशा सभेंत कार्यक्रम पत्रिकेव्यतिरिक्त कोणतेंहि कामकाज करता येणार नाहीं.

(३) कार्यकारी मंडळाची सभा बोलाविण्यास सवड नसेल तर. सभासदांचा लेखी अभिप्राय मागवून अध्यक्षांना तांतडीचीं कामें करता येतील. का. का. मंडळाच्या चार सभासदांनीं या कामास आपली लेखी असंमति कळविल्यास त्या कामासाठीं सभा बोलाविली पाहिजे.

(४) संघाच्या दैनंदिन खर्चासाठीं म्हणून, आवश्यक असल्यास, कार्यालय चिटणीसांजवळ रु. १०० (शंभर) पर्यंत रक्कम ठेवता येईल. यापेक्षां अधिकची रक्कम तावडतोब बँकेंत जमा करावी.

(५) संघाचे सर्व प्रकारचें रोकड उत्पन्न रोजच्या रोज रोकड-बुकांत नोंदलें पाहिजे; व त्याची पावती दिली गेली पाहिजे.

(६) संघाचे सर्व जमाखर्च नियमानुसार ठेवण्याची जबाबदारी कार्यालय चिटणीस, सर. चिटणीस व अध्यक्ष यांजवर राहील.

(७) प्रत्येक खर्चाचें व्हाउचर घेतलें पाहिजे, किंवा कार्यालय चिटणीसानें त्या खर्चाचें सर्टिफिकेट दिलें पाहिजे.

(८) कार्यालय चिटणीसांना १० रु. पर्यंतचा खर्च करण्याचा अधिकार राहील. त्यावरील खर्चास अध्यक्षांची लेखी संमती घेतली पाहिजे.

(९) जमाखर्चासाठीं रोजनामा, खातेबुक, जमेच्या पावत्या व खर्चाचे व्हाउचर्स अगर चिटणीसांचें सर्टिफिकेट हीं टेवलीं पाहिजेत.

(१०) बँकेचीं पासबुकें व चेकबुकें कार्यालय चिटणिसांच्या ताब्यांत राहतील. बँकेंतून खर्चासाठीं रक्कम काढावयाची झाल्यास अध्यक्षांची लेखी परवानगी घेऊन, त्यांच्या आदेशाप्रमाणें कार्यालय चिटणिसांनीं चेक लिहून कोशाध्यक्षाकडे सहीसाठीं पाठवावा; व अध्यक्षांचा हुकूम पाहून त्यावर कोशाध्यक्षांनीं स्वाक्षऱ्या कराव्यात.

(११) संघाचें कार्यालय, कागदपत्र, हिशेब वगैरे संघाच्या कोणत्याहि सभासदास पहावयाचें असल्यास, तशा अर्थाची कमीत कमी तीन दिवसांची पूर्वसूचना चिटणिसाला दिली पाहिजे. म्हणजे कार्यालयाच्या सोईप्रमाणें कार्यालयाच्या कामाच्या वेळांत ती पहावयास मिळतील.

(१२) अध्यक्षांचे अनुपस्थितींत उपाध्यक्ष अध्यक्षांचीं कामें करतील. एखाद्या सभेस दोघेहि अनुपस्थित असल्यास हजर असलेले सभासद त्या सभेपुरता आपल्यांतून अध्यक्ष निवडतील.

अनुक्रमणिका

(१३) कार्यकारी मंडळाच्या सभासदांना, जेथें सभा असेल त्या ठिकाणचे जर ते रहिवासी नसतील तर, जातां-येतांचें तिसऱ्या वर्गाचे रेल्वे-भाडें (अगर मोटारचें साधारण भाडें) देण्यांत येईल. मात्र संमेलनाच्या वेळीं भरणाऱ्या सभांचा असा प्रवासभत्ता मिळणार नाहीं.

(१४) संघाचें नियतकालिक नीट चालविण्यासाठीं एक संपादक-मंडळ कार्यकारी मंडळ नेमील, त्याच्या सल्ल्यांने व सहकार्याने तें नियतकालिक संपादक चालवितील.

(१५) कार्यकारी मंडळाने एक स्थायी अर्थसमिति नेमावी व तिनें संघाचे जमाखर्च व हिशेब ठेवणें या बाबतींत सहाय्य करावें.

(१६) संघाच्या सर्व मालमत्तेचें एक स्टॉक रजिस्टर कार्यालय चिटणीस ठेवतील.

परीक्षा समिति

१. परीक्षा समितीची सभा दिनांक १९-११-१९५१ रोजी संध्याकाळीं ६ वाजतां संघाच्या कार्यालयांत भरली होती. त्यावेळीं पुढील सभासद अुपस्थित होते. डॉ. शं. दा. पेंडसे; प्रा. श्री. ना. बनहट्टी; डॉ. मा. गो. देशमुख; श्री. दि. हृ. सहस्रबुद्धे; डॉ. वि. भि. कोलते व सौ. अुषा कोलते. (कार्यावाह.)

२. प्रथम जानेवारी १९५२ मध्ये होणाऱ्या निरनिराळ्या परीक्षांसाठी परीक्षकांचीं नांवें निश्चित करण्यांत आलीं व नंतर अभ्यासक्रमांत पुढीलप्रमाणे फेरफार केले.

साहित्यविनीत 'सत्तेचे गुलाम' (वरेरकर) अैवजी 'आग्र्याहून सुटका' (औंधकर)

साहित्यपरिचित प्रश्नपत्रिका १ मधील 'मधुकर' (विनोबा) अैवजी 'निबंध-परिमळ'—(सं. हृ. ना. नेने.)

साहित्यस्नातक प्रश्नपत्रिका १ मधील 'प्रेमशोधन' (कोल्हटकर) अैवजी 'शारदा' (देवल). प्रश्न पत्रिका २ मधील 'ज्ञानेश्वरी. अध्याय १ ला' (राजवाडे प्रत) अैवजी 'ज्ञानेश्वरी अध्याय २ रा' (राजवाडे प्रत)

साहित्यपारंगत प्रश्नपत्रिका १ मधील 'वायुलहरी' (खांडेकर) अैवजी 'वासन्तिका' (खांडेकर);. प्रश्नपत्रिका ३ मधील 'शारदा' (देवल) अैवजी 'संशय-कल्लोळ' (देवल). प्रश्नपत्रिका ४ मधील 'महाराष्ट्र सारस्वत भाग १ व २' (भावे) अैवजी 'महाराष्ट्र सारस्वत' ४ थी आवृत्ति (भावे). प्रश्नपत्रिका ५ मधील 'प्रा. बनहट्टींचें दर्यापूरचें भाषण' अैवजी 'अलंकार चंद्रिका' नवी आवृत्ति (गोरे).

३. वि. सा. संघाच्या जानेवारी १९५२ च्या परीक्षा दिनांक ५ व ६ रोजीं आकोट, अकोला, अमरावती, आर्वी, कारंजा, गोंदिया, चांदा, जबलपूर, तुमसर, दारव्हा, पुसद, बल्लारपूर, भंडारा, यवतमाळ, लाखनी, वरुड, साकोली, नांदुरा व नागपूर अशा अेकूण २० ठिकाणीं झाल्या. नागपुरांत भारतीय भाषाध्ययन मंदिर व भगिनीमंडळ अशीं दोन केंद्रें होतीं. सर्व परीक्षांना मिळून अेकूण ४०७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. त्यांतून ३५९ विद्यार्थी परीक्षांना बसले व २४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

परीक्षा	उमेद्वार	अनुपस्थित	उत्तीर्ण	शेकडेवारी
मराठी प्रवेश	१७	१	१४	८७
मराठी प्रारंभ	७३	३	५३	७५
साहित्यविनीत	२३४	२२	१३१	६१
साहित्यपरिचित	५९	१४	२९	६४
साहित्यस्नातक	२४	८	१३	८१

४. परीक्षक वर्ग–मराठी प्रवेश—सौ. उषा कोल्हे; मराठी प्रारंभ—प्रा. दा. ल. अडोणी; साहित्यविनीत [१] श्री. दि. व. पंडित; [२] श्री. ज. श्री. देशपांडे [३] श्री. कृ. मा. चवरे; साहित्यपरिचित प्रश्नपत्रिका १ ली. श्री. ह. ना. नेने; प्रश्नपत्रिका २ री. श्री. श्री. मा. कुळकर्णी; साहित्यस्नातक प्रश्नपत्रिका १ ली. डॉ. मा. गो. देशमुख; प्रश्नपत्रिका २ री—प्रा. श्री. ना. बनहट्टी; प्रश्नपत्रिका ३ री–प्रा. द. के. केळकर मुंबई;

५. केंद्राधिकारी आणि सहाय्यक.

अकोट. केंद्राधिकारी—श्री. मा. चं. बहादकर; सहाय्यक—श्री. जी. डी. देशपांडे; श्री. म. शि. देशमुख.

अकोला. केंद्राधिकारी—श्री. त्र्यं. व. जोग.

अमरावती. केंद्राधिकारी—श्री. द. शं. फडके; सहाय्यक—श्री. काळे.

आर्वी. केंद्राधिकारी–श्री. ह. ध. सगणे; सहाय्यक—श्री. हणवंते; व सौ. तिमोथी.

कारंजा. केंद्राधिकारी—मो. वि. फुरसुले; सहाय्यक–श्री. वा. दे. धुमाळे व श्री. ज. अं. वासे.

गोंदिया. केंद्राधिकारी–श्री. ना. ज. डबीर.

चांदा. केंद्राधिकारी–श्री. तु. ना. काटकर (अध्यक्ष, गोण्डवन साहित्य संस्था.) सहाय्यक—अेस्. पी. पुणेकर, श्री. के. व. देवाड व श्री. ओंकार ढेमे.

जबलपूर. केंद्राधिकारी–प्रा. गो. मो. रानडे. साहाय्यक–श्री. वि. कृ. देशपांडे; श्री. श्री. अे. खिरवडकर, श्री. श्री. ग. ताह्मनकर, श्री. अे. गो. धांडे, श्री. पु. ग. अडावदकर, श्री. पंढू रानडे, प्रा. ना. मा. बक्षी व श्री. वा. वी. देशमुख.

तुमसर. केंद्राधिकारी–श्री. शं. वि. काणे. सहाय्यक—श्री. गुप्ते, श्री. सरदेशपांडे, श्री. जोशी, श्री. कन्हाळकर व श्री. तारे.

दारव्हा. केंद्राधिकारी—श्री. कृ. आ. पाठक, साहाय्यक–श्री. कृ. पां. काणे, श्री. वि. मा. डाऊ व श्री. श्री. म. जिरगे.

पुसद—केंद्राधिकारी—श्री. द. ना. हुद्दार; सहाय्यक—श्री. वा. वि. जकाते श्री. ह. मो. अत्रे व श्री. वि. कृ. देवस्थळे.

बल्लारपूर—केंद्राधिकारी—श्री. अ. म. निळे; सहाय्यक—श्री. मा. ना. बंडावार.

भंडारा—केंद्राधिकारी—श्री. ना. ल. पोतदार; सहाय्यक—श्री. मो. वि. डोंगरे; श्री. म. गो. बाकरे व श्री. गो. वा. मुळे.

यवतमाळ—केंद्राधिकारी—श्री. शं. य. मेलग; सहाय्यक—श्री. वेटावदकर; श्री. मोहरीर; श्री. ना. ना. हूड; श्री. जोशी; प्रा. दाते व सौ. मंगलाबाओी दाते.

लाखनी—केंद्राधिकारी—श्री. प. गो. लाखनीकर; सहाय्यक—श्री. मु. ना. देशपांडे; श्री. रो. सि. गोमासे व श्री. ना. तु. निखाडे.

वरूड—केंद्राधिकारी—श्री. वि. म. वायकोळे; सहाय्यक—श्री. व्ही. पी. मालपे; श्री. जी. आर. पवार व श्री. के. जी. टाकोडे.

साकोली—केंद्राधिकारी—श्री. गो. आ. भांडारी.

नांदुरा—केंद्राधिकारी—श्री. म. के. राजूरकर; सहाय्यक—श्री. कृ ग. दारव्हेकर; श्री. वि. वा. पांडे व श्री. देशपांडे.

नागपूर—(अ) भारतीय भाषाध्ययन मंदिर—केंद्राधिकारी—प्रा. पां. कृ. सावळापूरकर; सहाय्यक—श्री. मा. के. वैतुले.

(आ) भगिनी मंडळ—केंद्राधिकारी—सौ. सुशीलाबाओी मोहनी; सहाय्यक—सौ. शांताबाओी माणकेश्वर.

६. वर निर्देशिलेले परीक्षक, केंद्राधिकारी व सहाय्यक या सर्वांचे आम्ही फार आभारी आहोंत.

७. पुढील परीक्षा दिनांक २३ व २४ ऑगस्ट १९५२ रोजीं होतील. ह्याच-वेळी साहित्यपारंगतचीहि परीक्षा होओील. अुमेदवारांनी या परीक्षेसाठी अर्ज पाठ-विण्याची शेवटची तारीख १ ऑगस्ट १९५२ ही निश्चित केलेली आहे.

उषा कोलते
कार्यवाह
परीक्षा समिति.

११-२-१९५२.

जानेवारी १९५२ परीक्षांचे निकाल

मराठी प्रवेश

वर्ग १ ला—(गुणानुक्रमें) अशोक नारायण पुरेकर; कु. वृंदा केशव निमोणकर; रामप्रकाश शिवप्रताप लड्ढा; कु. पुष्पा गोविंद नातू; कु. मीरा तुकाराम लाभसेटवार.

वर्ग २ रा—कु. कमल विठ्ठल पाटील; घनश्यामदास भानीरामजी लड्ढा; प्रभाकर वामन घोटकर; कु. पुष्पा कृष्णराव पाठक; भास्कर नारायण पांढरकर; कु. मीनाक्षी कृष्णराव लिमये; चंद्रकुमार गोपाळ भांडारी.

वर्ग ३ रा—कु. लीला बळीराम तोटे; हिरा काशीराम मुचाळे.

मराठी प्रारंभ

वर्ग १ ला—(गुणानुक्रमें) कु. माणिक विनायक खानापूरकर (नांदुरा); सौ. सुमति बाबुराव आंदणकर (साकोली); मधुकर पुंडलिक पदवाड (आर्वी); तुळशीराम दाजिबा मेश्राम (गोंदिया); कु. प्रमिला नारायण कुळकर्णी (दारव्हा); अनिलकुमार लक्ष्मीकांत देशपांडे (गोंदिया).

वर्ग २ रा—गुणवंत गोविंद क्षीरसागर, शुभचंद्र मोतीराम फुरसुले, वसंत विष्णु परांजपे, सुरजलाल हरिकिसन राहांगडाले, भास्कर दत्तात्रय टांकसाळे, वासुदेव रामेश्वर जोशी, शांताराम बुधराम देशमुख, कु. शालिनी विनायक गोंधळेकर, जलीलखाँ महमदखाँ पठाण, महादेव मारुति चेटुले, कु. निर्मला रामचंद्र गायकवाड, अनंत शंकर सपकाळ, अण्णा गोपाळ जोशी, मोहनलाल कल्याणमल खंडेलवाल, रतनलाल काश्यप.

वर्ग ३ रा—सिस्टर ॲमेलिया, काशीराम मदनगोपाल इन्नाणि, वासुदेव रामजी कुटे, कु. कुसुम सदाशिव रोटकर, चरणदास सेगोजी बोरकर, जयंत सिद्धेश्वर लिमये, दत्तात्रय गोपाळ पाठक, नंदकुमार विश्वेश्वर मुलमुले, कु. निवृत्ति रामभाऊ आष्टीकर, बाबुराव धानुजी चुटे, मोहनलाल नीलकंठ ब्राह्मणकर, सिद्धेश्वर तुकाराम उपरकर, सुरेश नारायण आकांत, शरद् यशवंत कपाळे, यशवंत रघुनाथ पिंगळे, कु. सुनन्दा केशव निमोणकर, कु. जयलक्ष्मी आरामुदा अयंगार, मधुकर उद्धव दुशेट्टीवार, कु. शकुंतला वासुदेव जोशी, श्रीहरी रामचंद्र हिवारे, कु. सुधा अण्णाजी निवडिंग, खुशाल नारायण लांडगे, नामदेव शंकर लांजेवार, मुरारी गणपत देशमुख, वसंत गोविंद घरोटे, कु. सुनंदा गजानन रानडे, कु. किशोरी शंकर दामले, गोपाल ईश्वर डागा, कु. चंद्रभागा नामदेव दांडगे, राजाबापू मुरलीधर काजळे, राजाराम मारोती खिरोळकर, सौ. कमलाबाई नारायण पटवर्धन.

साहित्यविनीत

वर्ग १ ला—(गुणानुक्रमें) सौ. सुमति पोफळी; (भंडारा); कु. शीला नारायण सरदेसाई, (चांदा); कु. इंदु रावजी कस्तुरे, (आकोट); नारायण गणपत खेडकर, (कारंजा); शरश्चंद्र गोविंद इंगळे, (नांदुरा), श्रीराम कृष्णराव गव्हाणकर, सदाशिव लक्ष्मण देशपांडे; कु. सिंधु बापुराव बुटले; सौ. शांताबाई सदाशिव दांडगे.

वर्ग २ रा—कु. कमल नारायण पाटील, कु. कमलिनी नारायण तत्त्ववादी, वासुदेव मोरेश्वर देसाई, कु. विमल नागेश कसबेकर, कु. इंदु सदाशिव नारळे, श्रीधर मारोतराव पाचघरे, कु. सुधा प्रभाकर चिने, देवाजी जनूजी मुळे, मधुकर शेषराव देशमुख, विनायक राजेश्वर आगलावे, सौ. इंदिरा गणेश घाणेकर, गजानन शंकर ताडे, कु. लीला रामचंद्र वरखेडकर, सौ. विजया मधुसूदन जोशी, कु. सुमन अभ्यंकर, पुष्पहास नारायण पुरेकर, कु. मीना रघुनाथ पिंगळे, केशव व्यंकोबा बिडवई, दिनकर यशवंत पाठक, इंदु वामन देशपांडे, कु. कुमुद लक्ष्मण जयवंत, दत्तात्रय नारायण जोशी, कु. दुर्गा विठ्ठल चरेगांवकर, कु. नलिनी अनंत देशपांडे, बक्षुराम गंगाबिसनजी नागोरी, मधुकर माधव शेटे, कु. शीला राजेंद्र बोरकर, कु. सरोज सुब्रमणी अय्यर, कु. सुमन श्रीपत देशपांडे, कु. सुशीला अनंत म्हैसाळकर, घनश्याम पांडुरंग निनावे, रघुनाथ गोपाळ पळसोदकर, सौ. राधाबाई श्रीधर इरदास, मदन-मोहन नारायणप्रसाद पुरोहित, कु. विमल भगवंत महतकर, विमल विनायक जोगवार, कु. शशीकला मोरेश्वर ओक.

वर्ग ३ रा—गजराजसिंह बलिरामसिंह चव्हाण, मालती बाळकृष्ण अटाळे, सौ. प्रतिभा दीनानाथ तिडके, मनकर्णिका संभूजी खंडारे, मारोति रघुनाथ फुटाणे, लक्ष्मण मुकुंद देशपांडे, कु. विमल शामराव ठाकरे, कु. शकुंतला ओंकारसा नघाटे, कु. इंदु वासुदेव साठे, प्रभाकर भगवंत वानखेडे, कु. सुधा विनायक देशमुख, कु. सुशीला नत्थू पुरी, कु. स्नेहलता गोविंद वानखेडे, नारायण काशीनाथ अंजनकर, कु. कमलिनी दाणी, प्रभाकर दाजीबा हस्तक, पुरुषोत्तम रामजू कोमावार, सौ. उषा देशपांडे, चंद्रशेखर शंकर पसारकर, कु. विमल श्रीधर भागवत, केशव सदाशिव तिबुडे, गजानन शंकर गायधने, दिगंबर जयराम हटवार, मधुकर कृष्णा आप्पा कथले, मोरेश्वर बकाराम आकरे, रामरतन काशीनाथ डोंगरे, वसंत गोविंद बकाने, वासुदेव डोमाजी गभने, वासुदेव सीताराम शेवाळे, कु. सुशीला मारोतराव भुरे, हिंमतलाल

नत्थुलाल मराठी, उमाकान्त अभिमन्यू पलिकोंडावार, कु. कुमुदिनी गोविंदराव देशपांडे, राजेश्वर गजानन पाठक, गोविंद चंपत डाखोरे, दत्तात्रेय बाबाराव ठेंगे, बलवन्त लक्ष्मण राजे, कु. रत्नमाला गुलाबसा आहाळे, विठ्ठल गणपत वाघमारे, कु. सुमन नारायण देवळे, त्रिंबक हरिभाऊ पांडे, कु. उषा नागोराव जोशी, मुकुंद आनंद झिंजर्डे, कु. शांता केशव पात्रीकर, कु. शीला भास्कर पाठक, गंगाधर भिकाजी रामटेके, जयंत उद्धव गोखले, धर्मा पुंडलीक वैद्य, कु. मीनाक्षी गोविंद डेगवेकर, मुरलीधर गंगाराम डोईजड, कु. सिंधु शांताराम जयवंत, काशीनाथ नारायण निखाडे, केवलराम आत्माराम निर्वाण, पांडुरंग तुळशीराम कावळे, वामन भिकाजी गणवीर, नारायण नत्थूजी धोटे, नामदेव गणपती बारापत्रे, महादेव बालाजी निनावे, मोतीराम किसन तिजारे, रामचंद्र कोंडबाजी आस्वले, शामराव फकीरजी बाहुटे, गुणवंत नारायण गालफाडे, जमनादास गंगादास डागा, वत्सला पुरुषोत्तम खानापूरकर, सौ. भीमाबाई शंकर मुंजे, सौ. श्यामला वसंत वैद्य, कु. सुशिला पुरुषोत्तम पांडे, कु. इंदू विंचुर्णे, दत्तू किसनजी डहाके, वामन कृष्णराव हरकरे, कु. कालिंदी महादेव गोखले, गणेश धुंडीराज कावळे, दतात्रय रामचंद्र दिवसे, नारायण रामदास जगताप, श्याम प्रल्हाद फडणवीस, कु. मंदाकिनी विनायक भावे, मधुकर रामचंद्र केकाटे, कु. मालती वामन अभ्यंकर, विजया चंद्रकांत साखरदांडे, कु. विजया भास्कर विंचुरे, कु. शकुंतला पुरुषोत्तम हातेवार, शरद् महादेव देशपांडे, शशीकांत दत्तात्रय दैवतकर, शंकर कृष्णराव महाजन, श्रीकांत लक्ष्मण गिरपुंजे.

साहित्य परिचित

वर्ग २ रा—(गुणानुक्रमें) कु. कमल दत्तात्रय गायकवाड, (भंडारा), दत्तात्रय सखाराम सुभेदार, (भंडारा), कु. मंदाकिनी विनायक देशकर, (नागपूर, भारतीय भाषाध्ययन मंदिर), सौ. लीला खानवलकर, (नागपूर, भगिनी मंडळ) सुशीला शंकर देशपांडे, (नागपूर, भगिनी मंडळ), सौ. कमला तेलंग, बापुराव कृष्णराव राऊत, सौ. मालिनी वसंत गोळवलकर.

वर्ग ३ रा—कु. नर्मदा बाबुराव गुल्हाने, पांडुरंग विठ्ठल वेलंकीवार, त्रिंबक गोपाळ दुगवेकर, कु. निशा वासुदेव भाटे, प्रभाकर अनंत देशमुख, प्रभाकर रामचंद्र नवाथे, कु. सुधा भास्कर रानडे, सौ. सुमंगला मनोहर नागले, कु. इंदु अनंत भांगे, कु. पद्मा दत्तोपंत कोलते, कु. प्रभा महादेव साठे, कु. विमल गणेश भृशुंडी, कु. शान्ता माधव ठाकरे, कु. माया लहानू आकोलकर, रघुनाथ विश्वनाथ बाळापुरे, कुमुदिनी प्रभाकर जयवंत, सौ. लक्ष्मीबाई चिंतामण गोखले, लीला गोविंद जठार, प्रभाकर बाजीराव जोशी, कु. शशिकला शंकर खामगांवकर, कु. अनसूया कृष्णराव धर्माधिकारी.

साहित्य स्नातक

वर्ग २ रा—(गुणाणुक्रमें) जनार्दन रामेश्वर करतुरे, (पुसद), नाना भगवान पधार, (वरुड), नामदेव गोमाजी कलोडे, (साकोली), कु. सरोजिनी घाटे, (भगिनी मंडळ, नागपूर), कु. चित्रा राजाराम काणे, (भारतीय भाषाध्ययन मंडळ, नागपूर), कु. मंदाकिनी भागवत, नारायण केशव वैद्य.

वर्ग ३ रा—यशवंत त्र्यंबक जोशी, सौ. श्यामला नीलकंठ वैद्य, सौ. सरल, लक्ष्मणराव बोधनकर, सौ. मंगला मोरेश्वर दारव्हेकर, कु. लीला सीताराम पांढरकामे, कु. सुमन लक्ष्मण खोलकुटे.

संघ वार्ता

श्री. श्रीपादराव नवरे आणि प्रा. पु. ल. देशपांडे यांची संघाला भेट

ता. ५ जानेवारी १९५२ रोजीं सायंकाळी ६ वाजतां विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयांत सुप्रसिद्ध नाटककार आणि सिनेनट प्रा. पु. ल. देशपांडे यांच्या सन्मानाचा कार्यक्रम थाटाने पार पडला. या कार्यक्रमाला आचार्य दादा धर्माधिकारी, श्रीमंत भैय्यासाहेब बुटी, श्री. पु. य. देशपांडे, सौ. विमलाबाई देशपांडे, सरलाबाई भावे, सौ. उषाबाई कोलते, प्रा. श्री. भा. वर्णेकर, श्री. नानासाहेब ओगले, श्री. गाडगीळ प्रभृति निमंत्रित मंडळी व नागपूर नाट्यमंडळाच्या आणि वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य हजर होते. या निमंत्रित मंडळीशिवाय मुंबईचे सुप्रसिद्ध पत्रकार आणि कार्यकर्ते श्री. श्रीपाद शंकर नवरे आणि बनारस हिंदु विद्यापीठांतील मराठीचे प्राध्यापक श्री. भी. गो. देशपांडे हेहि सन्मान्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रथम प्रा. देशपांडे आणि श्री. श्रीपादराव नवरे यांचेवर संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी स्वागतपर भाषण केलें.

नंतर प्रा. डॉ. कोलते यांनी प्रा. देशपांडे यांचा परिचय करून दिला. सरचिटणीस श्री. माडखोलकर यांनी नाट्यमहात्म्याची योजना निवेदन केली व ती सफल करण्याची सर्वांना विनंती केली, आणि श्री. नवरे यांचा थोडक्यांत परिचय करून दिला.

यानंतर कार्यक्रम समितीचे सदस्य श्री. सुरेश डोळके यांनी प्रा. देशपांडे आणि श्री. श्रीपादराव नवरे या दोघांना संघातर्फे पुष्पहार घातले.

उत्तरादाखल बोलतांना प्रा. देशपांडे म्हणाले, " नाटकें करण्यासाठी मुंबईसारख्या शहरांतून सुद्धा नाट्यगृह राहिलेलें नाही. अशा स्थितीत वि. सा. संघाने नाट्यगृह बांधण्याचे जें कार्य हातीं घेतलें आहे त्या त्यांच्या नाट्यगृहाच्या बांधणीत माझ्या लेखणींतून उतरलेल्या चार दोन विटा तरी राहतील या कल्पनेनें मला धन्यता वाटते."

श्री श्रीपादराव नवरे म्हणाले, " कलकत्त्याहून परत येतांना वि. सा. संघाचे कार्य प्रत्यक्ष डोळ्यांनी पहावे म्हणून मी मुद्दाम नागपुरास उतरलो. मला आशा आहे की विदर्भ साहित्य संघाचा हा नाट्योत्सव यशस्वी होऊन लवकरच विदर्भ साहित्य मंदिर मूर्त स्वरूपाला आलेलें दृष्टीस पडेल."

शेवटीं आभार मानतांना चिटणीस श्री. रा. प्र. सगदेव म्हणाले, " प्रा. देशपांडे यांचे आभार मानतांना मला एक गोष्ट मुद्दाम सांगावयाची आहे. ती ही कीं, प्रा. देशपांडे यांनी या नाटकाचे प्रयोग विदर्भ साहित्य संघाच्या मदतीसाठी करण्याची परवानगी दिलेली आहे."

यानंतर अल्पोपहार होऊन हा कार्यक्रम संपला. श्री. श्रीपदराव नवरे आणि प्रा. पु. ल देशपांडे यांनी विदर्भ साहित्य संघाला मध्यप्रदेश सरकारने दिलेली विस्तीर्ण जागा पाहून समाधान व्यक्त केलें.

गडकरी–स्मृति–दिन

ता. २३ जानेवारी रोजी, विदर्भ साहित्य संघाच्या विद्यमाने, संघाच्या केंद्रीय कार्यालयांत " गडकरी–स्मृति–दिन " साजरा करण्यांत आला. संघातर्फे होणारा

गडकऱ्यांचा हा दुसरा स्मृति-दिन. त्यापूर्वी नागपुरांत स्वतंत्ररूपानें अस्तित्वांत असलेल्या 'गडकरी-स्मारक-समिति' तर्फे हा स्मृतिदिन गेल्या कांही वर्षांपासून साजरा होत असे. ज्या ठिकाणीं कै. गोविंदाग्रजांचा देहांत झाला त्या त्यांच्या सावनेर येथील राहत्या घरांत गडकऱ्यांचें स्मारक बांधण्याची या स्वतंत्र ग. स्मा. समितीची प्रमुख कल्पना होती. व त्यासाठीं श्री. दामुअण्णा मालवणकरांनीं मुद्दाम नाटकें करून आदमासे ११०० रु. ची देणगी समितीला दिली होती.

१९५० च्या चांदा येथील वि. सा. संमेलनांत केलेल्या ठरावानुसार संघानें गडकरी-स्मारकासाठीं एक वेगळी उप-समिति स्थापन केली व त्यांत स्वतंत्र ग. स्मा. स. चें विलीनीकरण करण्यांत आले. तूर्त, गडकऱ्यांचें सावनेर येथील राहतें घर विकत घेऊन हस्तगत करण्याची खटपट संघ करीत आहे. त्या मार्गांत बऱ्याच अडचणी आहेत. परंतु वेळ पडल्यास सरकारी मदतीच्या साह्यानेंहि तें काम तडीस नेण्याचा संघाचा निर्धार आहे.

स्मृतिदिन समारंभापूर्वी आपल्या प्रास्ताविकांत आमंत्रक श्री. वरखेडकर यांनी, यंदापासून स्मृतिदिन कांहीशा नाविन्यपूर्ण रीतीनें साजरा करण्याची ग. स्मा. समितीची कल्पना सांगितली. नेहमीप्रमाणें गोविंदाग्रजांच्या वाङ्मयावर व जीवनावर नुसती व्याख्यानें करविण्यापेक्षां, दरवर्षी एक दोन नामवंत साहित्यिकांचे गडकऱ्यांच्या वाङ्मयावरील विचार पुस्तकरूपानें ग्रथित करण्याचा समितीचा मानस आहे, असें सांगितलें.

त्यानुसार यंदाचा हा ३३ वा गडकरी-स्मृति-दिन कांहीशा अभिनव पद्धतीनें साजरा करण्यांत आला. कार्यक्रम दिनांक २३ व २४ जानेवारि, असा दोन दिवस होता. पहिल्यादिवशीं सुरवातीला कै. गडकऱ्यांच्या प्रतिमेला पुष्पहार समर्पण केल्यानंतर डॉ. मा. गो. देशमुख यांच्या "वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन" या प्रबंधाचें तासभर वाचन झालें. हा प्रबंध डॉ. देशमुखांनी मुद्दाम स्मृतिदिनासाठीं लिहिला होता.

दुसरे दिवशीं संध्याकाळीं ५॥ वाजतां "गोविंदाग्रज काव्यदर्शन"—हा संगीत कार्यक्रम झाला. त्यांत गडकऱ्यांच्या एकंदर दहा निवडक व सुंदर कवितांचें काव्यगायन झालें. काव्यगायनांत कु. कुसुम कोलारकर, उषा तांबे, सौ. आगाशे, श्री. दारव्हेकर, जोशी ....इ० कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला व त्या कवितांवरील विवेचनात्मक टिप्पणी नागपुरचे उदयोन्मुख नाटककार श्री. दारव्हेकर यांनी केली. "चिंतातुर जंतु" इ. गडकऱ्यांच्या सुंदर कविता श्री. दारव्हेकरांनी आपल्या खड्या व सुरेल आवाजांत गाईल्यामुळे कार्यक्रमांत एकंदर चांगलाच रंग भरला.

अखेरीस, ग. स्मा. समितीचे आमंत्रक श्री. वरखेडकर यांनी सर्वांचे आभार मानल्यानंतर स्मृतिदिनाचा हा दोन दिवसांचा सुंदर कार्यक्रम आटोपला.

सौ. मालतीबाई दांडेकर यांचा सत्कार

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखिका सौ. मालतीबाई दांडेकर यांनी ता. २७ जानेवारी रोजी सायंकाळीं ६ वाजतां विदर्भ साहित्य संघास भेट दिली. त्यावेळीं कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि श्रीमंत पूर्णचंद्रराव बुटी, प्रा. बनहट्टी, श्री. आ. रा. देशपांडे, सौ. विमलाबाई देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. भ. श्री. पंडित, सौ. शास्त्री, सौ. सप्तर्षि प्रभृति मंडळी हजर होती. संघाध्यक्ष

सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, यांनी सौ. मालतीबाईंचे स्वागत केल्यावर सरचिटणीस श्री. माडखोलकर यांनी त्यांचा उपस्थित मंडळीशीं परिचय करून दिला; व चिटणीस श्री. रा. पु. सगदेव यांनी संघातर्फे त्यांस हार घातला. सौ. मालतीबाईंनी समयोचित भाषण केल्यावर श्री. सगदेव यांनी त्यांचे आभार मानले. सौ. मालतीबाई दांडेकर यांनी वि. सा. संघाच्या प्रगतिबद्दल समाधान व्यक्त केलें.

पं. महादेवशास्त्री जोशी यांचे विदर्भ साहित्य संघातील स्वागत

ता. २ फेब्रुवारी रोजीं सायंकाळीं ५ वाजतां संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं हिस्लॉप कॉलेजांतील महाराष्ट्र भाषा संवर्धन मंडळाचे पाहुणे पं. महादेवशास्त्री जोशी यांचा सन्मान करण्यांत आला. त्यावेळीं प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. वनहट्टी, बॅ. गोविंदराव देशमुख, न्या मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति श्रीमंत पूर्णचंद्रराव बुटी, श्री. बाबासाहेब भोंसले, श्री. ए. श्री. पटवर्धन, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. ह. ना. नेने, प्रा. श्री. भा. वर्णेकर, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. अ. ना. देशपांडे, श्री. लांडगे, श्री. बाबुराव पुरणगेकर, सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. शेवडे, सौ. कमलाबाई वर्णेकर, सौ. सुनीता देशपांडे, श्री. जोग, श्री. चं. प. भिशीकर, श्री. र. वि. कुळकर्णी प्रभृति संघाचे सदस्य आणि इतर सर्व कार्यकर्ते हजर होते.

प्रथम सरचिटणीस श्री. माडखोलकर यांनी पं. महादेवशास्त्री जोशी यांचे स्वागत करतांना त्याचा उल्लेख थोर कार्यकर्ते व श्रेष्ठ साहित्यिक अशा शब्दांत केला. यानंतर श्री. बाबासाहेब भोंसले यांनी "एक गोंयकर" या नात्याने, कोंकणी बोलींत थोडक्यांत हृदयंगम भाषण करून पं. जोशी यांचे स्वागत केलें; व चिटणीस श्री. रा. पु. सगदेव यांनी त्यांना वि. सा. संघातर्फे पुष्पहार घातला.

यानंतर उत्तरादाखल पं. महादेवशास्त्री प्रथम कांही वेळ कोंकणीत व मग मराठीत बोलले. आपल्या भाषेंत त्यांनी 'पोर्तुगीज सरकारने केलेला घटनात्मक बदल', 'सत्यनारायणाचे निमंत्रणसुद्धा पोर्तुगीज भाषेंत', 'शिद्दी सैनिकांचा लष्करी अंमल' इत्यादि गोष्टीसंबंधी उल्लेख केला.

सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी समारोपाचे भाषण केल्यावर श्री. सगदेव यांनी सर्वांचे आभार मानले. त्यानंतर अल्पोपहार होऊन हा संस्मरणीय कार्यक्रम समाप्त झाला.

विदर्भ साहित्य संघ-शाखा गोंदिया-अहवाल

विदर्भ साहित्य संघाच्या गोंदिया शाखेचा उद्घाटन समारंभ संघाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई यांचे हस्ते ता. १५-१०-५१ रोजीं मोठ्या उत्साहाने साजरा झाला. त्याच बरोबर वि. सा. सं. च्या परीक्षांचा प्रमाण-पत्र-वितरण समारंभ डॉ. वि. भि. कोलते, परीक्षासंचालक यांचे हस्ते त्याचवेळीं झाला. या समारंभाची माहिती व भाषणांचा गोषवारा ता. २२-१०-१९५१ च्या तरुणभारतांत (शहर आवृत्ति) प्रसिद्ध झालेला आहे.

[२] गोंदिया शाखेच्या सभासदांचा परिचयविधि सुद्धा त्यावेळी करून देण्यांत आला.

[३] गोंदिया तहसिलींतील आमगांव येथें परीक्षा केन्द्र जानेवारी १९५२ च्या परीक्षेपासून उघडले आहे व त्या ठिकाणाहून विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत.

अनुक्रमणिका

[४] गोंदिया शाखेच्या सभासदांची संख्या १९५१ मध्यें ४५ झाली. यांत २ सभासद तहहयात आहेत. १९५१ सालीं शाखेचे कार्यवाह व वि. सा. सं. च्या कार्यकारिणीचे सभासद श्री. डवीर हे तहहयात सभासद झाले.

[५] जानेवारी परीक्षेला गोंदिया केन्द्रातून मराठी प्रारंभाला १७ व परिचित परीक्षेला १ असे एकूण १८ उमेदवार होते. प्रारंभाला एक उमेदवार बसला नाहीं. परीक्षांची व्यवस्था श्री. घुसे, श्री. नेरेकर व श्री. डवीर, शिक्षक जे. मा. हायस्कूल यांनी केली व विद्यार्थ्यांना मदत केली.

[६] गोंदिया येथील वि. सा. संघाचे जुने सभासद व गोंदिया विदर्भ साहित्य संघ संमेलाचें एक उपस्वागताध्यक्ष कै. दा. आ. तनखीवाले हें डिसेंबर १९५१ मध्यें हृदय क्रियाबंदपडून एकाएकी मरण पावले. गोंदियाच्या सर्व प्रकारच्या—भाषिक, राजकीय, शैक्षणिक व सामाजिक चळवळींत त्यांची सक्रिय सहानुभूति राहत असे व त्यांत सातत्यानें ते भागहि घेत असत. मराठीभाषेचे ते एक अत्यंत प्रखर अभिमानी होते. भंडारा जिल्हा कौंसिलचे उपाध्यक्ष व लोकलबोर्डाचे ते अध्यक्ष होते व कांग्रेस, हिंदुमहासभा व रा. स्वं. सं. चें पदाधिकारीही होते. ते कुशल-बुद्धीचे कायदे पंडित होते. त्यांचे वय ६५ वर्षाचे होते. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यांत त्यांची सदैव मदत मिळत असे. त्यांच्या मृत्यूमुळें विदर्भ साहित्य संघाची अपरिमित अशी हानि झाली आहे.

[७] ता. ६-१-१९५२ ला भरलेल्या वि. सा. सं. च्या गोंदिया शाखेच्या सभेंत त्यांच्या मृत्युबद्दल दुखवट्याचा ठराव करण्यांत येऊन त्यांच्या कुटुंबाकडे पाठविण्यांत आला.

[८] कै. दा. आ. तनखीवाले यांच्या मुलीकडून व कुटुंबाकडून वि. सा. सं. च्या गोंदिया शाखेच्या वाचनालयाकरितां ३६ पुस्तकाची देणगी मिळाली आहे व तिचा येथील शाखेनें साभार स्वीकार केला आहे.

[९] नूतनवर्षाच्या वर्गणीसंबंधीहि निर्णय घेण्यात आला. केन्द्रातून पावती बुकें मागविण्याचे ठरलें व या वर्षी सभासद संख्या १०० पर्यंत नोंदवावी असें ठरले. सभासद नोंदणी पावती बुकाच्या अभावामुळें सुरू करतां येत नाहीं.

[१०] येथील सभासदांना वेळेवर व नियमितपणें 'युगवाणी' मिळत नाहीं. कांही अंक मिळतच नाहींत. युगवाणीच्या अंकाचे वितरण सदोष आहे असें येथील बहुतेक सर्व सभासदांचें मत आहे. याचा परिणाम सभासद नोंदणीवर व कार्यकर्त्यांवर होतो. तरी यावर्षी या संबंधांत सुधारणा होईल अशी येथील सभासदांची आशा आहे.

कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक

सौ. सुमति पोफळी (भंडारा) यांना साहित्य-विनीत या परिक्षेंत पहिल्या वर्गांत सर्वांत अधिक गुण मिळविल्याबद्दल कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषक देण्यांत आलें आहे.

ता० ११-२-१९५२ }

उषा कोलते,
कार्यवाह
परीक्षा समिति.

विदर्भ साहित्य संघ

पुनर्लिखित घटनेचा मसुदा

ता. २७ जानेवारी १९५२ रोजीं भरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी. मंडळाच्या सभेंत सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यासाठी मंजूर करण्यांत आलेला विदर्भ साहित्य संघाच्या घटनेचा मसुदा.

१ नांवः—विदर्भ साहित्य संघ

२ कार्यक्षेत्रः—विदर्भ साहित्य संघाचें कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणें मध्यप्रदेश हें राहील.

३ उद्देशः—(अ) मराठी भाषा, साहित्य, संस्कृति आणि सर्व सृजनशील कला यांच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न करणें,

(आ) जनतेची साहित्य-विषयक सदभिरुचि, व सृजनशील कलांचें रसग्रहण करण्याची शक्ति यांचा विकास होण्यासाठी उपाय योजून सर्व साधारणपणें समाजाचें सांस्कृतिक पुनरुत्थान घडवून आणण्यास साहाय्यभूत होणें

वरील उद्देश साध्य होण्याकरितां पुढें निर्देशिलेल्या व इतर अवश्य आणि योग्य वाटतील त्या साधनांचा उपयोग करणें.

४ साधनेंः—(अ) दरवर्षी विदर्भ साहित्य संघाचें संमेलन भरविणें व शाखा-संमेलनें भरविण्यास प्रोत्साहन देणें.

(आ) मध्यप्रदेशांत ठिकठिकाणीं संघाच्या शाखा स्थापन करणें आणि स्वतंत्र रीतीने कार्य करणाऱ्या साहित्यसंस्था आणि सृजनशील कलांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्था यांना संलग्न करून घेणें

(इ) मराठी आणि अन्य भाषांच्या साहित्य-संस्थांशी आणि साहित्य-विषयक व कलाविषयक चळवळींशीं अवश्य व शक्य असेल तेथें सहकार्य करणें,

(ई) साहित्य-व्याकरण, कोश, इतिहास, विज्ञान, समाजशास्त्र, कला, इत्यादि विषयांवरील ग्रंथ लिहवून घेणें, प्रसिद्ध करणें, ग्रंथांचा पुरस्कार करणें व अशा प्रकारच्या कार्यास द्रव्यद्वारा अथवा अन्य रीतीनें साहाय्य करणें

(उ) ज्ञानाचीं सर्व साधनें मराठी वाचकांना सुलभ करून देण्याकरिता चर्चा, उत्सव, प्रदर्शन, नाट्यप्रयोग आदि प्रसंग घडवून आणणें; नियमकालिकें चालविणें, ग्रंथालयें स्थापन करणें; संशोधनास मदत व उत्तेजन देणें, मराठी व अन्य भाषा शिकविण्याचे वर्ग चालविणें व परीक्षा घेणें, पाठ्यपुस्तकें लिहवून घेणें व प्रसिद्ध करणें; प्राचीन ग्रंथ, चित्रें, हस्तलिखितें, ताम्रपट, नाणीं, मूर्ति इत्यादींचें संशोधन व संग्रह करणें;

(ऊ) मराठी भाषेसाठी शास्त्रीय विषयाची परिभाषा व पारिभाषिक कोश तयार करणें आणि अशा प्रयत्नांत सहकार्य करणें;

(ए) प्राचीन व अर्वाचीन मराठी व अन्य भाषांतील नामवंत लेखक, ग्रंथकार व कलावंत यांचीं चरित्रें, त्यांचें साहित्य आणि कला यांची माहिती मराठी वाचकांस उपलब्ध करून देणें;

अनुक्रमणिका

(ऐ) प्रादेशिक लोकभाषांचें संशोधन करून त्यांच्या विषयींच्या ग्रंथांच्या प्रसिद्धीस साहाय्य करणें;

(ओ) मराठी भाषा आणि साहित्य यांच्या विकासाच्या आणि प्रसाराच्या मार्गांतील अडचणी दूर करण्यासाठी अवश्य ती उपाय योजना करणें, तसेंच मराठी भाषा बोलणाऱ्या बहुजनसमाजांत अशा प्रश्नांविषयीं जागृति करणें;

(औ) संघासाठी कार्यालय, सभागृह इत्यादि इमारती उभारणें;

(अं) सामान्यतः संघाचे उद्देश साध्य होण्यासाठी अवश्य वाटतील त्या सर्व गोष्टी करणें;

५ **वर्ष गणना:**—संघाचें वर्ष दिनांक १ एप्रिल ते दिनांक ३१ मार्च पर्यंत गणलें जाईल.

६ **कार्यालय:**—संघाचें केंद्रीय कार्यालय नागपूर येथे राहील.

७ **सभासदांचे वर्ग:**—संघाच्या सभासदांचे वर्ग पुढील प्रकारचे राहतील:—

(अ) **उपकर्ते:**--संघास पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे,

(आ) **आश्रयदाते:**--संघास एक हजार किंवा अधिक रुपये देणारे,

(इ) **साहाय्यक:**--संघास पांचशे किंवा अधिक रुपये देणारे,

(ई) **हितचिंतक:**--संघास अडीचशें रुपये किंवा अधिक रुपये देणारे अ ते ई वर्गांच्या सभासदांना आपली रक्कम देतांना ती विशेष कार्यासाठी नमूद करून देतां येईल.

(उ) **आजीव सभासद:**--संघास पन्नास किंवा अधिक रुपये देणारे,

(ऊ) **साधारण सभासद:**--संघास वार्षिक तीन रुपये वर्गणी देणारे,

(ए) **प्रतिनिधि सभासद:**--नियमाप्रमाणे संलग्न संस्थांनी नेमलेले प्रतिनिधि.

(ऐ) **सन्मान्य सभासद:**—विद्वत्ता अथवा मराठी भाषेची विशेष सेवा या गुणांसाठी कोणाहि व्यक्तीस संघाचे सन्मान्य सभासद करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

८ संघाचा सभासद होऊं इच्छिणाऱ्या १८ वर्षांवरील कोणाहि व्यक्तीनें संघाचे उद्देश, घटना व नियम मान्य करून ठरविलेल्या नमुन्यावर स्वाक्षरी केली पाहिजे.

९ सभासदांचे अधिकार व कर्तव्यें:—

(अ) संघाच्या (७) अ ते ए वर्गांच्या कोणत्याहि सभासदास संघाच्या साधारण सभांस हजर राहण्याचा, चर्चेत भाग घेण्याचा, ठराव मांडण्याचा व मत देण्याचा अधिकार राहील. त्याचप्रमाणे कार्यकारी मंडळाने गुप्त म्हणून ठेवलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त हिशेब व कागदपत्रें, कार्यकारी मंडळाने केलेल्या नियमानुसार पाहण्यांचे अधिकार व सभासदत्वाचे इतर सर्व प्रकारचे अंगभूत अधिकार राहतील

(आ) वर्ग (७) (ऐ)—सन्मान्य सभासद—यास संघाच्या सर्वसाधारण सभांना व संमेलनांना उपस्थित राहण्याचा आणि चर्चेत भाग घेण्याचा अधिकार राहील

(इ) साधारण सभासदाने प्रत्येक वर्षाच्या पहिल्या तिमाहींत आपल्या सभासदत्वाची वर्गणी भरली पाहिजे. त्यानंतर वर्गणी थकित असणाऱ्या सभासदास कोणत्याहि सभेंत अगर निवडणुकींत मत देतां येणार नाहीं

(ई) एखाद्या साधारण सभासदाची वर्गणी थकित राहिली असेल तर अशा सभासदाचें सभासदत्व तीन महिन्याच्या अखेरीस आपोआप संपेल. पण अशा व्यक्तीस जर आपल्या सभासदत्वाचें सातत्य कायम ठेवावयाचें असेल, तर त्याने सभासदत्वाच्या अर्जासोबत थकलेली सर्व वर्गणी भरली पाहिजे.

(१०) साधारण सभा

(अ) संघाची वार्षिक साधारण सभा एप्रिल ३० च्या आंत भरवावी. या सभेंत गतवर्षीचें कार्यवृत्त, हिशेब तपासनिसाकडून तपासून घेतलेले हिशेब, पुढील वर्षाचें अंदाजपत्रक, घटना दुरुस्तीचीं कामें व चार्टर्ड हिशेब तपासनिसाची नेमणूक हीं कामें करण्यांत येतील.

(आ) जरूर लागेल तेव्हा अध्यक्षांनी किंवा कार्यकारी मंडळांने संघाची साधारण सभा भरवावी.

(इ) सभेची गण संख्या ५० किंवा एकूण सभासदसंख्येच्या एक अष्टमांश यापैकी जी कमी असेल ती राहील.

गणसंख्येच्या अभावी तहकूब झालेली सभा त्या सभेच्या नोटीशीत तशी पूर्व सूचना दिली असल्यास पहिल्या सभेच्या जागींच त्या सभेच्या वेळेनंतर अर्ध्यातासाने भरविता येईल. अशा सभेस गणसंख्येचा निर्बंध राहणार नाहीं. मात्र या सभेत कार्यक्रम पत्रिकेंत असलेल्या विषयाबाहेर प्रश्न विचारात घेतां येणार नाहीत.

(ई) संघाच्या कोणत्यहि साधारण सभेची सूचना सभेचे दिवसापूर्वी १५ दिवस अध्यक्षांच्या अनुमतीनुसार सर चिटणीसाने किंवा इतर कोणत्याहि चिटणीसाने पाठवावी.

(उ) संघाच्या साधारण सभेत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी नोटीस सभासदाने सभेपूर्वी आठ दिवस अगोदर दिली पाहिजे.

(ऊ) मागणी सभाः मताधिकार असलेल्या सभासद संख्येच्या एक दशांशापेक्षा किंवा २५ पेक्षा कमी नाही इतक्या सभासदांनी लेखी मागणी केल्यास, मागणी पत्र पोंचल्यापासून एक महिन्याचे आंत संघाची विशिष्ट साधारण सभा अध्यक्ष किंवा सरचिटणीस यांनी बोलाविली पाहिजे.अशा सभेत मागणी पत्रात नमूद केलेल्या विषयाखेरीज अन्य विषयांचा विचार करता येणार नाही.

(ए) जेथे विशिष्ट बहुमताचा उल्लेख केलेला नाही तेथे सर्व निर्णय साध्या बहुमताने घेण्यात येतील.

११ कार्यकारी मंडळ

(आ) मतदार सभासदांनी निवडलेल्या एक अध्यक्ष व १५ सभासद, निवडून आलेल्या अध्यक्षांनी उमेदवार होण्याची पात्रता असलेल्या सभासदातून नियुक्त केलेले दोन सभासद आणि नुकत्याच संपलेल्या वर्षाचा अध्यक्ष अशा एकूण १९ सभासदाचें कार्यकारी मंडळ राहील.

(आ) हे कार्यकारी मंडळ अध्यक्षाखेरीज आपल्यातून खालील पदाधिकारी निवडील.

[१]	उपाध्यक्ष	... १
[२]	सरचिटणीस,	... १
[३]	चिटणीस,	१
[४]	कोषाध्यक्ष,	...१
[५]	संपादक ' युगवाणी '	....१
[६]	संचालक परीक्षा समिति	...१
		एकूण ७

१२ निवडणुकी

(अ) संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळ याची निवडणूक दर दोन वर्षांनी दिनांक १ मार्च पूर्वी करण्यांत येईल. यासाठीं दिनांक ३१ डिसेंबर पर्यंतच्या संघाच्या मतदार सभासदांची सूचि प्रसिद्ध करण्यांत येईल. या सूचीतील नांवाबद्दल जर कोणा सभासदांची तक्रार असेल तर त्याने दिनांक १५ जानेवारी पर्यंत अध्यक्षाकडे पाठवावी. अध्यक्षाने तीवर निर्णय घेऊन त्या दुरुस्त्या दि. ३१ जानेवारी पर्यंत प्रसिद्ध कराव्या.

[आ] दिनांक ३१ आगस्ट पर्यंत जे सभासद नोंदलेले असतील व ज्यांच्याकडे कोणतीहि वर्गणी थकित नसेल अशाच सभासदांचा मतदार सदस्यांच्या सूचीत समावेश होईल.

[इ] निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार सभासद होऊन ज्यांना संघाच्या नियमाप्रमाणें एक वर्ष झाले असेल अशाच सभासदांना राहील व यांची नांवे वरील सूचीत निराळी दिली जातील.

[ई] मतदाराच्या सूचीतील कोणत्याहि व्यक्तीस निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्यास पात्र असलेल्या कोणत्याहि व्यक्तीचें नांव तिच्या लेखी अनुमतीसह मतदानाच्या तारखेपूर्वी तीस दिवस अगोदर सुचविता येईल.

[उ] अशी संमति दिलेल्या सभासदास आपले नांव उमेदवारसूचीतून परत घ्यावयाचे असल्यास, नांवें सुचविण्याच्या तारखेपासून आठ दिवसाचें आंत आपली उमेदवारी परत घेतल्याचे त्यांनें सर चिटणीसाला कळाविले पाहिजे.

[ऊ] निवडणुकीसाठी निश्चित झालेल्या उमेदवारांच्या सूचीसह मतपत्रिका सरचिटणीसांनी मतदार सभासदाकडे निवडणुकीच्या तारखेपूर्वी निदान पंधरा दिवस रवाना केल्या पाहिजेत.

[ए] मतमोजणी करून निकालाबद्दलचें प्रतिवृत्त आपल्याला सादर करण्यासाठी अध्यक्ष कार्यकारी मंडळाचे सदस्य नसलेल्या दोन गणकांची नियुक्ति करतील व त्यांच्या कडून हें प्रतिवृत्त आल्यावर अध्यक्ष निकाल जाहीर करतील.

[ऐ] मतमोजणींत जर एकापेक्षा आधिक उमेदवारास सारखींच मतें पडली व अशीं मतें मिळालेल्या उमेदवारापेक्षा कमी मतें मिळालेल्या उमेदवाराचा कार्यकारी मंडळासाठी निवडावयाच्या १५ सभासदात क्रमांक लागत नसेल तर चिठ्या

टाकून निवड करण्यांत येईल. अध्यक्षपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांना सारखी मतें मिळाल्यास चिठ्ठ्या टाकून गणकांनी एका नांवाची निवड करावी.

[ओ] मतमोजणीच्या वेळीं उमेदवारांना किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

१३ सभासदांची नियुक्ति.

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर पंधरा दिवसांत नवीन अध्यक्ष कार्यकारी मंडळावर दोन सभासद नियुक्त करतील.

१४ कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी निवडणें

[अ] निवडणुकीच्या निकालापासून एक महिन्याच्या आंत नवीन निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा वर कलम ११ आ मध्यें नमूद केलेले पदाधिकारी निवडण्यासाठी, जुने अध्यक्ष बोलावितील.

[ओ] अध्यक्ष जर नागपूर बाहेरचे असतील तर उपाध्यक्ष नागपूरचा असला पाहिजे. मात्र सरचिटणीस, चिटणीस व कोषाध्यक्ष नागपूरचेच राहणारे असले पाहिजेत.

[इ] कोणत्याहि कारणासाठी कार्यकारी मंडळातील कोणतीहि जागा रिकामी झाल्यास ती भरण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

१५ कार्यकारी मंडळाची कर्तव्यें

संघाचीं सर्व कामें कार्यकारी मंडळ करील व अध्यक्ष हा संघाचा कार्यप्रमुख राहील. अध्यक्षाच्या अनुपस्थितींत अध्यक्षाचे सर्व अधिकार उपाध्यक्षास राहतील. कार्यकारी मंडळ मुख्यतः पुढील कामें करील.

(अ) संघाच्या नियमाप्रमाणें संमेलन भरविण्याची व्यवस्था करणें.

(आ) संघाचें नियतकालिक चालविणें.

(इ) मराठी भाषेचें अध्ययन अध्यापन व परीक्षा यांची व्यवस्था करणें.

(ई) वार्षिक अहवाल, हिशेब व अंदाजपत्रक ही तयार करून सर्वसाधारण सभेपुढें मंजुरीसाठी ठेवणें. हे हिशेब संघाच्या सर्वसाधारण, सभेने नियुक्त केलेल्या चार्टर्ड हिशोबतपासनिसाने तपासून दिलेले असले पाहिजेत.

(उ) संमेलनानें केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणें,

[ऊ] संघाच्या कार्याकरितां द्रव्यनिधी जमविणें; उपकर्ते, आश्रयदाते, सभासद इत्यादि मिळविणें आणि नियमानुसार संघनिधींची व्यवस्था करणें.

[ए] संघाच्या नियमाप्रमाणें साधारण सभा भरविणें.

[ऐ] संघामार्फत होणाऱ्या प्रकाशनाची व्यवस्था करणें.

[ओ] संघाचे उद्देश व घटना यास अनुसरून संघाच्या कार्यासंबंधीं सूचना करणें व मार्गदर्शन करणें, विशिष्ट कामासाठी उपसमित्या व शिष्टमंडळें नेमणें व जरूर तो अन्य उपक्रम करणें.

६३ (औ) शाखासभा स्थापणें व संलग्न संस्था नोंदाविणें.

(अं) उपसमिति, शाखासभा, इत्यादींच्या कामकाजाचे नियम ठरविणे,

(अः) संघाचें दप्तर संभाळणें व संघाच्या आणि संघाकडे सोपविलेल्या मालमत्तेंचे रक्षण करणें.

१६ द्रव्यनिधि व मालमत्ता

(अ) विदर्भ साहित्य संघाचा द्रव्यनिधि व मालमत्ता ही पुढीलप्रमाणे राहतील,

कायम निधि—संघाच्या उत्पन्नातून व शिलकीतून कार्यकारी मंडळ कायमनिधि म्हणून ठेवील ती रकम.

हा निधि किमान दोन हजार रुपये राहील व तो विश्वस्तांच्या स्वाधीन राहील. आणि त्यांत कार्यकारी मंडळाने वेळोवेळी भर घालावी. या निधीचें व्याज चालू निधींत जमा केले जाईल. या कायम निधींतून रकम खर्च करावयाची झाल्यास त्याला सर्वसाधारण सभेची मंजुरी लागेल.

चालू निधि

(१) सर्व प्रकारच्या सभासदांकडून येणारी वर्गणी व देणग्या.
(२) संघाचें ग्रंथप्रकाशन व ग्रंथाविक्री यांचे येणारें उत्पन्न
(३) परीक्षांचे शुल्क
(४) संघाच्या मालकीच्या इमारतींच्या उपयोगामुळें येणारे उत्पन्न
(५) बँकेतील रकमांवर येणारें व्याज, व
(६) इतर सर्व उत्पन्न यांचा चालू निधींत समावेश होईल.

चालू निधीचा जमाखर्च ठेवण्यासंबंधीचे नियम हिशेब तपासनिसाच्या सूचनेनुसार कार्यकारी मंडळ बनवील..

विशेष निधि—

संघाला विशेष कार्यासाठी मिळालेल्या देणग्या व जमविण्यात आलेला निधि. हा विशेष निधि त्याच विशेष कार्यासाठी खर्च करण्यात येईल. ही रकम अपरिहार्य कारणासाठी अन्य कामी खर्च करावयाची झाल्यास ती परत त्या खाती जमा करण्याचें बंधन कार्यकारी मंडळावर राहील.

(आ) संघाच्या विश्वस्तांकडे सोपविण्यात येणाऱ्या मालमत्तेव्यतिरिक्त सर्व मालमत्ता संघाचे मुख्य अधिकारी म्हणून संघाचे अध्यक्षांच्या नांवाने राहील; मात्र बँकेतील सर्व व्यवहार कोशाध्यक्षांचे नांवे खाते उघडून करण्यात येईल. अध्यक्षांच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रकास व कार्यकारी मंडळाच्या ठरावास धरून या निधींतून कोशाध्यक्ष रकमा देतील.

१७ विश्वस्तांचे अधिकार जबाबदाऱ्या व कर्तव्यें.

विश्वस्ताचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्यें हीं विश्वस्तपत्रांत नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१८ संमेलन.

(अ) विदर्भ साहित्य संघाचें संमेलन दरवर्षी डिसेंबर महिन्यांत भरविण्याची जबाबदारी सर्वस्वी कार्यकारी मंडळावर आहे. कोणत्याहि शाखा सभेस अथवा संलग्न संस्थेस कार्यकारी मंडळाच्या संमतीने हें संमेलन भरविता येईल.

(आ) संमेलनास प्रतिनिधि म्हणून उपस्थित राहण्याचा अधिकार संघाच्या सभासदासच राहील. मात्र त्यासाठीं त्याने संघाला १ रुपया प्रतिनिधि शुल्क दिलें पाहिजे. अशा संमेलन प्रतिनिधींस संमेलनांत ठराव आणण्याचा, भाषण करण्याचा व मत देण्याचा अधिकार सभेच्या सर्वसाधारण नियमांनुसार राहील.

(इ) संमेलनापुढें मांडावयाच्या ठरावांची सूचना संमेलन भरावयाच्या तारखेपूर्वी २१ दिवस सरचिटणीसांकडे पाठविली पाहिजे.

(ई) संघाचा अध्यक्ष हा संमेलनाचा अध्यक्ष राहील.

(उ) विषय-नियामक समिति पुढील प्रमाणे राहील.

(१) संघाध्यक्ष, स्वागताध्यक्ष, उपस्थित असलेले माजी संघाध्यक्ष व स्वागताध्यक्ष.

(२) चालू कार्यकारी मंडळाचे सर्व प्रतिनिधि सभासद.

(३) उपस्थित असलेल्या सर्व सभासदांतून अध्यक्षांनी नियुक्त केलेले २५ सभासद आणि—

(४) स्वागताध्यक्षांनी स्वागत समितीतून नियुक्त केलेले ५ प्रतिनिधि. हे पांच प्रतिनिधि संघाचे सभासद असले पाहिजेत.

(ऊ) ज्यावर्षी अध्यक्षाची निवडणूक होणार नाहीं त्या वर्षाच्या संमेलन प्रसंगी सन्मान्य पाहुणे म्हणून भाषण देण्यासाठी एखाद्या श्रेष्ठ साहित्यिकाला आमंत्रण द्यावें व त्यासाठी कार्यकारी मंडळाने तीन नांवें सुचवावी व त्यांतून स्वागत मंडळाने एक नांव बहुमताने निवडावें. ही निवड संमेलनापूर्वी एक महिना निश्चित करावी. सन्माननीय पाहुण्याचा प्रवासखर्च व भाषणाच्या मुद्रणाचा खर्च स्वागत-मंडळावर राहील.

(ए) विषय-नियामक समितीत असंमत झालेले ठराव किंवा उपसूचना खुल्या अधिवेशनात मांडावयाच्या असल्यास अशा ठरावावर अथवा उपसूचनेवर मतें देणाऱ्या दोन-पंचमांश सभासदांच्या सह्यानिशी, तशी लेखी सूचना त्या बैठकीनंतर होणाऱ्या संमेलनाच्या जाहीर बैठकीच्या सुरवातीपूर्वी दिली पाहिजे व असा ठराव अथवा उप-सूचना आणण्याची सूचना आपण देणार असल्याचें त्या सभासदाने विषय-नियामक समितीत त्याच वेळी अध्यक्षास लेखी कळविलें पाहिजे.

(ऐ) संमेलनाच्या सर्व खर्चाची जबाबदारी निमंत्रण देणारी संस्था व त्या संस्थेने निर्माण केलेले स्वागत मंडळ यांच्यावर राहील. संमेलनाच्या अध्यक्षांच प्रवासखर्च व भाषणाचा मुद्रणखर्च स्वागत मंडळ करील.

(ओ) संमेलनाची सर्व कार्यवाही निमंत्रण देणारी संस्था संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सल्याप्रमाणें करील.

(औ) संमेलनासंबंधी इतर सर्व नियम करण्याचा अधिकार मंडळास राहील.

१९ शाखा सभा

(अ) मध्यप्रदेशाच्या निरानिराळ्या भागात विदर्भ साहित्य संघाच्या शाखा स्थापण्याचा प्रयत्न कार्यकारी मंडळाने करावा. शाखा सभा स्थापन करण्यास निदान
६५ २५ सभासद त्या भागांतील रहिवासी असले पाहिजेत.

(आ) त्या त्या भागांतील विदर्भ साहित्यसंघाचे सभासद त्या त्या शाखा-सभेचे सभासद राहतील. त्यांतील साधारण सभासदांच्या वर्गणींपैकी षष्ठांश रक्कम विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाकडून शाखेने कार्य चालविण्यासाठी देण्यात येईल.

(इ) शाखासभेने आपले कार्य कार्यकारी मंडळाच्या देखरेखीखाली करावे. कार्यकारी मंडळाने काही विशिष्ट कामें तिजकडे सोपविल्यास तीहि करावीत. तसेंच शाखा संमेलनें शक्यतोंवर दरवर्षी भरविण्याचा प्रयत्न करावा.

(ई) शाखा सभेच्या सर्व स्थावर आणि जंगम मालमत्तेवर विदर्भ साहित्य संघाची मालकी राहील.

[उ] शाखासभेचे पदाधिकारी व कार्यकारी मंडळ यांची निवड त्या शाखेचे सभासद करतील. शाखासभा ज्या विभागाची असेल त्या विभागांत राहणारा विदर्भ-साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाचा सभासद शाखा सभेच्या कार्यकारी मंडळाचा पदसिद्ध सभासद राहील.

(ऊ) शाखा सभेच्या कारभाराची चौकशी करण्याचा अधिकार संघाच्या अध्यक्षास राहील. शाखा सभेच्या निवडणुकी अगर इतर कोणतेहि प्रश्न याबाबत वाद उपस्थित झाल्यास त्याचा निर्णय संघाचे अध्यक्ष करतील व तो अखेरचा राहील.

[ए] शाखा सभेच्या कारभाराची चौकशीच्या कामी अध्यक्ष मागतील ती सर्व माहिती शाखा सभेच्या कार्यकारी मंडळाने दिली पाहिजे. शाखा सभेने आपले हिशेब व दप्तर व्यवस्थित ठेवले पाहिजे. शाखा सभेचा कारभार असमाधानकारक होत असल्याचे आढळून आल्यास शाखासभेचे म्हणणे एकून तिची मान्यता रद्द करण्याचा अधिकार संघाच्या कार्यकारी मंडळास आहे.

(ऐ) वरील नियमास अविरोधी असे आणखी नियम करण्याचा संघाच्या कार्यकारी मंडळास अधिकार आहे.

३० संलग्न संस्था

[अ] विदर्भ साहित्य संघाचे उद्देश मान्य असणाऱ्या व संघाच्या कार्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या समान उद्देश असणाऱ्या संस्था संलग्न करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(आ) संलग्न संस्थाना नोंदणी आकार पांच रुपये व वार्षिक वर्गणी पांच रुपये द्यावी लागेल.

(इ) संलग्न संस्थेची अंतर्गत व्यवस्था व आर्थिक परिस्थिति याची कोणतीहि जबाबदारी विदर्भ साहित्य संघावर राहणार नाही.

(ई) संलग्न संस्थेने आपल्या तर्फे आगाऊ नोंदलेला एक प्रतिनिधि संघाचा सर्वसाधारण सभासद राहील.

(उ) संलग्न संस्थेने आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल संघाच्या कार्यकारी मंडळाकडे पाठवावा.

२१ इतर नियम.

(अ) विदर्भ साहित्य संघाची साधारण सभा, कार्यकारी मंडळाची सभा, संमेलन विशिष्ट सभा, व उपसमिती यांच्या कामकाजाची नोंद व्यवस्थितपणे पुस्तकांत केली जाऊन ती त्या त्या सभांच्या पुढील बैठकीत मंजूर झाली पाहिजे.

(आ) विदर्भ साहित्य संघाचे सर्व दप्तर पत्र व्यवहार, निरनिराळ्या सभांच्या वृत्तांतांची पत्रकें ही सर्व सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सरचिटणिसावर व चिटणिसावर आहे.

(इ) संघाच्या प्रत्येक सभासदास संघाचें नियतकालिक ' युगवाणी ' विनामूल्य पाठविण्यात येईल. संघाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या सर्व सूचना अधिकृत समजण्यात येतील. सभासदांकडे त्या पुनः स्वतंत्र रीतीने पाठविल्या जाणार नाहीत.

(ई) योग्य कारण न कळविता कार्यकारी मंडळ किंवा समिती वा कोणतीहि उपसमिति यांच्या तीन सभास लागोपाठ अनुपस्थित राहणाऱ्या सभासदाचें तेथील सभासदत्व रद्द झालें असें समजण्यात येईल.

(उ) संघाच्या ध्येयधोरणाला पोषक व घटनेस अविरोधी असे नियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संघाच्या सभासदांनी हे नियम अथवा घटनेची प्रत मागितल्यास योग्य मूल्य घेऊन देण्याची व्यवस्था कार्यकारी मंडळाने करावी.

२२ घटनेत बदल—विदर्भ साहित्य संघाच्या घटनेंत फेरबदल करणें झाल्यास एक महिन्याची पूर्व सूचना देऊन ती त्यासाठी बोलाविलेल्या संघाच्या विशेष साधारण सभेत करण्यात येईल. या सभेला हजर असणाऱ्या सभासदसंख्येच्या दोन तृतीयांशाहून अधिक सभासदांच्या मतानें तो करण्यांत येईल.

कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या मसुद्यांत दोन कलमें आणखी घालण्यांत यावीत.

(१) साधारण सभेंत घटना मंजूर झाल्यावर ती तावडतोब अमलांत आणली पाहिजे व त्यासाठी योग्य ते नियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(२) नवीन कार्यकारी मंडळाची निवड होईपर्यंत जुने कार्यकारी मंडळ कार्य करील.

दुरुस्तीः—पृष्ठ पंचेचाळीसवरील 'पोच' या सदराखालीं शेला या पुस्तकाच्या प्रकाशकाचें नांव व पत्ता देण्याचें राहून गेलें आहे; तो असा :—

सौ. सुधा रायकर; श्री. सरस्वती निवास, श्रीकृष्ण नगर पो. बोरिवली.

विदर्भ साहित्य संघ

१९५२ सालचें कार्यकारी मंडळ

वि. सा. संघाच्या १९५२ सालच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचा निकाल ता. ३ मार्च १९५२ रोजीं होऊन पुढील कार्यकारी मंडळ निवडून आलें—

अध्यक्ष—डॉ. शंकर दामोदर पेंडसे

कार्यकारी मंडळः— [१] प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, [२] श्री. पु. य. देशपांडे [३] श्री. रा. पु. सगदेव [४] श्री. ह. ना. नेने [५] श्री. बाळासाहेब ढवळे [६] श्री. ना. रा. शेंडे [७] श्री. द. त्र्यं. उर्फ आबासाहेब पारवेकर (यवतमाळ) [८] श्री. बा. ना. सहस्त्रबुद्धे (गोंदिया) [९] श्री. ना. ल. पोतदार (भंडारा) [१०] श्री. ब. पं. तांदळे (वर्धा) [११] श्री. गो. बा. पुल्लीवार (चांदा) [१२] श्री. के दे. देशपांडे (अमरावती) [१३] श्री. प्र. ना. खोडे (अकोला) [१४] श्री. द. रा. गोमकाळे (बुलढाणा).

निवडून आलेल्या सदस्यांपैकीं डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, श्री. पु. य. देशपांडें, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ह, ना. नेने, श्री. रा पु. सगदेव, श्री. ना. रा शेंडे आणि श्री. द. त्र्यं. उर्फ आबासाहेब पारवेकर यांनी आपली लेखी संमति कळविली आहे.

या निवडणुकींत ॲड. भा. द. कठाळे आणि प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी गणकाचें काम केलें हें आभारपूर्वक नमूद करणें अवश्य आहे.

" युगवाणी " (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररयांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

द्वैमासिक, फेब्रुवारी १९५२

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ प्रकाशन

वाग्वैजयंतीचें पूनर्मूल्यन

गडकरी स्मृतिदिनाच्या प्रसंगीं

वाचलेला निबंध

लेखक

डॉ. माधव गोपाळ देशमुख

विक्रेते

ठाकूर आणि कंपनी लिमिटेड,
सीताबर्डी, नागपूर.

किंमत सहा आणे

मुद्रक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.